ॐ

इतिहास ग्रंथमाला प्रकाशन ५ वें

गोमंतकीय नियतकालिकें

(गोमंतकीय नियतकालिकांचा इतिहास)

*

लेखक

नारायण भास्कर नायक

संपादक 'भारतमित्र'

रिवण (गोवा)

*

प्रकाशक

ना. भा. नायक

सन १९६५

*

मूल्य रु. ३-५०

प्रकाशन

भारतमित्र कार्यालय

रिवण (गोवा)

*

मुद्रण

नूतन प्रिंटिंग प्रेस

मडगांव

विषयानुक्रम

प्रस्तावना

'भारतमित्र' प्रकाशनाच्या इतिहास-ग्रंथ-मालेचा हा पांचवा ग्रंथ आज आमच्या प्रेमळ वाचकांपुढें येत आहे. गोमंतक इतिहास दिग्दर्शन, गोमंतकीय देवालयें, गतकालीन गोमंतकीय मुत्सद्दी आणि गोव्याच्या राज्य-कर्त्यांचीं नाणीं अशा मागील चार ग्रंथांप्रमाणेंच या पांचव्या गोमंतकीय नियतकालिकांच्या इतिहासाचेंहि सुविचारी वाचकवर्गाकडून सहर्ष स्वागत होईल अशी अपेक्षा आहे.

निरनिराळया ग्रंथोत्तेजक संस्था व विद्वद्वर्य यांकडून सदरील चारहि ग्रंथांस आर्थिक पुरस्कार व शुभाशीर्वाद आणि वृत्तपत्रांकडून प्रशंसोद्गार लाभले. मर्मज्ञ वाचकवर्गानेंहि फार कौतुक केलें. त्यामुळेंच प्रस्तुत पांचवा ग्रंथहि त्यांनां सप्रेम सादर करण्यास फार उत्साह वाटत आहे.

गोमंतकीय वृत्तपत्रांच्या इतिहासावरील स्वतंत्र असा हा अगदीं पहिलाच ग्रंथ आहे. यांत पहिल्या प्रकरणांत 'नियतकालिकांचा उदय', दुसऱ्यांत गोव्यांतील आरंभींचें मुद्रण आणि तिसऱ्यापासून पृ. ९ ते २० पर्यंत पोर्तुगीज वृत्तपत्रांची माहिती दिली आहे. आणि पुढें पृ. २१ पासून ९५ पर्यंत मराठी नियत-कालिकांचा इतिहास लिहिला आहे.

गोव्यांतील नियतकालिकांचा आरंभ पोर्तुगीज पत्रांनींच झाला. राज्यकर्ते पोर्तुगीज आणि त्यांची भाषाहि पोर्तुगीज असल्यानें पोर्तुगीज पत्रांनां पुढें पुढें वातावरण अनुकूल लाभत गेलें व त्यांतील कांहींकांचा जमहि नीट बसला. हल्लीं कांहीं कोंकणी पत्रांनीहि साथ मिळून त्या रोमन लिपीच्या वृत्तपत्रांचा संसार नियमीत चालू झाला. त्यांत गोवा मुक्ती-नंतर जन्म पावलेलें व अल्पावधींत योग्य दर्जा पटकावलेलें रोमन लिपींतील गोव्यांतील प्रमुख पत्र म्हणजे इंग्रजींतून निघणारें सर्वश्री धेंपे बंधु यांचें 'नवहिंद टाइम्स' हें दैनिक होय. कोंक-णींत आघाडीवर असलेलें आजचें पत्र मडगांवचें 'सत्' हें आहे.

गोमंतकीय मराठी नियतकालिकांचा आरंभ जरी सन १८६० सालापासून झाला असला; तरी प्रत्यक्ष गोव्यांत सुरू झालेलें पहिलें नियत-कालिक म्हणजे कै. सूर्याजी सदाशिव महात्मे यांचें 'आनंदलहरी' मासिक हें होय. याचा जन्म सन १८७० सालीं मार्च महिन्यांत झाला होता. त्यावरून गोमंतकांतील मराठी नियतकालिकांच्या प्रपंचाला ९५ वर्षें पुरीं होऊन सध्या ९६ वें साल सुरू आहे असें म्हणतां येईल. १९७० साली त्याला १०० वर्षें पुरीं होत असल्यानें त्यावेळीं गोमंतकीय मराठी नियत-कालिकांचा शतक-महोत्सव साजरा होणें अवश्य आहे.

गोमंतकांत एखादें साप्ताहिक किंवा लहानसें मासिक चालविण्याच्या कार्यांत देखील चाल-कांनां नाना प्रकारच्या आपत्ति भोगाव्या लागत. त्रास सहन करावे लागत. पैसा व

काल दवडावा लागे. अखेरीस प्रतिकूल परिस्थितीपुढें हात टेकावे लागून नियतकालिक बंदहि करावें लागे. मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान आणि मराठी नियतकालिकांबद्दलची आवड यांमुळें गोव्यांतील नियतकालिकांच्या या व्यवहारांत अनेकांनीं खस्ता खाल्ल्या. त्यांत त्यांनां यश मिळालें नाहीं. आपलें नियतकालिक दीर्घजीवि झालेलें पाहाण्याचें भाग्य लाभलें नाहीं. आणि गोमंतकांत मराठी नियतकालिकें चालूं शकतात याचें समाधानहि दिसलें नाहीं !

तथापि एक गोष्ट खरी कीं, त्यांचा तो प्रयत्न मुळींच फुकट गेला नाहीं; तर इष्ट दिशेनें सत्कारणींच लागला. त्यांच्या नियतकालिकांनीं जनतेंत जागृति निर्माण झाली. लोकांत मराठी वाचनाची आवड उत्पन्न झाली. मराठी बातम्या वाचण्याची उत्कंठा वाढली. वृत्तपत्रें घेण्याची प्रथा सुरू झाली. आणि स्थानिक, प्रांतीय व जागतिक घडामोडी समजून घेण्याची जनतेंत जाणीव झाली. या नियतकालिकांमुळें जसे वाचक निर्माण झाले, तसेच आस्ते आस्ते लेखकहि तयार होत गेले. स्वतःचें वृत्तपत्र दीर्घजीवि करण्याचें जरी त्यांनां साधलें नाहीं; तरी त्यांच्या त्या प्रयत्नानें जें कार्य झालें तें वृत्तपत्रीय इतिहासांत अवश्य नमूद करण्यासारखें असून आजच्या नियतकालिकांनां सहाय्यभूत असें असल्यानें त्याबद्दल त्यांनां मुक्त कंठानें धन्यवाद दिले पाहिजेत.

गतकालीन गोमंतकीय मराठी नियतकालिककार हे आजच्या गोमंतकीय मराठी वृत्तपत्र–मंदिराच्या पायांतील मजबूत चिरेच आहेत. याच पायावर प्रभातकार, भारतकार, हिंदुकर्ते वगैरेंनीं गोमंतकीय मराठी वृत्तपत्र–मंदिराची इमारत उभारली आणि आजला गोमंतक, प्रदीप, राष्ट्रमत, गोमंतवाणी या मराठी दैनिकांनीं त्या इमारतीवर सुवर्णकळस चढविला याबद्दल अत्यंत समाधान वाटत आहे. ज्ञानसूर्याच्या तेजोकिरणांनीं हा कळस अखंड चकाकत राहून त्याच्या प्रकाशानें आसमंतांतील तिमीर नष्ट होवो. जनतेंत सत्य, न्याय, नीति व एकात्मता वाढून आपल्या उच्चतम राष्ट्राचा सदैव उत्कर्ष होवो.

प्रस्तुत ग्रंथासाठीं जुन्या नियतकालिकांचें संशोधन करून माहिती मिळविण्यास फार परिश्रम करावे लागले. ठिकठिकाणीं फिरून खासगी वृत्तपत्रसंग्रह धुंडाळावे लागले आणि अनेक वाचलयांतील फाटके तुटके अंकहि पहावे लागले. तथापि जुन्या वृत्तपत्रांचा त्यांतल्या त्यांत जास्त संग्रह पणजी येथील Biblioteca Nacional या सरकारी वाचनालयांत मिळाला. अशीं हीं माहिती ीं विविध साधनें ज्यांच्याकडून प्रेमपूर्वक प्राप्त झालीं त्यांचे आभार मानणें योग्यच आहे.

रिवण (गोवा), दि. ५ डिसेंबर १९६५.

— लेखक

गोमंतकीय नियतकालिकें

(गोव्यांतील नियतकालिकांचा इतिहास)

—१—

नियतकालिकांचा उदय

जगांतील नियतकालिकांचा जन्म किंवा उदय हा प्राचीनकालीन नसून अर्वाचीन कालांतीलच आहे. अति प्राचीनकालीं स्वर्ग–मृत्यु–पाताळ या तिन्ही लोकांत नारदमुनीची भ्रमंती चाले आणि त्यांकडून जनतेला विविध माहिती मिळे असा पुराणांतरीं उल्लेख आहे. म्हणून नारद हाच वृत्तपत्र–प्रणेता असें मानतां येण्यासारखं आहे.

प्रत्यक्ष वृत्तपत्राचा जन्म ७व्या शतकांत चीन देशांत पेकीन येथें झाला. त्या वृत्तपत्राचें नांव 'पेकिन गॅझेट' असें होतें. उपलब्ध माहितीवरून म्हणतां येतें कीं, तेंच जगांतील पहिलें वृत्तपत्र आहे. यावरून वृत्तपत्राचा जन्म आपल्या आशियाखंडांतच पहिल्याप्रथम झाला असें सिद्ध होत आहे. वृत्तपत्राची पुढील एकंदर सुधारणा करण्याचें श्रेय मात्र पाश्चिमात्यांनीं मिळविलेलें आहे.

आरंभीं फक्त बातम्याच देण्याचा वृत्तपत्राचा उद्देश असल्यान वृत्त देणारें तें 'वृत्तपत्र' असें त्याला नामाभिधान मिळालें. बऱ्याच काला-नंतर पुढें नियतकालिक असा त्यांत फरक झाला. 'नियतकालिक' याचा अर्थ ठराविक कालाच्या अंतरानें प्रसिद्ध होणारें. इंग्रजींत त्याला Periodical म्हणतात. नियतकालिकांत दैनिक, अर्धसाप्ताहिक, साप्ताहिक व पाक्षिक अशा पत्रांप्रमाणेंच मासिक, द्वैमासिक व त्रैमासिक अशा पुस्तकांचाहि समावेश होतो. मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें हीं 'नियत-कालिकें' या एकाच वर्गांतील असलीं तरी त्यांचे उद्देश, लेखनपद्धति व धोरण यांत अंतर असतें.

वृत्तपत्रांचा उद्देश ठिकठिकाणच्या बातम्या देणें व त्या बातम्यांच्या अनुरोधानें जगाची व स्वदेशाची सद्य:स्थिति कशी आहे याची वाच-कांना जाणीव देऊन योग्य जागृति उत्पन्न करणें हा आहे; तर मासिक पुस्तकांचा उद्देश जनतेंत जुन्या व नव्या ज्ञानाचा प्रसार करून त्यांना विचार करावयास शिकविणें असा आहे. वृत्त-पत्रांना रोजच्यारोज होणाऱ्या राजकीय व इतर घडामोडींकडे विशेष लक्ष द्यावें लागत असल्यानें धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, कला इ. स्थायी महत्त्वाच्या विषयांसंबंधाचें काम मासिकांवर येतें. या भिन्नतेमुळेंच मासिकांतील लेखांना जसें साहित्यांत स्थान मिळूं शकतें तसें वृत्तपत्रीय लेखांना तें मिळणें बहुधा शक्य नसतें. हल्ली मात्र या गोष्टींत फरक पडत चाललेला दिसत असून वृत्तपत्रांतूनहि कांहीं लेख स्थायी स्वरूपाचे दिसत आहेत.

इंग्लंडमधील पहिलें वृत्तपत्र स. १५८८ सालांत निघालें. त्याचें नांव 'इंग्लिश मिरर' असें असून दुसऱ्या पत्राचें नांव 'विक्ली न्यूज' असें होतें.

'पेकीन गॅझेट' लांकडी ठशांवरील अक्षरांत

व लांकडी दाबयंत्रांतून निघे; तर 'इं. मिरर' व 'वि. न्यूज' हीं पत्रें धातूचीं अक्षरें व लोखंडी दाबयंत्र यांच्या सहाय्यानें निघत. हीं वृत्तपत्रें निघण्यापूर्वी इंग्लंडमध्यें सार्वजनिक कॉफी हाऊस संस्था असत आणि तेथें सार्वजनिक चळवळी व बातम्यांची देवघेव चाले. ठिक-ठिकाणचीं बातमीपत्रें तेथें येत व लोकांच्या वाचनासाठीं तीं मांडून ठेवीत.

'स्विफ्ट' व 'डेफो' या पत्रकारांनीं वृत्त-पत्रांतून अग्रलेख लिहिण्याची प्रथा सुरू केली. सतराव्या शतकाच्या मध्यापासून घृत्तपत्रांत जाहिराती देण्याची सुरवात झाली. स.१८४९त ज्यूलिअस रूटर यानें न्यूज एजन्सी स्थापन करून वृत्तपत्रांना बातम्या पुरविण्याचें काम सुरू केलें. पॅरिस, बर्लिन इ. प्रमुख शहरांतून या एजन्सीनें तारांनी बातम्या पुरविण्याचें काम केलें. ब्रुसेल्स, एक्सलाशापेल इ. ठिकाणीं त्यावेळीं तारायंत्रें नव्हतीं म्हणून तेथील बातम्या कबुतरांमार्फत आणण्याची व्यवस्था केली.

एकोणीसाव्या शतकाच्या आरंभीं वृत्तपत्रीय व्यवसायांत ज्या सुधारणा झाल्या त्यांतील महत्त्वाची अशी एक म्हणजे रणभूमीवर आपले बातमीदार पाठवून युद्धाच्या रम्य वार्ता लोकांना त्वरित वाचावयास मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली, ही होय. क्रॅब रॉबिन्सन हा रणभूमीवरून युद्धाच्या वार्ता पुरविणारा पहिला बातमीदार होता.

वृत्तपत्र हें देशांत विचार वाढविण्याचें एक मोठें साधन आहे. त्या दृष्टीनें राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, व्यापारविषयक वगैरे हरएक प्रश्नासंबंधीं वृत्तपत्रांत वरचेवर माहिती येऊन लोकांत त्यासंबंधींचें ज्ञान मिळणें अवश्य आहे.

पाश्चात्य राष्ट्रांत वृत्तपत्रांच्या बाबतींत आजला सर्वांगीण सुधारणा झालेली आहे. व्यवसाय या दृष्टीनेंहि तेथें वृत्तपत्रें चालविलीं जातात. चालक, संपादक, मुद्रक, व्यवस्थापक यांचीं निरनिराळीं खातीं तेथें व्यवस्थित चाल-विण्यांत येतात.

पाश्चात्य राष्ट्रांत नियतकालिकविषय सर्व प्रकारचें ज्ञान देणारीं उच्च विद्यालयें Colleges of Journalism आहेत. शिवाय तेथील विश्वविद्यालयांत सुद्धां नियतकालिक-विषयक ज्ञान देण्याची नीट व्यवस्था आहे. लिहिण्याची आकर्षक पद्धत, अगदीं वेळेवर बातमी देण्याची व्यवस्था, सत्यत्व इ. मुळें वृत्तपत्र वाचकांचें मन कसें वेधून घेतें हें तेथें प्रत्यक्ष दाखविलें जातें. वृत्तपत्राच्या न्याय-प्रियतेची जनसमाजांत कशी वाहवा होते याची जाणीवहि स्पष्ट देण्यांत येते.

व्यक्तिविषयक विचार शक्य तितके टाकून त्या व्यक्तीच्या योजनांचाच फक्त विचार वृत्तपत्रांनी कसा करावा. टीका सहानुभूतीची व विधायक स्वरूपाची कशी असावी. आपलें म्हणणें बरोबर असलें तरी दुसऱ्याचें म्हणणें चूक असलें पाहिजे असा समज कां करूं नये, अतिशयोक्ति न करतां परिस्थितीचें चित्र योग्य रीतीनें कसें रेखाटावें, मत्सरयुक्त व निंदाव्यंजक लेख न लिहितां आपल्या म्हणण्याची सत्यता जनतेस पटेल असें लेखन कसें लिहावें वगैरे

माहितीचें उपयुक्त शिक्षण त्या विद्यालयांतून व्यवस्थित मिळत असतें.

अलिकडे भारतांतहि वृत्तपत्रीय शिक्षण मिळण्याची व्यवस्था झालेली आहे ही चांगली गोष्ट आहे.

आपल्या भारतांत अठराव्या शतकापासून वृत्तपत्र प्रसिद्धीस सुरवात झाली. भारतांतील पहिलें वृत्तपत्र कलकत्ता येथें सन १७८० सालीं सुरू झालें. त्याचें नांव 'हिकीज गॅझेट' Hikeys Gazette असें होतें. हें इंग्रजी भाषेंत कलकत्ता येथें निघत असे. हें फक्त इंग्रज लोकांसाठींच जन्म पावलें होतें.

सन १७८९ सालीं मुंबई येथें 'बॉंबे हेरल्ड' Bombay Herald हें पत्र सुरू झालें. हें देखील इंग्रजी भाषेंत व इंग्रज लोकांसाठींच असे.

भारतांत देशी भाषेचें पहिलें वृत्तपत्र मिशनऱ्यांनीं सुरू केलें. सन १८२०त श्रीरामपुरचे मिशनरी केरी व मार्शमन या दोघांनीं अत्यंत परिश्रमानें बंगाली अक्षरांचे खिळे बनविले व ते जुळवण्यासाठीं जुळारू लोक शिकवून तयार केले. आणि कॉपिंग प्रेसवर मजकूर छापून पाहिला. आवश्यक सुधारणेनें तो पुन्हां जुळवून पुन्हां छापून पाहिला आणि मग तो छापखाना सुरू केला.

सदर मिशनरी छापखान्यांत सन १८२३ सालीं केरी व मार्शमन यांनींच 'समाजदर्पण' नावांचें वृत्तपत्र बंगाली भाषेंत सुरू केलें.

सन १८२३च्या उत्तरार्धात 'दर्पण' नांवाचें गुजराथी भाषेंतील पहिलें वृत्तपत्र मुंबई येथें निघालें.

मराठी भाषेंतील जें पहिलें वृत्तपत्र मुंबई येथें सुरू झालें, त्याचें नांव 'वृत्तदर्पण' असें होतें. हें पत्र निर्भेळ मराठी नसून इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांचें होतें. याची मराठी बाजू गोविंद विठ्ठल कुंटे ऊर्फ भाऊ महाजन यांकडे व इंग्रजी बाजू बाळशास्त्री जांभेकर यांकडे होती. हें साप्ताहिक पत्र सन १८३२ सालीं जन्म पावलें. बाळशास्त्र्यांचा मार्मिकपणा व महाजनांचा निर्भीडपणा यांमुळें हें पत्र जनता व राज्यकर्ते या दोघांच्याहि पसंतीस उतरलें.

महाराष्ट्रांतील निर्भेळ मराठी नियतकालिक म्हटलें म्हणजे भाऊ महाजन यांचा 'प्रभाकर' हें होय. 'प्रभाकर' पत्राचा उदय सन १८४० सालीं झाला. या पत्रांतील लेख निर्भीड असत. लोकहितवादी या पत्रांत वरचेवर लिहीत असत.

"लोकांत प्रेरणा व जागृति उत्पन्न करण्याचें वर्तमानपत्र हे एक श्रेष्ठ साधन आहे." सामान्य लोक पुस्तकांपेक्षां वृत्तपत्रें अधिक वाचतात. त्यांच्या मनावर कोणत्याहि गोष्टीचा परिणाम लवकर होतो. या दृष्टीनें त्यांना चांगलें वळण लावण्याचें महत्वाचें कार्य वृत्तपत्रकारांकडे येतें. हें कार्य करण्यास पत्रकाराची योग्यताहि तशीच पाहिजे. ते लेखनांत पारंगत हवेत. लोकशिक्षण-कार्यांत ते पात्र पाहिजेत. जन्मभाषा व जन्मभूमि यांचा अभिमान व त्यांच्या सेवेची त्यांना तळमळ पाहिजे." हा त्यांच्या एका लेखांतील उतारा विचारार्ह आहे.

"देशांत राष्ट्रीय भावना उत्पन्न करणें हें सुद्धां वृत्तपत्रांचेंच कार्य आहे." असें ते आपल्या दुसऱ्या एका लेखांत लिहितात.

त्यानंतरच्या कालांत भारतांत अनेक नियतकालिकें जन्म पावलीं. त्यांपैकीं कित्येक अल्पायु ठरलीं आणि कांहीं दीर्घायूहि झालीं. तथापि उभयतांची सेवा वृत्तपत्रीय दरबारांत रुजू झाली असें म्हणण्यास हरकत वाटत नाहीं. कारण नियतकालिकांतून नवे विचार व भावी काल जन्माला येतात आणि त्यांच्याद्वारें भाषा नवेंनवें रूप धारण करीत जाते. भाषेंत विचार प्रगट करण्याचें किंवा मनोवृत्ति क्षुब्ध करण्याचें सामर्थ्य, वादविवादांत लागणारी चतुरस्रता, सुबोधता, वैचित्र्य, जोम, आवेश, विविधता इ. गुण वृत्तपत्रांमुळें वृद्धिंगत होत जातात.

बराकींत शिपाई ज्या नित्य कवाइती करतात, त्यांचा जसा पुढें लढायांत उपयोग होतो, तसा वृत्तपत्रांतील लेखनाचा अभ्यास पुढें ग्रंथलेखनास उपकारक होतो. कित्येक ग्रंथकार प्रथमतः वृत्तपत्रांतून लोकांपुढें येऊन मग स्वतंत्रपणें प्रसिद्धी पावतात.

कित्येक नामांकित लेखकांनी वृत्तपत्रा लेखनांतूनच पुढें विचारांत क्रांति घडवून आणली, राष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें व वाङ्मयांत नवयुग सुरू केलें.

सन १८७५ नंतर ज्यांनी आपल्या लेखांनी महाराष्ट्राला जागें केलें; त्याच्या विचाराला नवें वळण, नवा जोम, नवें राष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिलें त्या चिपळूणकर, आगरकर, लोकमान्य यांचें कितीसें लिखाण नियतकालिकांच्या बाहेर दिसतें? जी गोष्ट थोरांची तीच थोड्या फार फरकानें इतरांची. म्हणून वाङ्मयाच्या अभिवृद्धीचा, विचारविकासाचा किंवा परिस्थितीच्या परिवर्तनाचा विचार करतां नियतकालिकांचें महत्व लक्षांत घेतलेंच पाहिजे.

नियतकालिकांनीं देशांत जागृति केली, चिकित्सकबुद्धि वाढविली, विचारस्वातंत्र्य निर्माण केलें, ज्ञानलालसा उत्पन्न केली, आत्मनिरीक्षणाची संवय लावली आणि नवे विचार, नवे लेखक, नवें लेखन उदयाला आणलें.

देशांत वृत्तपत्रांची वाढ होणें इष्ट; पण त्यांचें ध्येय मात्र अस्सल देशहिताचें व लोकहिताचें असलें पाहिजे. केवळ सटर फटर पत्रांमुळें देशांतील वृत्तपत्रांची संख्या वाढल्याचें समाधान मानणें मात्र गैर आहे. जोंपर्यंत त्या पत्रांत सत्याची चाड नि तेजाची वाढ नाहीं तोपर्यंत त्यांत समाधानास यत्किंचितहि जागा नाहीं. ती वाढ म्हणजे रोगट सूज असून केव्हां हानी करील याचा नेम नाहीं.

वृत्तपत्रांची वाढ डोंगरासारखी न होतां वृक्षासारखी व्हावी म्हणजे तीं अधिक निघून त्यांचा प्रसार अधिक व्हावा व त्यांच्या शाश्वतींत सुद्धां अधिक भरंवसा असावा.

जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करून समाजांत अस्वास्थ्य निर्माण करणें आणि पर्यायानें देशांत फुटीर वृत्ति प्रसारित करून राष्ट्रास अंतर्गत धोका उत्पन्न करणें अशा हीन वृत्तीच्या पत्रांचा मात्र जन्मच न झालेला बरा.

गोव्यांतील आरंभींचें मुद्रण

मुद्रणकलेच्या प्रवेशापूर्वीं इतर देशांप्रमाणेंच गोव्यांतहि मोठमोठे ग्रंथ देखील हातानेंच लिहून तयार होत असत. एखाद्याला स्वत:च्या संग्रहासाठीं जरूरी भासल्यास उत्तम अक्षराच्या लेखकाकडून आवश्यक ग्रंथाची नक्कल करून घेत. त्यामुळें चांगल्या लेखकांची वर्णीहि ठीक लागे.

इ. स. च्या पहिल्या शतकांत चीन देशांत मुद्रणाचा प्रथम प्रयत्न झाला. पण त्याबद्दलचे योग्य पुरावे मिळत नाहींत; मात्र स. १७५ या वर्षीं तेथें ठशांनीं छापलेल्या एका ग्रंथाचा भाग सरकारी ऐतिहासिक दप्तरखात्यांत संग्रहीत केलेला आहे. इ. स. च्या दहाव्या शतकांत चीनमध्यें छापण्याची कला जोरांत चालू होती याचे मात्र अनेक पुरावे मिळतात.

इ. स. च्या १४व्या शतकापासून युरोपांत छपाईची वाढ होत गेली असली; तरी चीन देशाप्रमाणें युरोपांतहि १ल्या शतकापासूनच मुद्रणाचे प्रयत्न चालू होते. लांकडी ठोकळयांवर हवीं तीं अक्षरें कोरून ते ठसे शाई लावून दोन जाड फळयांमध्यें ठेवीत व त्यावर कागद ठेवून दाबून काढीत. पुढें लांकडावर मजकूर कोरण्यांत येऊं लागला व त्याची छपाई सुरू झाली. त्यांत लॅरेन्स जेन्सन या जर्मन कारागिरानें सुधारणा केली व एकेक अक्षर वेगवेगळें प्रथम लांकडी व नंतर शिशाचें तयार केलें.

पद्धतशीर टाइप पाडून त्याची जुळणी व नंतर छपाईचें धातूचें साधन बनवून त्यांतून छपाई करण्याचा पहिला मान जर्मनींतील ‘मेंझ’ गांवच्या ‘गटेंबर्ग’ याला आहे. त्यानें सन १४४०त पहिल्याप्रथम छापलेल्या बायबल ग्रंथाचीं कांहीं पानें त्याचें स्मारक म्हणून तिकडे जतन करून ठेवलीं आहेत.

मुद्रणकलेची पुढें वाढ होत जाऊन ती कला स. १४६६त फ्रान्स देशांत, १४७७त इंग्लंडांत, १५४४त पोर्तुगालांत आणि सन १५५०त भारतांत गोमंतकांत आली. मुद्रणकलेचा उपयोग निरनिराळया देशांत आरंभीं जसा मिशनरी लोकांनींच मोठ्या प्रमाणावर केला. त्याचप्रमाणें गोव्यांत देखील जेजुईत मिशनऱ्यांनीं मुद्रणकला प्रथम आणली. छापखान्यासोबतच त्यांनी टाईप-फौंड्रीहि आणली. त्या वेळीं पोर्तुगालच्या गादीवर तिसरे दों जुआंव असून गोव्याचा गव्हर्नर दों फ्रांसिस्कु बाऱ्हेतु हा होता. खिस्ती मिशनऱ्यांनीं गोव्यांत आणलेल्या छापखान्यांतून आरंभीं धार्मिक पत्रकेंच छापीत असत. सन १५५६ सालीं सप्टेंबर महिन्यांत त्यांत ज्या पहिल्या ग्रंथाचें मुद्रण झालें त्याचें नांव ‘Conclusiones Philosophicas’ असें होतें. या छापखान्यांतील छपाईचें काम आरंभीं Juan Bustamante या स्पॅनिश व नंतर L. Fernandes या पोर्तुगीज अशा दोन इसमांनी केल्याचे उल्लेख मिळतात.

जेजुईत पाद्री तोमास इस्तेव्हं यांनी मराठी भाषेंत रोमन लिपींत लिहिलेला ‘पुराण-क्रिस्तांव’ हा ग्रंथ पहिल्यांदा सदर छाप-

खान्यांत रायतूरच्या कॉलेजमध्यें सन १६१६ सालीं छापला. हेंच फादर स्टिफन्सचें प्रसिद्ध ख्रिस्त-पुराण होय. याच छापखान्यांत छापलेला तिसरा ग्रंथ म्हणजे पाद्रि करूज यांचें सां पेद्रु-पुराण. इंग्लिश व फ्रेंच अशा दोन पाश्चात्य लेखकांचे व रोमन लिपींतील असले तरी हे दोन पुराण ग्रंथ गोव्यांतील मराठी भाषेंतील पहिले दोन छापील ग्रंथ असें अवश्य म्हणतां येईल.

सन १८२१ सालीं गोव्यांत 'इम्प्रेंस नासियोनाल' हा सरकारी छापखाना सुरू झाला. त्याच छापखान्यांतून 'गाझेत द गोअ' हें सरकारी पोर्तुगीज पत्र निघालें. त्याचा उपयोग फक्त सरकारी कामकाजासाठींच होई. हें कांहीं काल चाललें व सन १८२६त बंद झालें. यानंतर दोन तीन पत्रांमागून स. १८३७त 'बोलेतीं दु गोव्हेर्नु दु इस्तादु द ईंदिअ' हें सरकारी गॅझेट याच छापखान्यांत पोर्तुगीज भाषेंत सुरू झालें. आरंभीं त्यांत अग्रलेख, बातम्या वगैरे येत व त्याचा संपादकहि स्वतंत्र असे; पण पुढें कायद्यानेंच त्याची संपादकीय जबाबदारी चीफ सेक्रेटरीवर टाकण्यांत येऊन तें फक्त सरकारी कायदे, जाहिरनामे, नेमणुका, बातम्या देणारें सरकारी गॅझेट म्हणून ओळखण्यांत येऊं लागलें.

सन १८०४ सालीं कलकत्ता येथें पहिल्यानेंच देवनागरी टाईप तयार करण्याचा प्रयत्न सुरू झाला. पुढें त्यांत आस्ते सुधारणा होत होत साधारणसा टाईप तयार होऊं लागला आणि त्यामुळें हिंदी, बंगाली, गुजराती वगैरे छपाईची सोय झाली. तथापि अस्सल व पद्धतशीर मराठी टाइप पाडण्याचें श्रेय, मुंबईचे जावजी दादाजी चौधरी यांनाच आहे.

शेट जावजी दादाजी हे अल्प वेतनावर वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी एका इंग्रजी छापखान्यांत नोकरीस लागले. मराठी टाइप स्वतः पाडण्याची त्यांना प्रबल इच्छा. नोकरी करतां करतांच त्यांच्या कुशलतेनें टाइप कसे पाडतात याचें त्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळालें. पुढें त्यांनी १८५३ सालीं नोकरी सोडली आणि स्वतंत्र टाइप फौंड्री सुरू करून तेथें शुद्ध मराठी टाइप पाडण्यास आरंभ केला. ही बातमी जाहीर झाली आणि त्याच सालीं मुंबईहून पणजी येथें सरकारी इम्प्रेस नासियोनालमध्यें मराठी टाइप आणण्यांत आला.

(A Imprensa Nacional de Nova-Gôa trouxe de Bombaim, em 1853, o tipo devanagárico (balbodha) para a publicação dos anúncios e outras noticias, em marata, no Boletim do Governo. (—Os primeiros livros maratas impressos em Gôa. — डॉ. पिसुर्लेंकर.)

तारीख २७ मे १८५३ च्या बोलेतींच्या अंकांत बालबोध लिपींत जो पहिला मराठी मजकूर प्रकाशनांत आला तो असा—

" जाहीर करण्यांत येत आहे कीं छापखान्यांत माहाराष्ट्र छापेचीं अक्षरें आणिलीं आहेत—जो सरकारी बोलेतींवर माहाराष्ट्र लिहिण्याचीं हर येक प्रकरणी जाहीर खबर

छापून प्रसिद्ध करणार असेल त्याणे दर ओळीस येक तांग (६० रैस) प्रमाणें खर्च फारीग करितां जाहीर खबर शुत्व भाषेनें लिहुन आली पाहिजे ती प्रसिद्ध करणेस अडचण नसेल तर छापून प्रसिद्ध केली जाईल.

अक्षरें बनावणार याणे हें काम प्रारंभिलें आहे त्यांत तो तयार होतां सदरहू खर्च कमी केला जाईल." (सदर पुस्तक पृ. १६)

सदरील सरकारी छापखान्यांत देवनागरी टाइपांत जें पहिलें मराठी पुस्तक सन १८५४ सालीं छापण्यांत आलें त्याचें नांव "Codigo dos Uzos e Costumes dos Habitantes das Novas-Conquistas, em Partuguez e Marata" असें असून त्यापुस्तकास ५३ पृष्ठें होतीं.

ता. १३ सप्टेंबर १८५४च्या बोलेतींच्या अंकांत सदर पुस्तकाची पहिली जाहिरात प्रसिद्ध करण्यांत आली होती.

पुढें सन १८५८ सालीं एक मृत्युपत्रिका मराठींत छापण्यांत आली. आणि दुसऱ्या वर्षी म्हणजे १८५९ सालीं एक लग्नपत्रिकाहि छापली.

सन १८६१ त Codigo dos Usos e Costumes या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापण्यांत आली.

सन १८६७ त सरकारी छापखान्यांतून मराठी बाराखडीचें पुस्तक छापून निघालें. त्यावर लेखकाचें नांव नसलें तरी तें कै. सूर्याजी आनंदराव यांनींच तयार केलें होतें.

सदर पुस्तिकेची जी जाहिरात बोलेतींच्या २२ मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झाली तिचा मजकूर असा होता—

"बाराखड्या व लेंकरांस वाचनाचे कांहीं वेंचे यासुद्धां शालोपयोगी पोथी नवीन गोवें येथें सरकारी छापखान्यांत छापिली. किम्मत ३ तांगें."

सन १८६७ सालीं 'इसाप-नीति कथा' ही मराठी पुस्तिका सदरील सरकारी छापखान्यांत छापण्यांत आली. या पुस्तकाची जाहिरात खालील प्रमाणें बोलेतींमध्यें २० सप्टेंबर १८६७ च्या अंकांत प्रसिद्ध झाली—

"इसाप-नीति कथा. हा ग्रंथ इंग्रेजी ग्रंथावरून माजी सदाशिव काशीनाथ छत्रे याणीं मराठी भाषेंत केला तो अजम मेजर तोमस क्यांडी याणी तपासला त्याचे चवथे आवृत्तीच्या पोथींतून कांहीं गोष्टी निवडून घेऊन एक लहान पुस्तक मुंबईत तयार झालें आहे त्यास आणखी कांहीं गोष्टी चढवून हें पुस्तक केलें.

हा ग्रंथ मराठी शाळे करितां छापून तयार झाला आहे. तो माहाराष्ट्र शालोपयोगी असून त्यांत बहुतेक सुबोध गोष्टी असल्यावरून आबालवृद्धांस वाचनास फार उपयोगी आहे. ज्यास पाहिजे त्यानें सरकारी छापखान्यांत विकत घ्यावा. किम्मत २ असर्फी." (Os Primiros Livros Maratas P. 18.— डॉ. पिसुर्लेकर).

या पुस्तकावरहि कर्त्याचें नांव नव्हतें. तथापि तें पुस्तक सरकारी दुभाषी सूर्याजी

आनंदराव यांनी तयार केल्याची माहिती मिळते.

सन १८६८ नंतर 'इम्प्रेंस नासियोनाल' छापखान्यांत कित्येक सुधारणा झाल्या.

सन १५५० साली जो मिशनरी छापखाना गोव्यांत सुरू झाला तो गोव्यांतीलच नव्हे; तर सबंध भारतांतील पहिला असल्यानें त्याला विशेष महत्त्व असलें, तरी त्यांत छपाईचीं साधनें अपुरींच होतीं. त्यांतल्या त्यांत सुधारणा करून १५५६ त मिशनऱ्यांनी त्या छापखान्यांत ग्रंथमुद्रणहि केलें; तथापि मिशनरी व त्यांचें कार्य यांच्यापुरतीच त्या छापखान्याची ठराविक मर्यादा असल्यानें इतरांना त्याचा उपयोग होणें शक्य नव्हतें. सर्व प्रकारच्या छपाईसाठीं सोयिस्कर असा छापखाना गोव्यांत तयार होण्यास सन १८२१ सालच यावें लागलें. या वर्षी जो सरकारी 'इम्प्रेस नासियोनाल' छापखाना गोव्यांत सुरू झाला तो तत्कालीन दृष्टीनें व्यवस्थित होता.

सदरील 'इम्प्रेस नासियोनाल' छापखान्यांत सरकारी पत्राचे अंक छापून निघाले म्हणजे बाहेरचें काम घेण्यास त्याला सवड मिळे आणि तसें काम घेण्यास छापखान्याच्या व्यवस्थापकाला सरकारी परवानगीहि असे. त्यामुळें पुढील कालांत तेथें बाहेरचीं छपाईचीं कामें येऊं लागलीं.

वास्तविक सर्वसाधारण लोकांना त्यावेळीं आजच्याप्रमाणें मुद्रणालयांची जरूरी भासत नव्हती; कारण खासगी किंवा व्यापारी छपाई कामें त्यावेळीं फारशीं नव्हतींच. कांहीं अवघेच लोक आपल्या अत्यंत जरूरीच्या कामांसाठीं छापखान्याकडे जात असत.

'Goa' नांवाचें एक पोर्तुगीज स्वतंत्र वृत्तपत्र सुरू करण्याचा कांहीं गोमंतकीय ख्रिस्ती तरुणांचा ज्या वेळीं विचार ठरला त्यावेळीं त्यांनी आपल्या पत्राच्या छपाईसाठीं स्वतंत्र छापखाना उभारण्याचाहि विचार केला; पण बरेच दिवस प्रयत्न करून त्यांत त्यांना यश येण्याचें न दिसल्यानें तो नाद सोडून त्यांनी सरकारी इम्प्रेस नासियोनाल छापखान्यांत छपाई करून घेण्याचें ठरविलें; पण स्वतंत्र पत्र म्हणून त्याचें काम सरकारी छापखान्यांत स्वीकारण्यांत आलें नाहीं. त्यामुळें हें पत्र हस्तलिखित स्वरूपांत सुरू झालें. तें पत्र पोर्तुगीज भाषेंत निघत असून त्याचा प्रसारहि अवघ्याच मेंबर लोकांत होता. आरंभींच्या अंकाचा जोम पुढें टिकला नाहीं आणि अल्प काल चालून तें लगेच बंद पडलें.

सरकारी छापखान्यांत 'गाझेत द गोअ', 'क्रॉनिक कोंस्तितुसियोनाल द गोअ', यॅकु द लुझितानीअ, व्हिजिलांति, बिब्लियोतेक द गोअ, ऑब्सेर्व्हादोर अशीं अठरा वीस नियतकालिकें त्या त्या वेळीं छापून दिल्याचा उल्लेख मिळतो.

सन १८२१ पासून १८५९ पर्यंतच्या मडगांवच्या 'उल्त्रामार' छापखान्याचा जन्म होईपर्यंतच्या ३८ वर्षांच्या कालापर्यंत गोव्यांत सरकारी हाच एकीं एक छापखाना असल्यानें आपल्या कामासाठीं त्याच छापखान्याकडे धांव घेणें गरजू लोकांना अपरिहार्यच होतें. पण पुढें तो छापखाना सुरू होतांच गोव्याच्या दक्षिण भागांतील गरजू लोकांची सोय झाली. ××

— ३ —

पोर्तुगीज वृत्तपत्रें १

गोमंतकांत पहिल्या प्रथम वृत्तपत्रें निघालीं तीं पोर्तुगीज भाषेंत. आरंभींचीं कांहीं पत्रें सरकारतर्फेंच सुरू झालीं आणि पुढें कांहीं कालानें लोकांनीं त्या कार्यांत भाग घेतला.

गाझेत द् गोअ — गोव्यांतील हें अगदीं पहिलें पत्र. हें पत्र पूर्णांशानें सरकारीच होतें. ता. २२ माहे डिसेंबर सन १८२१ रोजीं नवीनच स्थापन केलेल्या सरकारी इम्प्रेस नासिओनाल या छापखान्यांत छापून पणजी येथें त्याचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. हें साप्ताहिक होतें. अंक १ ते ८ पर्यंत याचे संपादक लीम लैतांव हे असून ९ ते २७ पर्यंत आल्मैद आल्बुकेर्क व पुढें जुझे आनिसेत सिल्व असे होते. हें ऑगस्ट सन १८२६ पर्यंत चाललें. अखेरपर्यंत तें सरकारी छापखान्यांतच छापून निघे. या पत्रांतून राजकीय हालचालींची माहिती येत असे.

क्रॉनिक कॉंस्तितुसियोनाल द गोअ — हें साप्ताहिक सरकारीच असून त्याचा आरंभ १३ जून सन १८३५ रोजीं आणि शेवट ३० नोव्हेंबर सन १८३७ रोजीं झाला. याची छपाई इम्प्रेस नासियोनाल या छापखान्यांत होई आणि जुझे आनिसेत सिल्व त्याचे संपादक होते. हें पणजी येथेंच निघत असे.

यॅकु द लुझितानीअ — या पत्राचा जन्म सन १८३६ सालीं जानेवारीच्या ७ तारखेस पणजी येथें झाला. याचे संपादक लौझादु द आराऊझ्यु या नांवाचे पणजीच्या हायकोर्टाचे जज्ज होते. हें पत्र साप्ताहिक असून 'इम्प्रेस नासियोनाल' छापखान्यांत छापून पणजी येथें प्रसिद्ध करण्यांत येई. हेंच गोव्यांतील पहिलें राजकारणी पत्र. तथापि यांत सरकारविरुद्ध मात्र कांहीं येत नसे, कारण तें सरकारीच होतें. सन १८३७च्या मार्च महिन्याच्या ५ तारखेस निघालेला याचा अंक शेवटचा ठरला.

बोलेतीं दु गोव्हेर्नु दु इस्तादु द ईंदिअ — हें पत्र ता. ७ डिसेंबर सन १८३७ रोजीं पणजी येथें सुरू झालें. याचे आरंभींचे संपादक आंतोनियु मारियानु द आझेव्हेदु, कॉनिगु कायतानु जुआंव पेरिस् व क्लाउदियु मोंतैरु बारबूद हे होते. त्यानंतरच्या कालांत त्याची संपादकीय जबाबदारी सरकारचे जनरल सेक्रेटरी (सेक्रेतारियु जेराल) यांकडे गेली. आरंभीं हें पत्र साप्ताहिक होतें; नंतर सन १८४३ चे पहिले पांच महिने द्विसाप्ताहिक होऊन पुढें साप्ताहिकच निघूं लागलें. पुन्हां सन १८५६ पासून १८७९च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत तें द्विसाप्ताहिक स्वरूपांत प्रकाशनांत आलें. त्याच सालच्या सप्टेंबरपासून एप्रिल १८८२ पर्यंत पुन: साप्ताहिक स्वरूपांत निघून लगेच ता. १ मे पासून तें दैनिक झालें आणि तसेंच तें ता. ३० नोव्हेंबर सन १८८७ पर्यंत प्रसिद्ध होत राहिलें. त्याच सालच्या १ डिसेंबर पासून पुन्हां बदल होऊन तहत १८९७ पर्यंत तें आठवड्यांतून तीनदां प्रसिद्ध होऊं लागलें. यानंतर सन १८९८ च्या सुरवातीपासून बदल होऊन पुन्हां हें पत्र द्विसाप्ताहिक स्वरूपांत प्रगट होऊं लागलें. पुढें सन १८८९ मधील ऑगस्ट महिन्यापासून या पत्राच्या नावांत बदल करण्यांत आला आणि त्याला 'बोलेतीं ओफिसिआल' असें नांव मिळून तें पुन्हां

साप्ताहिक झालें. बराच कालपर्यंत तें असें साप्ताहिक स्वरूपांतच निघूं लागलें; तथापि प्रजासत्ताक प्रशासनांत पुन: एकदां बदल होऊन तें द्विसाप्ताहिक झालें आणि नंतरच्या कालांत तें साप्ताहिक स्वरूपांतच निघूं लागलें. पुढें त्यांत निरनिराळ्या विषयांचे तीन विभाग येऊं लागले. प्रथम विभागांत कायदे व सरकारी फर्मानें, द्वितीय विभागांत सरकारी कामगारांच्या नेमणुका, रजा, बदल्या इ. आणि तृतीय विभागांत सरकारी व बिनसरकारी नोटिसा, जाहिराती इ. अशी व्यवस्था झाली. याच पद्धतीनें तें आतां स्वातंत्र्य कालांतहि चालू आहे. आजचा बदल म्हणजे अग्रभागीं सिंहमुखी भारतीय राष्ट्रचिन्ह, Government Gazette हीं ठळक अक्षरें आणि मूळची पोर्तुगीज दुय्यम असून प्रमुख स्थान इंग्रजीला आहे. या पत्राची आजची तिन्हीं विभागांची एकूण वार्षिक वर्गणी ४० रु. आहे.

ऊ व्हिजिलांति—या साप्ताहिक पत्राचा जन्म ता. १५ जुलै सन १८३८ रोजीं झाला. याचे संपादक मेजर जुआंव द सौज माशादु हे होते. हें पत्र इम्प्रेस नासियोनालमध्येंच छापण्यांत येई व पणजी येथेंच प्रसिद्ध होई. यांत राजकीय हालचालींचीहि माहिती येई. या पत्रानें आपल्या २२ ऑक्टोबर १८३८ च्या अंकानंतर लागलाच कायमचा विसावा घेतला.

बिब्लियोतेक द गोअ — हें पत्र वाङ्मयीन स्वरूपाचें काढण्याचा संपादकांचा एक विशिष्ट दृष्टिकोन होता; परंतु कांहीं कारणानें त्याचा दुसरा अंकच निघाला नाहीं. प्रथमांक २४ पृष्ठांचा होता. याचे संपादक जुआंव आंतोनियु आव्हेलार हे पणजीचे गृहस्थ असून त्याची छपाई इम्प्रेस नासियोनालमध्यें झाली होती.

ऊ ऑब्सेर्वादोर — हें पत्र पणजी येथें ता. १५ फेब्रुवारी सन १८३९ रोजीं सुरू झालें. आरंभीं हें पाक्षिक होतें; पण नंतर मासिक होऊन ता. ३१ ऑक्टोबर १८४०चा त्याचा अंक अखेरचा ठरला. याचे संपादक कॉनेगु जुआंव पेरिस् व जुझे आ. सिल्व हे असून त्याचें कार्यालय पणजी येथें असे.

ऊ एन्सिक्लॉपॅदिकु — सन १८४१ त जुलैपासून हें पत्र पणजी येथें सुरू झालें. याचे संपादक मोंतैरु बार्बुद हे होते हें जून सन १८४२ नंतर लगेच बंद झालें.

ऊ कोंपिलादोर — हें मासिक सन १८४३ त सुरू झालें. त्याचा प्रथमांक ७ ऑक्टोबर रोजीं निघाला आणि पुढें त्याचा पाक्षिप स्वरूपांत बदल होऊन ३१ डिसेंबर सन १८४७चा त्याचा अंक शेवटचा ठरला. याचे संपादक जुआंव आं. आव्हेलार हे होते. हें पणजीला प्रसिद्ध होई.

ऊ कुऱ्हैयु द नॉव्ह गोअ — या साप्ताहिकाचा पहिला अंक ता. ४ जानेवारी सन १८४४ रोजीं निघाला. याचे संपादक आल्फेरि बेंतु मासेदु हे होते. पणजी येथेंच याचें कार्यालय असे. या पत्राचा अखेरचा अंक ता. २४ सप्टेंबर सन १८४४ रोजीं प्रसिद्ध होऊन तें बंद झालें.

आपेंसु आउ बोलेतीं दु गोव्हेर्नु — हें साप्ताहिक ता. २२ मे १८४४ पासून पणजी येथें सुरू झालें, पण त्याच सालच्या डिसेंबरांत अखेरचा अंक प्रगट करून त्यानें आपली जीवनयात्रा संपवली.

अ व्हॉज दुश् पोव्हुश् द ईंदिअ — या साप्ताहिकाचा पहिला अंक ता. ३ जुलै सन १८४५ रोजीं पणजी येथें निघाला. संपादक जुझे आ. सिल्व याच्या मनांत तें द्विसाप्ताहिक करावयाचें होतें, पण तें न साधतां त्याच स्थितींत त्याला ता. ३ मार्च सन १८४६ रोजीं त्याचा अखेरचा अंक काढावा लागला.

जॉर्नाल द सांत इग्रेज लुझितान दु ओरियेंति — हें साप्ताहिक धार्मिक स्वरूपाचें असून त्याचे संपादक आर्चबिशप सिल्व तोन्हिश् हे होते. छपाई इतर पत्रांप्रमाणेंच इम्प्रेस नासियोनाल या सरकारी छापखान्यांत होई. कार्यालय पणजी येथें असे. सन १८४६च्या जानेवारींत याचा जन्म झाला आणि १८४९ च्या मार्चमध्यें यानें अखेरचा विसावा घेतला.

गाबिनेति लितेरारियु दश् फाँताई-न्यश् — हें मासिक वाङ्मयीन स्वरूपाचें असून त्याचे संपादक फिलीप नेरी शाव्हियेर हे होते. हें ता. १५ जानेवारी स. १८४६ रोजीं पणजी येथें सुरु झालें आणि स. १८४८ च्या डिसेंबरांत याचा अखेरचा अंक निघाला. सदरील सर्व नियतकांत मासिक असूनहि नांव घेण्यासारखी कामगिरी याच नियतकालिकानें बजावली आहे. यांत बरीच ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झालेली आहे. स्वत: संपादक हे विद्वान् व इतिहासतज्ज्ञ होते.

ऊ मॉझाइकु — हें वाङ्मयीन स्वरूपाचें मासिक पणजी येथें सन १८४८च्या जानेवारी महिन्यांत सुरू झालें. याचे संपादक कॉस्त कांपुश् हे होते. जानेवारी ते जूनपर्यंतचे सहा अंक निघतांच हें बंद पडलें.

ऊ देफेंसोर द ऑर्दें इ द व्हॅर्दादि — या पाक्षिक पत्राचा जन्म सन १८५२ सालीं ऑगस्टच्या २४ तारखेस झाला. कार्यालय पणजी येथें असून संपादक जुझे आं. ओलिव्हैर हे होते. हें जेमतेम वर्षभर चाललें आणि ता. ३१ ऑगस्ट १८५३ रोजीं त्याचा अखेरचा अंक निघाला.

ऊ देफेंसोर दु रेयाल पाद्रोआदु — सन १८५३ च्या सप्टेंबरांत हें मासिक पणजी येथें सुरू झालें. ओलिव्हैर, फिलीप नेरी शाव्हियेर व कामील मेंदिश् असे याचे तिघे संपादक होते. १८५४ चा मार्चचा अंक निघतांच हें बंद पडलें.

रेव्हिस्त इलुस्त्रातिव्ह — हें वाङ्मयीन मासिक पणजी येथें स्थापन झालेल्या एका संस्थेतर्फे निघत असे. सन १८५४ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या ६ तारखेस याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हें जास्त काल चालूं शकलें नाहीं. संस्थेच्या सभासदांत आरंभींचा उत्साह पुढें टिकला नाहीं, त्यामुळें या मासिका-संबंधींच्या त्यांच्या सुरवातीच्या साऱ्या कल्पना व योजना फोल झाल्या. याची छपाई इम्प्रेस नासियोनाल या सरकारी छापखान्यांत होई. पुढें पुढें छपाईचीं बिलें भरण्याइतकीहि आर्थिक व्यवस्था नसल्यानें आणि इतरहि कांहीं अड-चणीमुळे संस्थेनें मासिक बंद करण्याचा निर्णय घेतला.

ऊ उल्त्रामार — सन १८५९ सालच्या एप्रिलच्या ६ तारखेस मडगांव येथें या साप्ताहिक पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. आजपर्यंत निघालेलीं सदरील सर्व पत्रें सरकारी, निम-सरकारी व सरकार धार्जिणीं होतीं. गोव्यांतील लोकपक्षीय पहिलें पत्र तें हेंच. मागच्या सर्व

पत्रांची छपाई सरकारी छापखान्यांत होई; पण या पत्रासाठीं छापखानाहि स्वतंत्र थाटण्यांत आला. या पत्राचे संस्थापक व आद्य संपादक बेर्नार्दु फ्रांसिस्कु द कॉश्त हे असून ता. १५ ऑगस्ट स. १८६७ पर्यंत संपादकीय जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यानंतर सप्टेंबर १८६७ पासून १५ मार्च १९११ पर्यंत आंतोनियु आनाश्ताझियु ब्रूत द कोश्त हे त्याचे संपादक होते. पुढे त्यांचा मुलगा ब्राझ आंतोनियु ब्रूत द कॉश्त हे संपादक झाले. १९११च्या एप्रिलपासून फेब्रुवारी १९३०पर्यंत संपादकीय जबाबदारी ब्राझ द कॉश्त यांकडे होती. फेब्रुवारींत त्यांच्या निधनानंतर आल्व्हरु व्हियेगश् हे त्याच्या संपादकीय खुर्चीवर आले. या पत्राचा आकार मोठा असे.

ता. २ नोव्हेंबर १९०५ पासून या साप्ताहिकाचे द्विसाप्ताहिकांत रूपांतर झालें. ब्राझ द कॉश्त हे संपादक असतांना त्यांचे कनिष्ट बंधु रौबेर्तु द कॉश्त हे या पत्राचे सहसंपादक होते. यांची लेखणी सडेतोड होती. गव्हर्नर जनरल फ्रैतश् रिबैरु यांच्या कारकिर्दींत कौंसिल बहिष्काराच्या चळवळींत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता व त्यासंबंधीं आपल्या पत्रांतून सडेतोड लिखाण प्रसिद्ध केले होतें.

या पत्रांतील लेख पूर्वी धर्मवेडापासून अलिप्त व निर्भीड असल्यानें आर्चबिशपनीं एकदां त्यावर बहिष्कारहि घातला होता. पण पुढें त्याच्या त्या वृत्तींत फरक पडत गेला. अखेरच्या कालांत संपादकीय जबाबदारी आंतोनियु द कॉश्त यांकडेहि होती. पुढें लवकरच हें पत्र बंद पडलें आणि त्याचा छापखानाहि विकून टाकण्यांत आला.

अ ईंदिअ पुर्तुगेझ — हें साप्ताहिक एम्. एल्. मिरांद फ्रांकु यांनी ता. ४ जानेवारी १८६१ रोजीं मडगांव येथें सुरू केलें. पुढें ता. १३ मे १८६६ ते ता. १७ मे १९०२पर्यंत जुझे इनासियु लॉयॉल हे त्याचे संपादक झाले व त्यांनी त्याचें कार्यालय ओडली येथें नेलें. त्यांनी लगेच त्याचें प्रकाशन द्विसाप्ताहिक केलें. त्यांच्या निधनानंतर ता ४ जून १९०२ ते २१ ऑगस्ट १९११ पर्यंत त्यांचे बंधु आव्हेर्तुं द लॉयॉल यांनी तें चालविलें. त्यांच्यामागें २२ ऑगस्ट १९११पासून ९ ऑगस्ट १९१२पर्यंत तें बंद राहिलें. पुढें १० ऑगस्ट १९१२ ते १४ सप्टेंबर १९१८पर्यंत हें पत्र मिगेल लॉयॉलु फुर्तादु यांच्या संपादकत्वाखालीं चाललें आणि १५ सप्टेंबर १९१८ ते १८ एप्रिल १९१९ पर्यंत पुन्हां बंद पडलें. यानंतर ता. १९ एप्रिल १९१९ पासून २६ नोव्हेंबर १९२१ पर्यंतच्या कालांत व्हिसेंति द ब्रागांस कुंज्य यांनी त्याची संपादकीय जबाबदारी स्वीकारली. पण पुनः तें बंद पडलेंच. पुढें १९२२पासून १९३०पर्यंत माजोर्डें येथें पाद्रि आंतोनियु ग्रॅगॉरियु द कॉश्त यांनीं तें चालविलें आणि त्यानंतरहि तें चौथ्यांदा बंद झालें. कांहीं कालानंतर माजोर्डें येथून या पत्राचें मडगांवला स्थलांतर झालें आणि सध्या तें साप्ताहिक स्वरूपांत मि. लेवोनॉर द लॉयॉल फुर्तादु इ फेर्नांदिश् यांच्या संपादकत्वाखालीं मडगांवला लहान आकारांत निघत आहे. गोमंतक मुक्त झाल्यापासून शेवटच्या 'पुर्तुगेझ' या अक्षरांना काट दिली असून 'अ ईंदिअ' एवढेंच नांव त्या पत्रावर येत आहे.

गोमंतकीय नियतकालिकें

— ४ —

पोर्तुगीज वृत्तपत्रें २

अ फॅनिक्स द गोअ — हें साप्ताहिक पत्र बार्देश येथील कळंगूट गांवांत सन १८६१ त एप्रिलच्या ६ तारखेस सुरू झालें. याचा आकार लहानसाच होता. याचे मुख्य संपादक दियोगु आलैशु गॅाइश् आणि जबाबदार संपादक बेंझ्यामीं प्रोयेंस हे होते. हें पत्र फार काल टिकूं शकलें नाहीं. दुसऱ्याच वर्षी ता. ३०-१२-१८६२ रोजीं तें बंद झालें.

अ आर्मोनीअ — हें पत्र पणजी येथें ता. १२ एप्रिल १८६२ रोजीं सुरू झालें आणि त्याचा अखेरचा अंक २७ ऑक्टोबर १८६४ रोजीं कसा तरी निघाला. याचे संपादक गुस्ताव्ह आदोल्फु फ्रीअम हे होते.

अ आउरॅार द गोअ — हें साप्ताहिक बेंझ्यामीं प्रोयेंस यानें ता. ६ जानेवारी १८६३ रोजीं सुरू केलें आणि ता. १ जुलै १८६५ रोजीं त्याचा अखेरचा अंक निघाला. याचा आकार लहान असून हें पत्र कळंगूट येथें निघत असे.

अ सेंतिनॅल द लिंर्दादि — हें मोठ्या आकाराचें साप्ताहिक पत्र बाणावली (सासष्टी) येथें आगोस्तिज्यु का. ब्रा. को. आफोंसु यांनीं ता. ७-१०-१८६४ रोजीं सुरू केलें आणि ता. ३१-१२-१८६९ रोजीं निघालेला त्याचा अंक शेवटचा ठरला. याचे मुख्य संपादक जुआंव ज्यो. रॅाकि कुन्हैयु हे होते.

झ्यॅार्नाल द नोतीसिअ — हें साप्ताहिक ता. १-१०-१८६८ रोजीं रायबंदर येथें सुरू झालें आणि ता. ३०-४-१८६९ रोजीं त्याचा शेवटचा अंक निघाला. याचे संस्थापक बारांव द कुंभारजुअ आणि संपादक झासिंदु द कॅास्त कांपुश् व टॅामास द आकिनु मौरांव गारसेज पाल्य हे होते.

अ इम्प्रेंस — हें साप्ताहिक पत्र टॅामास मौरांव व इपॅालितु गार्सेज यांनीं ता. १८-१० १८७० रोजीं रायबंदर येथें सुरू केलें आणि १८७६ सालच्या एप्रिल महिन्यांत बंद केलें.

अ गाझेत द गोअ — पणजी येथें ता. १६-७-१८७२ रोजीं सॅर्तोरियु कुयेल्यु यांनीं हें साप्ताहिक सुरू केलें. याचे संपादक सौज फ्रांक्रीन व पेन्दु आंतोनियु कुयेल्यु हे होते. हें ता. ३०-१२-१८७३ रोजीं बंद झालें.

ऊ मॅसाझ्यैरु — हें साप्ताहिक पत्र म्हापशें येथें ता. १६-८-१८७२ रोजीं सुरू झालें व त्याचा अखेरचा अंक ता. १२-११-१८७३ रोजीं निघाला. व्हिसेंति शाव्हियेर व्हाज हे याचे मुख्य संपादक असून इनासियु कायतान कारव्हाल्यु व व्हिस्कोंदि द बार्देश हे सहसंपादक होते.

ऊ पाईझ — याचे संपादक आरिस्तीदिश् द कोस्त हे असून प्रकाशक कायतानु मानुयेल रिबैरु हे होते. हें साप्ताहिक पत्र ता. ४-२-१८७३ रोजीं सुरू झालें व ता. २७ १०-१८७४ रोजीं त्याचा शेवटचा अंक प्रसिद्ध झाला. हें पत्र मडगांव येथें निघत असे.

ऊ प्रॅाग्रॅसु -- नवीन काबिजादींत सुरू झालेलें हेंच प्रथम पत्र. या साप्ताहिकाचा

आकार लहान असून त्याचे संपादक लुईज कुऱ्हैय द सिल्व हे होते. हें पत्र ता. ७-४-१८७३ रोजीं पेडणें येथें सुरू झालें आणि त्याचा अखेरचा अंक ता. २१-६-१८७३ रोजीं निघाला.

ओपिनियांव पूब्लिक -- सासष्टीतील ओडली येथें ता. २-७-१८७३ रोजीं या साप्ताहिकाचा जन्म झाला. याचे संस्थापक ब्राझ पेरैर आलेमांव व संपादक आन्हेर्तानु द लॅयॉल हे होते. याचा आकार लहान होता. ता. २२-१२-१८७५ रोजीं या पत्राचा जो अंक निघाला तो शेवटचा ठरला.

ऊ ओरियेंति -- हें साप्ताहिक ता. ७-३-१८७४ रोजीं बार्देशच्या कामुर्ली येथें संपादक इनासियु कायतानु कारव्हाल्यु यांनीं सुरू केलें. ता. २७-११-१८७४ रोजीं याचा शेवटचा अंक निघाला.

गाझेत द बार्देझ -- हें साप्ताहिक पत्र ता. १७-१०-१८७४ रोजीं आसगांव (बार्देश) येथें सुरू झालें. याचे संपादक जुआंव कायतानु आव्हेलिनु रुझारियु नाझारेत हे होते. ता. २२-१-१८८४ च्या अंका नंतर तें विसावलें व पुन: १८८७ च्या जानेवारींत सुरू होऊन जूनच्या सुमारास बंद झालें.

नॉव्ह गोअ — पणजी येथें आंतोनियु नूनिश् ओलिव्हैर यांनीं हें साप्ताहिक पत्र ता. ४-५-१८७६ रोजीं सुरू केलें आणि त्याचा शेवटचा अंक १२-३-१८७८ रोजीं निघाला.

अ क्रूझ — पाद्रि मानुयेल आगोस्तींज्यु कारव्हाल्यु आणि पाद्री आ. आल्व्हरिश् यांनीं हें पत्र पणजी येथें ता. १५-७-१८७६ रोजीं सुरू केलें. २६-७-१८८२ रोजीं याचा अखेरचा अंक निघाला.

अ पात्रिअ — हें पत्र ता. १०-१-१८७७ रोजीं म्हापशें येथें सुरू झालें आणि ता. १४-१२-१८९४ चा अंक निघतांच बंद पडलें. कायतानु फ्रां. येन्हीकिश व इनासियु कायतानु कारव्हाल्यु हे त्याचे संपादक होते. जुझे मारिअ लोबु यांनीं ६-१०-१९०० रोजीं तें पुनः सुरू करून २७-९-१९०१ रोजीं त्याचा अखेरचा अंक प्रसिद्ध केला.

अ सिव्हिलिझासांव — हें साप्ताहिक ता. ६-२-१८७७ रोजीं रायबंदर येथें फ्लासिदु द कॅास्त कांपुश व आंतॅानियु द सौझ यांनीं सुरू केलें. २८-११-१८७८ रोजीं याचा शेवटचा अंक प्रसिद्ध झाला.

ऊ इम्पार्सेयाल — तॉलेंतिनु गाब्रियेल फेर्नांदिश् यांनीं म्हापशें येथें ता. १-७-१८७८ रोजीं हें पाक्षिक पत्र सुरु केलें. पुढें मासिक स्वरूपांत निघून ऑगस्ट १८९९ चा त्याचा अंक शेवटचा ठरला.

अ उनियांव -- हें साप्ताहिक कळंगूट येथें ता. ५-९-१८७८ रोजीं सुरू झालें व ता. १८-१०-१८८० नंतर बंद पडलें. व्हॅसेस्लाव प्रोयेंस व मा. द. सौझ हे त्याचे संपादक होते.

अ सॅमान — हें पत्र मडगांव येथें ता. ४-३-१८८० रोजीं सुरू झालें व ता. १०-९-१८८० रोजीं बंद झालें. आंतॅानियु जुआंव रुद्रीगिश् हे त्याचे संपादक होते.

अ व्हॅर्दादि — एफ्. एल्. रेगु यांनीं हें

पत्र ता. १६-७-१८८२ रोजीं सुरू केलें. याचा आकार मोठा होता. या पत्राचा अखेरचा अंक ता. ३१-१२-१८८५ रोजीं निघाला.

ऊ यॅकु पोपुलार -- कळंगूट येथें ता. ७-१-१८८३ रोजीं हें सुरू झालें आणि ता. ७-८-१८८४ रोजीं शेवटचा अंक निघून बंद झालें. एस्. सौझ याचे प्रकाशक होते.

ऊ कुऱ्हैयु द ईंदिअ — हें पत्र साप्ताहिक स्वरूपांत पणजी येथें ता. ७-८-१८८३ रोजीं सुरू झालें. याचे संपादक बॅ. आदेलिनु सांतुश् फेर्नांदिश् व्हाज हे होते. ता. २८-१२-१८९२ च्या अंकानंतर यानें विसावा घेतला. ता. १४-९-१९११ रोजीं हें पत्र पुनः सुरू झालें. यावेळीं त्याचे संपादक जुझे लुईस द सौझ फ्रांक्रीन हे होते. याचा आकार मोठा असून त्याचें दैनिकांत रूपांतर झालें होतें. ता. ३१-११-१९१२ नंतर तें पुनः साप्ताहिक झालें व ता. ८-४-१९१३ नंतर कायमचें बंद झालें.

ऊ कुऱ्हैयु द गोअ — हें पत्र पर्वरी (बार्देश) येथें ता. ७-८-१८८३ रोजीं इपॉलितु कायतानु पिंतु यांनीं सुरू केलें. पुढें २१ जून १८८४ पासून तें म्हापशें येथें निघूं लागलें आणि १४-४-१८८८ तारखेच्या अंकानंतर तें बंद झालें.

ऊ क्रॅंति — पाद्रि आल्मैद यांनीं ता. ९-८-१८८३ रोजीं हें साप्ताहिक फोंडें येथें सुरू केलें व पुढें अल्पावधींतच तें बंद झालें.

पेरियॉदिकु दु पोव्हु — हें पत्र सां तॉमे येथें ज्योआकीं द कों. आंतांव यांनीं ता. २५-१०-१८८३ रोजीं सुरू केलें. ता. ७-१०-१८८५ नंतर त्याची संपादकीय जबाबदारी पाव्होलीनु आंतांव याकडे आली आणि ११-१२-१८८६ नंतर तें बंद झालें.

ऊ प्रॉग्रेसु द गोअ — हें साप्ताहिक पणजी येथें १८८३ सालीं जानेवारींत सुरू झालें व त्याच सालच्या नोव्हेंबरांत बंद झालें.

दि टाइम्स ऑफ गोवा — गोव्याचें हें पहिलें इंग्रजी साप्ताहिक असून तें ता. २१-९-१८८५ रोजीं पणजी येथें सुरू झालें. याचा आकार मोठा होता. चार वर्षें कसें तरी चालून १८८९ सालीं या पत्रानें आपली जीवनयात्रा संपवली.

अ दिस्कुसांव — हें साप्ताहिक पणजी येथें ता. १२-८-१८८६ रोजीं सुरू झालें आणि १८८९ सालीं तें बंद पडलें. याचे राजकारणी संपादक मार्तिंज्यु मिनेझिस आणि वाङ्मयीन संपादक क्रिस्तोव्हं पिंतु असे होते.

अ कोंव्हिक्सांव — हें पत्र साळगांव येथें ता. १५-१-१८८७ रोजीं सुरू झालें व ९ वर्षांनीं म्ह. १८९५ अखेर बंद झालें. गुस्ताव्हु फ्रिअस्, लॅवापोल्दु गाम व पास्कोआल गॉमिश् असे याचे तिघे संपादक होते.

फार्पस — लहान आकाराचें हें साप्ताहिक मडगांव येथें १८८७ सालीं सुरू होऊन १८८८ त बंद पडलें.

ऊ रेपोर्तेर द ईंदिअ — या साप्ताहिकाचा जन्म ता. ३-१०-१८८८ सालीं पणजी येथें झाला आणि ता. २२-३-१८८९ चा अंक निघून तें बंद पडलें.

अ देमोक्रासीअ — मडगांव येथें ता. ११-१०-१८८८ रोजीं या पत्राचा आरंभ

होऊन – ३-१० – १८८९ च्या अंकानें शेवट झाला. कातांव द कॉस्त याचे संपादक होते.

ओर्तीगश् — ज्योआकीं व्हितोरिनु बान्हेतु मिरांद यांनीं हें पत्र मडगांव येथें ता. १ – १ – १८८९ रोजीं सुरू केलें आणि १८९० सालींच ते बंद पडलें.

मांदोव्ही — जुझे मारीअ पेरैर यांनीं १८९० च्या जुलै महिन्यांत हें पत्र पणजी येथें सुरू केलें आणि १८९१ त तें बंद झालें.

ऊ व्हिति इ ऊं द सेतंब्रु — हें वृत्तपत्र २८ – १० – १९८० रोजीं पणजी येथें सुरू झालें आणि २९ – १२ – १८९२ ला बंद पडलें.

अ व्हॉज दु पोव्हु — हें पत्र ता. ७ ११ – १८९० रोजीं कळंगूट येथें सुरू झालें, आणि १९०७ सालीं बंद झालें. याचे आरंभीचें संपादक पियेदादि सॅर्तोरियु मार्तींस हे असून १८१८ पासून फ्रांसिस्कु शाव्हियेर द आंसुसांव हे होते.

कॉन्हॅास्पाँदेंसिअ द गोअ — पणजी येथें हें साप्तांहिक १८११ सालीं जानेवारींत सुरू होऊन फेब्रुवारी महिन्यांत अचानक बंद झालें.

गाझेत द ईंदिअ — हें पत्र ता. १-२ - १८९३ रोजीं कांदोळी येथें सुरू झालें व ता. २६ - ५ - १८९४ नंतर अडफडें येथें प्रसिद्ध होऊं लागलें. ता. १८ - ८ - १८९४ रोजीं हें बंद झालें. फ्रांसिस्कु पिंतु याचे संपादक होते.

ऊ इंव्हेस्तिगादोर — या पाक्षिकाचा आरंभ मडगांव येथें ता. २९ - १ - १८१४ रोजीं सोआरिश् रेबेलु यांनीं केला आणि २१-७ - १८१४ रोजीं त्याचा अंत झाला.

नोतीसिअस — ज्योआकीं व्हि. बान्हेतु मिरांद यांनीं मडगांव येथें ता. १ - १ १८१४ रोजीं हें पत्र सुरू केलें. आरंभीं आकार मध्यम होता. नंतर १८१७ पर्यंत छोट्या आकारांत हें त्रैमासिक स्वरूपांत निघूं लागलें. पुढें द्विसाप्ताहिक, साप्ताहिक आणि नंतर पाक्षिक होऊन ११३५ सालीं संपादकांच्या मृत्यूनंतर बंद पडलें.

ऊ ब्रादु इंदियानु — हें पत्र १५ - १२-१८१४ रोजीं पणजी येथें सुरू झालें. याचे संपादक बॅर्नार्दु द सिल्व हे होते. या साप्ताहि-कांचा शेवटचा अंक ता. १२ - १०-१८१५ रोजीं प्रसिद्ध झाला.

ऊ लिबॅराल — आलैशु काझिमिरु लोबु यांनीं हें लहानसें मासिक १८१५ च्या जाने-वारींत कळंगूट येथें सुरू केलें आणि त्याच सालीं ऑक्टोबरांत शेवटचा अंक निघून तें बंद पडलें.

ऊ पाईझ — या पाक्षिकाचा जन्म १-१ - १८१५ रोजीं पणजी येथें झाला आणि त्याच सालच्या ऑक्टोबरांत त्याचा अखेरचा अंक निघाला.

अ येव्होलुसांव — हें साप्ताहिक पत्र कोंदि द मयें यांनीं २ - १ - १८१५ रोजीं पणजी येथें सुरू केलें व तें १३ - ११ - १८१५ रोजीं बंद केलें. त्याचे कार्यकारी संपादक लेओपॉल्दु सि. द गाम हे होते.

बिब्लियॅातॅक द नोतीसिअस् — हें मासिक १८१५ त ऑगस्टमध्यें सुरू होऊन नोव्हेंबरांत बंद झालें.

— ५ —

पोर्तुगीज वृत्तपत्रें ३

अ यॅर नॉव्ह — या साप्ताहिकाचा जन्म पणजी येथें १८९७ सालीं नोव्हेंबरच्या ३ तारखेस झाला. १९०२ पासून हें दैनिक स्वरूपांत निघून दुसऱ्या सालच्या एप्रिलांत बंद पडलें. हें पत्र कॉंदि द मयें यांच्या तर्फे चालत होतें.

ऊ पोर्तुगेज — फ्रांसिस्कु मौरांव गार्सेज पाल्य यांनीं हें पत्र पणजी येथें १८९७ त सुरू केलें आणि १९०१ च्या नोव्हेंबरांत बंद केलें.

ऊ आथलेत — हें साप्ताहिक म्हापशें येथें १८९९ त सुरू झालें आणि १९०६ च्या डिसेंबरांत बंद पडलें. ज्योआकीं काझिमिरु द आराऊझ्यु हे याचे संपादक होते.

ऊ ॲरगल्दु — दि. २२ जानेवारी १९०० रोजीं हें दैनिक मेसीअश् गॅामिश् यांनीं पणजी येथें सुरू केलें. १९०१ सालच्या सप्टेंबरपासून मे १९०८ पर्यंत आंतोनियु मारीअ द कुंज्य यांनीं त्याची धुरा वाहिली. १९१० ते १९१४ पर्यंत सालिश् द आंद्रादि हे त्याचे चालक होते. पुढें १९१९ पर्यंत झ्याकारिअश् दीअश् यांकडे त्याची जबाबदारी आली आणि त्यानंतर बदल होऊन दो. आमादेव प्राझेरिश् द कॅास्त हे त्याचे संपादक झाले. सध्या या दैनिकाची जबाबदारी कार्यकारी संपादक या नात्यानें दो. कार्मु आझेव्हेदु यांकडे आहे. आरंभींच्या कालांत तीन खेपा आणि १९२०–२१ या कालांत एक अशा चार खेपा हें दैनिक बंद पडलें होतें. गोव्यांतील स्वतंत्र असें हें पहिलेंच दैनिक होय. प्रजेच्या अनेक अडचणी या पत्रानें त्यावेळीं वेशीवर टांगल्या; पण पुढें तें सरकारबाजूनें कललें. पोर्तुगिजांच्या अखेरच्या कालांत तर तें सरकारधार्जिणेंच बनलें होतें. गोमंतकाच्या मुक्ततेपासून पुनः या पत्रांत जरा निःस्पृहपणा दिसत आहे. आजच्या चारहि गोमंतकीय पोर्तुगीज दैनिकांत हेंच पत्र सध्या आघाडीवर आहे.

ऊ नासियोनालिस्त — हें साप्ताहिक सां तॉमे येथें १९०४ ते १० पर्यंत लिगॅारियु द कुंज्य यांनीं चालविलें. याचा आकार मोठा असून त्यांत दो. मिनेझिस ब्रागांस हेहि लिहीत असत.

ऊ बार्देझानु — म्हापशें येथें रौबॅर्तु जुआंव लोबु यांनीं १९०४ सालीं हें साप्ताहिक सुरू केलें व तें लगेंच बंदहि झालें.

ऊ ईंदियु — १९०४ ते ८ पर्यंत हें साप्ताहिक पत्र चिंचोणें येथें राइमुंदु तोन्हिश् दीअश् यांनीं चालविलें.

ऊ ओरियेंति — हें साप्ताहिक म्हापशें येथें आलैशु झ्यॅरॅानिमु ब्रागांस यांनीं मार्च १९०५ पासून फेब्रुवारी १९०६ पर्यंत चालविलें.

दिआरियु द गोअ — हें दैनिक एलिझाब्रेत रुद्रीगिश् यांनीं ऑक्टोबर १९०५ पासून फेब्रुवारी १९०६ पर्यंत पणजी येथें चालविलें.

यॅकु द ईंदिय — १९०५ सालीं सप्टेंबरांत दैनिक स्वरूपांत सुरू झालेलें हें पत्र पुढें साप्ताहिक होऊन १९०७ च्या जूनमध्यें बंद झालें. याचे संपादक प्रथम बॅर्नार्द गॅामिश्

व नंतर दामास्सॅनु कॅास्त हे होते.

अ रॅफॉर्म — दो. तॅामास नॉरॉंज्य यांनीं हें साप्ताहिक पणजी येथें ऑक्टोबर १९०५ ते जानेवारी १९०६ पर्यंत चालविलें. हें निर्भीड होतें, त्यामुळें तें सरकारी रोषासबळी पडलें.

ऊ इंपार्सिआल — १९०६ सालीं मार्च ते ऑगस्ट पर्यंत पणजी येथें हें साप्ताहिक चाललें. याचे संपादक फ्रॅदॅरिकु दिनिज हे होते.

ऊ पिग्मेउ — १९०८ च्या फेब्रुवारींत पणजी येथें जे. एम्. कॅास्त यांनीं हें दैनिक सुरू केलें व दोन वर्षें चालविलें. पुढें जुझे कास्त्रु यांनीं जून १९१० त त्रिसाप्ताहिक स्वरूपांत त्याचें पुनरुज्जीवन केलें; पण तें धड पांच महिनेहि चाललें नाहीं. हें टारगट होतें.

ॲराल्दु — ता. २१ मे १९०८ रोजीं हें दैनिक पणजी येथें सुरू झालें. हें ख्रिस्ती-धर्मवादी होतें. तथापि त्यांत कांहीं अभ्यास-पूर्ण लेख व चुरचुरीत बातम्या येत. याचे आद्य संपादक दो. आंतॅानियु मारीअ द कुंज्य हे होते. त्यांच्या मागें गोवामुक्तीपर्यंत तें सांतारितु व्हाज यांनीं चालविलें आणि मुक्ती-नंतरचा काल त्यांनां उदासवाणा भासल्यानें त्यांनीं पोर्तुगालकडे प्रयाण केलें. पोर्तुगिजांच्या अखेरच्या कालांत हें दैनिक पूर्णतया सरकार-धार्जिणें बनलें होतें.

ऊ आरियानु — जुलै १९०८ ला हें साप्ताहिक चिंचोणें येथें सुरू झालें, व तीनच वर्षांनीं बंद झालें. पुन: १९१४ त मडगांव येथें सुरू होऊन १९१५ च्या डिसेंबरांत कायमचें बंद झालें. याचे संपादक दो. लौरेंसु कायतानु मोंतैरु हे होते.

ऊ फुतूरु — बार्देशच्या वाडें गांवांत जुझे फ्रां- एंन्हीक यांनीं हें पत्र १९०९ च्या एप्रिल पासून १९१७ च्या जानेवारीपर्यंत चालविलें.

ऊ कॅामॅर्सियु — हें पत्र १९०९ सालच्या ऑक्टोबरांत दो. गॅामिश् पेरैर यांनीं पणजी येथें सुरू केलें. पुढें दैनिकांत रूपांतर होऊन तें १९१२ च्या डिसेंबरांत बंद झालें.

ऊ दॅबाति — हें साप्ताहिक १९११ च्या एप्रिलांत सुरू झालें व १९२१ च्या फेब्रुवारींत बंद झालें. याचे संपादक दो. मिनेझिश् ब्राग्रास हे होते हें निर्भीड व उच्च विचारांचें होतें.

ऊ पोपुलार — या साप्ताहिकाचा जन्म १९११ च्या ऑक्टोबरांत वार्के येथें झाला, आणि १९१२ च्या मे मध्यें त्यानें विसावा घेतला. याचे संपादक आल्बॅर्तानु द लॅायॅाल हे होते.

ऊ पोव्हु — हें द्विसाप्ताहिक १९१२ त तेऑफिलु आल्व्हरिश् यांनीं मडगांव येथें सुरू केलें व तें १९१३ त बंद पडलें.

झ्यॅार्नाल द ईंदिअ — दो. जुझे इनासियु लॅायॅाल यांनीं हें साप्ताहिक ओडली येथें १९१३ च्या मार्चमध्यें सुरू केलें आणि त्याच सालच्या ऑगस्ट मध्यें तें बंद झालें.

बोलेर्तीं दु कॅामॅर्सियु — पणजी येथें फोर्तुनातु द ब्रागांस यांनीं हें साप्ताहिक १९१३ च्या मार्चमध्यें सुरू केलें. बरोबर दोन वर्षांनीं तें बंद पडलें. पुढें १९२२ त नव्यानें एक महिना चालून मग कायमचें विसावलें.

अ पात्रिअ — १९१३ सालीं ऑगस्टांत

याचा जन्म झाला आणि १९१४ च्या ऑक्टोबरांत तें अंतर्धान पावलें. यांत मराठी विभागहि येत असून त्याचे संपादक कै. रा. म. देशपांडे हे होते. या पत्राचे पूर्व संचालक आल्बॅर्तु मिनेझिस् स्पिनॅाल हे असून १९१९ च्या पुनर्जीवनाच्या अल्प कालांत आदोल्फु कॅास्त हे होते.

रॅग्राति — ओडली येथें जुझे इनासियु लॅायॅाल यांनीं १९१३ च्या ऑक्टोबरांत सुरू केलेलें हें साप्ताहिक १९१४ च्या जूनमध्यें अंतर्धान पावलें.

व्हिद नॅाव्ह — हें साप्ताहिक १९१३ च्या नोव्हेंबरांत सुरू झालें व १९१७ च्या सप्टेंबरांत बंद झालें. याचे संपादक प्रथम सिप्रियानु द गाम व नंतर रॅाझु द गाम हे होते.

झ्यॉर्नाल दु पोव्हु — पणजी येथें १९१४ त सुरू होऊन १९१८ त हें बंद झालें. या साप्ताहिकाचे संपादक फ्रुदेंति द मिनेझिस् हे होते.

लांतॅर्न — जुझे इनासियु लॅायॅाल यांनीं हें साप्ताहिक १९१४ त सुरू करून १९१६ त बंद केलें.

ऊ लिबेराल — साळगांव येथें मार्सेलु फेर्नांदिश् यांनीं १९१६ ते १९ पर्यंत हें साप्ताहिक चालविलें.

अ तॅन्ह — उल्त्रामार पत्राच्या संपादक मंडळांतून निघून लिबॅरियु पेरैर यांनीं हें द्विसाप्ताहिक मडगांव येथें १९१७ च्या जानेवारींत सुरू केलें. हिंदुविरोधक लिखाण यानें बरेंच प्रसिद्ध केलें. बरींच वर्षें चालून हें पुढें बंद पडलें.

ऊ प्रॅाग्रेस्सु — म्हापशें येथें कायतानु द रोझारियु फारीअ यांनीं हें साप्ताहिक १९१७ च्या मार्च मध्यें सुरू केलें व १९१९ च्या नोव्हेंबरांत त्याचा अखेरचा अंक निघाला.

ओपिनियांव — (आरंभ १९१७ व शेवट १९१९). जुझे इ. लॅायॅाल यांनीं प्रथम ओडली व नंतर वास्को येथून हें पत्र चालविलें.

ऊ पोर्तुगेज — हें साप्ताहिक राफायॅल द मिरांद यांनीं १९१९ च्या जूनमध्यें पणजी येथें सुरु केलें. १९१९ च्या सप्टेंबरच्या २६ तारखेच्या अंकानंतर तें बंद झालें.

नासियॅानाल — १९१९ च्या नोव्हेंबरांत राफायॅल द मिरांद यांनीं पणजी येथें हें साप्ताहिक सुरू केलें आणि १९२० सालीं मार्च मध्यें बंद केलें.

दिआरियु द नोइति — ता. १ डिसेंबर १९१९ रोजीं हें दैनिक पणजी येथें सुरू झालें. याचे आद्य संपादक लुईज द मिनेझिस् हे होते. भरमसाट विधानें व परधर्मद्वेष या बाबतींत याचें वैशिष्ट्य असे. पोर्तुगिजांच्या गोव्यांतील अखेरच्या कालांत हें पत्र पूर्णपणें सरकारधार्जिणें बनलें होतें. त्यावेळीं पणजीच्या तिन्हीं दैनिकांना सरकारी मासिक ग्रँट मिळे. आद्य-संपादकांचा मुलगा लुईज द मिनेझिस् च या पत्राचे आजचे संपादक आहेत.

अ त्रिबून — लिनु व्हालेरियु द सौज व आंतोनियु सौज प्रोयेंस यांनीं हें साप्ताहिक कळंगूट येथें १९२० च्या जानेवारींत सुरू केलें. पुढें १९३० नंतर तें बंद पडलें.

प्रोव्हींसिअ — पोर्तुगीज पत्रकार पेरैर बाताल्य हे या साप्ताहिकाचे संपादक असून त्यांत निर्भीड व सडेतोड लेख येत असत.

पाद्रीशाही व धर्मवेड यांवरील यांतील लेख मार्मिक असत. हें १९२० त सुरू झालें व १९२२ च्या मार्च महिन्यांत बंद झालें.

ईदिंअ पोर्तुगेज — हें दैनिक पणजी येथें १९२६ त सुरू होऊन अल्पावधींत बंद झालें.

अ लूज दु ओरियेंति — हें पोर्तुगीज मासिक भि. रा. पां. वैद्य यांनीं १९०९ सालीं फोंडें येथें सुरु केलें व १९१४ त तें बंद झालें. याचे जबाबदार संपादक कै. सीताराम वि. केरकर हे होते. पोर्तुगिजांना हिंदी संस्कृतीची जाणीव देणें हें याचें ध्येय होतें.

प्रकाश — पणजी येथें हिंदु पुढाऱ्यांकडून २२ मार्च १९१८ रोजीं या द्विसाप्ताहिकाची सुरवात झाली. उच्च विचार, सुंदर भाषा निर्भीड चर्चा व लोकहिताची दृष्टि यांमुळें हें पत्र अल्पावधींत लोकप्रिय झालें. दो. व्यंकटेश विनायक सूर्यराव सरदेसाई हे याचे संपादक होते. १९२९ च्या नोव्हेंबरांत सेंसरच्या जाचांमुळें तें बंद करण्यांत आलें.

प्रदीप — प्रकाश बंद होतांच डॉ. बाळकृष्ण द. साखरदांडे यांनीं ४ डिसेंबर १९२९ रोजीं हें साप्ताहिक सुरु केलें. याचेंहि धोरण 'प्रकाश' चेंच असल्यानें सरकार, सरकारी कर्मचारी व सरकारधार्जिणे यांना त्याचा फार वचक वाटे. सरकारशीं कायदेशीर झुंज देतां देतांच पुढें या पत्रानें विसावा घेतला.

अ व्हिद — हें पूर्ण ख्रिस्ती दैनिक आज २३ वर्षें मडगांव येथें सुरू आहे.

ओरियेंति पोर्तुगेज, बोलेतीं द मेदिसीन, बोलेतीं सानितारियु, गाझेत द रेळासांव, बोलेतीं द आग्रिकुलतूर अशीं कांहीं मासिकेंहि पणजीस निघत असत.

इग्यॉर्नाल दस् कोमुनिदादिश् — केपें येथें बाबासिअर बान्हुश् यांनीं हें सुरू केलें व कांहीं काल चालविलें.

वावराड्यांचो इष्ट — सासष्टींतील कांहीं लोकांनीं हें प्रथम चालविलें व आतां तें पिलारच्या सें. फ्रां. झेवियर संस्थेतर्फे पोर्तुगीज, कोंकणी व इंग्रजी भाषेंत सुरू आहे.

पोर्जेचो आधार — हें म्हापशें येथें कोंकणी भाषेंत कांहीं काल चालू होतें.

अ व्हॉज द ईदिअ — हें तडफदार दैनिक मडगांव येथें १९४७ त सुरू झालें व कांहीं कालानंतर सरकारी रोषामुळें बंद झालें. याचे संपादक दो. आंतोनियु सिकैर हे असून सहाय्यक श्री. गजानन विठ्ठल प्र. देसाई हे होते.

अ वांग्वार्द — हें साप्ताहिक म्हापशें येथें दहा वर्षांपासून चालू असून त्याचे संपादक रा. प्रभाकर तेंडुलकर हे आहेत.

नवहिंद टाइम्स — हें इंग्रजी दैनिक पणजी येथें १८ फेब्रुवारी १९६३ रोजीं सुरु झालें. याचे मालक श्री. वसंत श्री. धेंपे हे आहेत.

दिआरियु द गोअ — हें दैनिक मडगांव येथें सुरू आहे.

सत् — हें पहिलें कोंकणी दैनिक तडफदार संपादक श्री. फेलीसियु कार्दोझु यांनीं गतसालापासून मडगांव येथें सुरू केलें आहे.

जुनीं मराठी वृत्तपत्रें

सर्वसंग्रह

हें हस्तलिखित त्रैमासिक पुस्तक कळंगूट येथील वै. चंद्रोबा शेणवीं डुकले यांनीं हौस म्हणून सुरू केलें होतें. हें काव्यमय होतें. याचे किती अंक निघाले हें कळत नाहीं; पण पहिला अंक म्हापसें येथील कै. श्रीपाद शेणवीं वागळे यांच्या संग्रहीं होता. आंतील कांहीं पानें वाळवी लागून गेलीं होतीं. मलपृष्ठ नव्हतें. मुखपृष्ठावर 'कवितांचें त्रैमासिक सर्वसंग्रह' असें लिहिलें होतें. खालीं " शालिवाहन शके १७४७ चैत्रमास " असें लिहिलें होतें. त्यावरून तें सन १८२५ सालचें असावें असें दिसतें. आंत ओवी, अभंग, दिंड्या, साक्या अशा निरनिराळ्या वृत्तांत मजकूर होता. हेंच नांव पुढें मुंबई येथें सुरू झालेल्या माधव चंद्रोबा डुकले बंधु यांच्या मासिकास देण्यांत आलें असें दिसतें.

माधव व अनंत हे दोघे चंद्रोबा शेणवीं डुकले यांचे चिरंजीव. या दोघांनांहि घेऊन ते सन १८३३ च्या सुमारास मुंबईस गेले. त्यांचें शिक्षण सुरू असतांच वडिल वारले. संसाराचा भार माधवावर पडला. त्यानें औषधी दुकान व फोटोग्राफीच्या व्यवसायावर प्रपंच चालू केला आणि बंधूला योग्य शिक्षण देऊन डॉक्टर होण्यास मदत केली. पुढें उभय बंधूंनां संतकाव्याकडे आकर्षित होण्यासारखे कांहीं प्रसंग उपस्थित होऊन त्यांनीं एक कवितांचें मासिक सुरू करण्याचें ठरविलें आणि आपल्या या योजनेसाठीं एक शिळाप्रेस मुंबईला चालू करून सर्वसंग्रह या मासिकाचा संसार उभारला.

सन १८६० सालच्या मार्च महिन्याच्या १५ तारखेस सर्वसंग्रह मासिकाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. हें मासिक ८ वर्षें चाललें आणि १८६८ च्या आरंभीं बंद झालें. यांत रामायण, भारत, केकावली इ. काव्यें आलीं असून श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर यांच्या सटीप कविता प्रसिद्ध झाल्या. प्राचीन मराठी काव्याचें संशोधन करून तें शुद्ध स्वरूपांत छापण्याची महत्वाची कामगिरी या मासिकानें केली आहे. या कामीं डुकले बंधूंनां परशुरामपंत गोडबोले या पंडितांचें संपादकीय सहाय्य लाभलें होतें. या मासिकासाठीं डुकले बंधूंनीं बरीच झीज सोसली.

आनंद लहरी

पणजी येथील एक सुसंस्कृत नागरिक आणि तत्कालीन रसिक वाचकांचें मन वेधून घेणाऱ्या 'वेषधारी पंजाबी' या कादंबरीचे उत्साही लेखक कै. सूर्याजी सदाशिव महात्मे यांनीं आपल्या मित्रमंडळीच्या सहाय्यानें 'आनंद लहरी' मासिकाला जन्म दिला. कित्येक

पोर्तुगीज नियतकालिकें गोव्यांत निघत आहेत त्याचप्रमाणें एक मराठीहि नियतकालिक असावें अशा इच्छेनें त्यांची त्याबद्दल मित्र-मंडळींत चर्चा झाली. साप्ताहिक किंवा पाक्षिक सुरू करावें असा आरंभीं त्यांचा इरादा होता; पण नवीन प्रयत्न आणि जास्त भांडवलाचें काम म्हणून त्यांनीं मासिकच सुरू करण्याचें निश्चित करून सन १८७० सालीं मार्च महिन्यांत आपल्या 'आनंद लहरी' मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध केला. या मासिकाचा आकार क्रॉऊन असून पृष्ठें २४ व शिवाय कव्हर होतें यांत कविता, लघुकथा, लघुनिबंध आणि स्फुट विचार असा मजकूर येई. कव्हर पृ. ३ वर वर्तमानसार असे. स्फुट विचारांतून प्रचलित टिका येई. हें मासिक जेमतेम एक वर्ष चाललें.

देशसुधारणेच्छु

हें नियतकालिक सुरू करण्यास त्याचे संपादक कै. आत्माराम पुरुषोत्तम शेणवीं सुखठणकर यांना रायबंदर येथें राहाणारे तॉमाज मौरांव गारसेज पाल्यस् (बारांव द कुंभारझ्यूअ) यांचें बरेंच सहाय्य झालें. यापूर्वी यांच्याच सहाय्यानें दोन पोर्तुगीज पत्रें निघत होतीं. 'देशसुधारणेच्छु' मासिकाचा पहिला अंक रायबंदर येथें ता. १ जुलै सन १८७२ रोजीं प्रसिद्ध झाला. याचीं पानें आठ होतीं. हें मासिक फक्त तीन महिने चाललें आणि तिसऱ्या अंकाच्या प्रसिद्धीनंतर सप्टेंबरांतच बंद पडलें.

पुढें सन १८७७ सालच्या आरंभीं 'ओरियेंताल' नांवाच्या पाल्यस् यांच्या खास छापखान्याची व्यवस्था झाल्यानें तें त्या वर्षापासून वृत्तपत्र रूपानें पुन: प्रसिद्ध होऊं लागलें. देशसुधारणेच्छु वृत्तपत्राचा पहिला अंक ता. ३ जानेवारी सन १८७७ रोजीं प्रसिद्ध झाला. या साप्ताहिकाचे मराठी व पोर्तुगीज असे दोन विभाग होते. पोर्तुगीज विभागाची जबाबदारी गारसेज पाल्यस् यांच्यावर असून मराठी विभागाचे जबाबदार कै. यशवंत फोंडबा नायक दणाईत हे होते. वृत्तपत्राच्या स्वरूपांत पुन: प्रगट झालेल्या 'देशसुधारणेच्छु' साप्ताहिकासहि दुर्दैवानें अधिक आयुष्य लाभलें नाहीं. एकाच वर्षानें तें बंद पडलें. त्याचा ७ जानेवारी सन १८७८ चा अंक शेवटचा ठरला. याचा आकार लहानसाच होता. या वृत्तपत्राची कामचलाऊ कचेरीहि रायबंदर येथेंच होती.

देशसुधारणेच्छु साप्ताहिकाच्या पहिल्या सालच्या चौथ्या अंकांतील अग्रलेख असा होता :—

"पोर्तुगेज लोक जेव्हां गोमांतकसंबंधीं व्याख्यानें देत असतात, तेव्हां हा प्रांत ते केवळ परोपकार बुद्धीनें चालवीत आहेत असें प्रसिद्धपणें म्हणत असतात. इतकेंच नव्हे, परंतु त्याहीपेक्षां त्यांची परोपकारीक वासना

आपल्या मनांत बिंबण्यास्तव असेंहि म्हणतात कीं, 'आम्हीं हा देश सुधारूं व नाना तऱ्हेच्या शाळा स्थापून येथील लोकांना विद्यामृत पाजूं.' ही गोष्ट आम्हीं पदरची सांगतों असें नाहीं, परंतु ह्याच पोर्तुगेज अधिकाऱ्यांचीं जीं व्याख्यानें प्रसिद्ध झालीं त्यांत पाहिलें असतां दृष्टोत्पत्तीस येईल असे नाना तऱ्हेचे उद्‌गार वाचकांच्या लक्षांत बहुतेक वेळीं आले असतील हें निःसंशय आहे.

पोर्तुगेज लोकांनीं एतद्देशीय लोकांस विद्यामृत पाजिलें व पुढेंही पाजितील आणि त्यापासून लोकांस सांप्रत काळच्या लाभापेक्षां अधिक लाभ प्राप्त होतील हें आम्हीं नाकारीत नाहीं, परंतु येतद्देशीय लोकांच्या सुधारणुकेचीं साधनें जीं त्यांनीं येथें उपलब्ध करून ठेवलीं आहेत त्यांपासून आपल्या हिंदु लोकांस प्रायः उपयोग होत नाहीं, असें म्हटलें असतां चालेल याचें कारण सांप्रत ज्या येथ शेंकडों सरकारी शाळा आहेत त्या सर्व सांप्रतच्या राज्याधिकाऱ्यांच्या भाषेच्या आहेत. आणि त्यांत कांहीं हिंदु मुलें शिकावयास जातात पण त्यांस मुळीं आपल्या देशभाषेच्या व्याकरणाचें ज्ञान नसल्यामुळें परभाषेच्या व्याकरणांतील नियम त्यांच्या ध्यानांत पूर्ण ठसत नाहींत. तेणेंकरून ती भाषा त्यांना लवकर बोलण्यास कठीण पडते. तेव्हां अर्थांतच मुलें एक दोन वर्षें तीं काय, पण कोठें चार पांच महिने पर्यंत अभ्यास करून लागलींच शाळेकडे पाठ करून सोडून जातात. तर या गोष्टीकडे दयाळू असें म्हणविणारें सरकार कसें लक्ष देत आहे ?

हिंदु लोकांनीं अज्ञानीच होऊन राहावें अशी इच्छा आहे काय ? अहाहा ! सरकार तुझा दयाळूपणा व न्याय तो कशांत राहिला ?

येथील सुमारें एक लक्ष हिंदु प्रजेचा कर जो वर्ष प्रतिवर्षीं तुझ्या खजिन्यांत जात आहे त्याचा आपल्या लोकांसाठीं कां योग्य उपाय योजित नाहींस ? पहा, प्रजेचें अज्ञान दूर करून तीस ज्ञानरूप सूर्याच्या प्रकाशांत आणणें हा धर्म राजाचा आहे. वस्तुतः लोकांस ज्ञान नसल्यास अनेक तऱ्हेचीं राज्यांत दुर्व्यसनें निपजून लोक खराबीस पोंचतात. कां कीं, मनुष्यमात्राची स्वाभाविक ओढ सद्‌गुणांपेक्षां अधीक दुर्गुणांकडे असते.

तर आम्हीं ज्याच्या अंमलांत आहों त्या गोष्टीचा चांगला विचार करावा हें योग्य आहे आणि ह्या तऱ्हेचा प्रकार दिसून न येईल तर असा तर्क होतो कीं, हें सरकार आमचें पालन करण्याच्या उपयोगी नाहीं. केवळ प्रजेकडून द्रव्य घेण्याच्या संबंधानें आहे. उगीच हजारों रुपये फुकाचे खर्च करून शाळा स्थापाव्या आणि तेणेंकरून आपली कमतई करून घ्यावी यांत काय हांसल ?

हे दयाळू सरकार, त्वां पाठीस गळ लावून

घेण्याची जी क्रूर जत्रा ती बंद केली. आपल्या लोकांच्या धर्मास जें पूर्वी अनेक धोके प्राप्त होऊन त्यांपासून जीं अनेक संकट भोगावीं लागत. असले दुष्ट व जुलमी प्रकार बंद केले. अस्तु.

सुज्ञ सरकारास आमची इतकीच विनवणी आहे कीं, आपल्या लोकांचें उपर्युक्त विद्येकडे अगदींच दुर्लक्ष होऊन जी सध्या कस्पटाप्रमाणें निकृष्ट स्थिति झाली आहे तिची खरी कळकळ व लाज धरून येथें लिहिलें आहे. तें न्याय दृष्टीनें आपले अनाथ लोक अज्ञानांधःकारांतून ज्ञानकिरणांत येण्याकरतां एतद्देशीय जी महाराष्ट्र भाषा तिच्या प्रिमार्य शाळा स्थापाव्या व विद्येचें जीवन पाजून, परतंत्ररुप सागरांत जे जे गचकळ्या खात आहेत त्यांस स्वतंत्रतेच्या मार्गांत आणण्यास आपला परोपकारी हस्त पसरावा. येणें करून जो आपल्या लोकांच्या गळ्यास अनिर्वाच्य प्रेमबंधनाचा फांस पडेल त्याचे आपण कधींहि उतरायी होऊं शकणार नाहीं. ”

देशसुधारणेच्छु नियतकालिकाचे आरंभापासून अखेरपर्यंतचे मुद्रक व प्रकाशक गार्सेंज पाल्यस् हेच असून पुढील साप्ताहिक प्रकाशनाचे मालक व चालकहि तेच होते.

बॉलॅति दश् नॉव्हश् कोंकीस्तश्

नवीन काबिजादीचें वर्तमानपत्र म्हणून याचा पेडणें महालांतील पार्से येथें जन्म झाला. नवीन काबिजादींतील हेंच पहिलें वृत्तपत्र होय. हें साप्ताहिक असून मराठी व पोर्तुगीज असे याचे दोन विभाग होते. ता. ९ एप्रिल सन १८८२ रोजीं या वृत्तपत्राचा पहिला अंक निघाला. कै. गोविंद भास्कर पार्सेकर हे त्याचे संपादक व प्रकाशक होते. या वृत्तपत्राचें कार्यालयहि पार्से येथेंच होतें. नवीन काबिजादींतील सर्व भागांतून याचा प्रसार व्हावा अशी चालकांची इच्छा होती व त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्नहि चांगला केला होता; पण त्यावेळीं नवीन काबिजादींतील टपाल वितरण व्यवस्था ठीक नसल्यानें त्यांत त्यांना तितकेंसें यश आलें नाहीं. या पत्राचा आकार मोठा असून नवीन काबिजादीसंबंधींच्या अनेक प्रश्नांची यांत विस्तृत चर्चा येत असे. अग्रलेख, स्फूट विचार व वर्तमानसार असें लिखाण यांत नियमीत येई. अधून मधून पत्रें व इतर लेखहि येत असत. सन १८८२ पासून १८८६ च्या जानेवारीपर्यंत चार वर्षें हें वृत्तपत्र चाललें. १७-१-१८८६ चा या पत्राचा अंक अखेरचा ठरला.

— ७ —

जुनीं मराठी वृत्तपत्रें – २

गोवा - मित्र

मडगांव येथील जुन्या कालांतील एक विचारवंत सद्गृहस्थ, विद्वान् समाजधुरीण आणि मराठी भाषेचे अभिमानी भि. सुब्राव लक्ष्मण नायक हेच 'गोवा-मित्र' मासिकाचे संस्थापक, चालक, मालक व संपादक होते. इतस्ततः पोर्तुगीज वृत्तपत्रें निघत आहेत, पण त्यांतून हिंदुसमाजाच्या गरजा वेशीवर टांगल्या जात नाहींत; त्यांचा विचार होत नाहीं. आपल्या समाजाविषयीं तीं पत्रें कदर करीत नाहींत. तेव्हां त्यासंबंधींच्या विषयास वाहिलेलें आपल्या समाजाचें एक नियतकालिक चालू करावें व तेंहि मराठींतून असें त्यांनीं ठरविलें. त्यामुळें आवश्यक विषयांची हिंदुसमाजांत जागृति देण्याचेंहि एक महत्वाचें साधन उपलब्ध होईल अशा विचारानें त्यांनीं नियतकालिक सुरू करण्याचा विचार निश्चित केला.

स्वतंत्र छापखाना स्थापन करणें सहज-साध्य नसल्यानें त्यांनीं ओडली येथें 'ओपिनियांव पूब्लिक' पत्राच्या छापखान्यांत आपलें मासिक छापून घेण्याचें ठरवून त्यांत मराठी टाइप आणविण्याची जबाबदारी स्वतः स्वीकारली. कंपोज कामासाठींहि केणी उपनांवाचा एक हुशार मुलगा त्यांनीं नेमून दिला आणि अशा रीतीनें सन १८८२ सालच्या सुरवातीस 'गोवा-मित्र' प्रकाशनांत आला. हें प्रकाशन मासिक असलें तरी त्याचें स्वरूप वृत्तपत्राचें होतें. सगळीकडे टपालवितरणाची सोय ठीक नसल्यानें खेडवळ भागांतून दरमहा याच्या प्रती ठराविक खाजगी इसमांकडून पाठविण्यांत येत असत.

हें प्रकाशन पुढें पाक्षिक व साप्ताहिकहि करावें अशी चालकांची फार इच्छा होती. तथापि प्रतिकूल परिस्थितीमुळें आणि मुद्रण व इतर गैरसोयी सतावूं लागल्यानें मासिक प्रकाशनहि चालू ठेवणें त्रासदायक होऊन दुसऱ्याच वर्षीं म्हणजे सन १८८३ सालीं 'गोवा-मित्र' मासिक बंद करण्यांत आलें.

गोवात्मा

गोवा-मित्र मासिकाचे संपादक भि. सुब्राव लक्ष्मण नायक यांचे भागिनेय आ. व्यंकटेश रामचंद्र नायक यांनीं 'गोवात्मा' वृत्तपत्र काढण्याचें ठरवून त्यासाठीं स्वतंत्र मुद्रणालयहि थाटलें. याचा आकार 'भारत' पत्रासारखा लहानसाच असून त्यांत अग्रलेख, स्फुट विचार, वृत्तसार इत्यादि सदरें होतीं. 'गोवात्मा' पत्राचें प्रकाशन साप्ताहिक होतें. याचा पहिला अंक ता. ३ ऑगष्ट सन १८८५ रोजीं प्रगट झाला. याच्या प्रकाशनाच्या सुप्रसंगीं भि. सुब्राव लक्ष्मण नायक व इतर कित्येक सद्गृहस्थ उपस्थित होते.

'गोवात्मा' साप्ताहिक मडगांव येथें निघे. त्याचें मुद्रणालय व कार्यालय कोंब वाडींत संपादकांच्या निवासस्थानाजवळच असल्यानें घरांतील विद्यार्थी मुलांपैकींहि कांहीं मोठ्या हौसेनें कार्यालयांतील अल्प स्वल्प कार्यास हातभार लावीत. आ. व्यंकटेश नायक यांचे कनिष्ठ बंधु रायू नायक यांचा या पत्राच्या

व्यवस्थापकीय क्षेत्रांत बराच हातभार लागे. नवीन काबिजादींत 'गोवात्मा' पत्राचा प्रचार करून त्याला वर्गणीदार मिळविण्याच्या कार्यांत त्यांनीं बरेच श्रम घेतले. ठराविक इसमांकडून वृत्तपत्रांचे अंक रवाना करून ते दर आठवड्यास वर्गणीदारांच्या हातीं यावे अशी व्यवस्था त्यांनीं केली होती. त्यावेळीं टपालवितरण व्यवस्था सगळयाच खेड्यांतून यथातथाच होती. त्यांत नवीन काबिजादींत तर विचारूंच नये. इतकें सारें केलें, पण वर्गणी वसूल होण्याच्या बाबतींत मात्र जुनीं काबिजाद असो; नवीन काबिजाद असो सगळीकडे एकच अवस्था असे. त्यामुळें खर्चाच्या वेळीं कांहीं तरी वर्गणी हातीं येईल अशी अपेक्षा करणेंच चुकीचें ठरे. जाहिरातीहि नव्हत्या. हल्लीच्या प्रमाणें जाहिराती देण्याची पद्धतच त्यावेळीं नव्हती असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

अशा परिस्थितींतहि 'गोवात्मा' साप्ताहिक चार वर्षें पर्यंत चालल आणि सन १८८९ सालीं तें बंद पडलें. सन १८९१ सालीं तें पुन्हां चालू करण्याचा आ. व्यंकटेश रा. नायक यांचा विचार होता, पण प्रत्यक्षांत तसें कांहीं घडून आलें नाहीं. 'गोवात्मा' हेंच मडगांवचें पहिलें मराठी वृत्रपत्र होय.

आर्यबंधु

'आर्यबंधु' हें मासिक असून त्यांत मराठी-बरोबरच पोर्तुगीज विभागहि होता. सन १८८५ सालच्या ऑगष्ट महिन्यांत या मासिकाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. चालक वर्गांत आरंभीं ठीक उत्साह होता आणि याचें मराठी व पोर्तुगीज प्रकाशन पुढें निरनिराळें करावें असाहि विचार होता; पण पुढें तो उत्साह टिकला नाहीं. त्यामुळें पुरतें एक वर्षहि आयुष्य न लाभतां सहा महिन्याच्या अल्प-कालांतच 'आर्यबंधु' मासिक कालवश झालें. त्याचा ता. १६ जानेवारी रोजीं निघालेला अंक अखेरचा ठरला. हें मासिक म्हापशें येथें निघत असे.

गोवा - पंच

'गोव - पंच' हें पत्र साप्ताहिक असून पोर्तुगीज व मराठी असे त्यांत दोन विभाग होते. दणाईत, जोशी, वागळे, सावकार, तेलंग, खलप वगैरे म्हापशें येथील तत्कालीन पंच मंडळीच्या प्रमुखत्वानें 'गोवा-पंचाचा' जन्म झाला होता. त्यांच्या सामाजिक व राजकीय मतांचें तें दर्शन-पत्रच होतें असें म्हणणें अवास्तव नाहीं. सन १८८५ सालीं म्हापशें येथें या सात्पाहिक पत्राचा जन्म झाला. रा. श्रीपाद व्यंकटेश वागळे हे या पत्राचे आद्य संपादक होते. त्या कालांत या साप्ताहिकानें बरीच लोकजागृति करून लोकप्रियताहि मिळविली. आरंभीं यांत फक्त मराठीच लेखन येत असे. पुढें सन १८८८ सालापासून त्यांत पोर्तुगीज विभाग सुरू झाला. कांहीं अडचणींमुळें १८८९ त हें पत्र बंद पडलें. पुढाऱ्यांना त्याची पुनः आवश्यकता भासली आणि सन १८९१ सालीं तें कै. रघुवीर लक्ष्मण संजगिरी यांच्या संपादकत्वाखालीं पुनः सुरू झालें. यावेळीं

मोठ्या तडफेनें तें वर्षभर चालल आणि त्यानंतर चालकांचा उत्साह उतरत चालल्यानें आणि अनेक अडचणींनां तोंड देणें त्रासदायक होऊं लागल्यानें एकाच वर्षानंतर म्हणजे सन १८९२ सालीं तें कायमचें बंद झालें. या पत्राचें कार्य भरीव स्वरूपाचें असून जनतेला त्याचें विस्मरण होऊं नये अशा प्रकारचें होतें. पुनः तें सुरू व्हावें अशा इराद्यानें कै. काकासाहेब दणाईत यांनीं बरेच परिश्रम केले; पण अनेक प्रतिकूल कारणांमुळें तें तसें घडून आलें नाहीं.

ज्ञानादर्श

पणजी येथें सन १८८६ सालीं 'ज्ञानादर्श' मासिकाचा जन्म झाला. या मासिकाच्या चालक मंडळानें आरंभीं तें पाक्षिक स्वरूपांत प्रसिद्ध करावें असें ठरविलें, पण मागाहून तो विचार बदलून त्यांनीं मासिक प्रकाशनाचाच बेत अंमलांत आणला आणि ता. १५ जानेवारी सन १८८६ रोजीं त्याचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. याचा आकार क्राउन होता. त्याच सालच्या ऑगष्ट महिन्यांत या मासिकाचा सहावा अंक प्रसिद्ध झाला आणि दुर्दैवानें तोच अखेरचा ठरला.

गोमांतक

सन १८९०सालीं पणजी येथें 'गोमांतक' मासिकाचा जन्म झाला. याचे संपादक व चालक कै. व्यंकटेश यशवंत शिंगबाळ हे होते. चालकांच्या मनांत हें पाक्षिक स्वरूपांत प्रसिद्ध करावें अस होतें; पण अडचणीमुळें परिस्थिति अनुकुल होईपर्यंत मासिक प्रकाशनाचाच त्यांनीं निर्णय घेतला. या कार्यांत चालकांनां मित्रमंडळीचें बरेंच सहाय्य असे. ते त्या प्रकाशनांत भागिदारहि असावेत असा अंदाज करणें अनाठायीं नाहीं. 'गोमांतक' चा आकार लहानसाच असून मराठी व पोर्तुगीज असे त्याचे दोन विभाग होते. पोर्तुगीज विभागाचेहि जबाबदार संपादक शिंगबाळ हेच असले, तरी सारें पोर्तुगीज लेखन संपादणारा दुसरा कोणी तरी होता; पण अंकावर त्याचें नांव येत नसल्यानें तो अमूकच असें निश्चित कळत नाहीं.

'गोमांतक' मासिक पहिल्या सहामाहींत जोरांत चाललें; तथापि दुसऱ्या सहामाहीच्या सुरवातीपासून चालकांचा उत्साह ओसरत चालला. अंक वेळेवर निघणें कठिण होऊं लागलें आणि कसेबसें एक वर्ष पूर्ण करून दुसऱ्या वर्षी म्हणजे सन १८९१ सालीं त्यानें कायमचा विसावा घेतला.

न्यायचक्षु

सन १८९० सालीं पणजी येथे 'न्यायचक्षु' मासिकाचा जन्म झाला. सर्वश्री खाडये, कोलवाळकर आणि काकुले हे या मासिकाचे चालक होते. या मासिकाचा पहिला अंक १८८९ च्या डिसेंबरांतच तयार झाला होता, पण कांहीं कारणानें (हें कारण सरकारी परवाना वगैरेचें असणें संभवनीय) तो १८९० च्या जानेवारींत प्रसिद्ध झाला. तीन अंक निघा-

त्यानंतर चौथ्या अंकापासून न्यायचक्षूच्या अंकांतून पोर्तुगीज विभागहि सुरू झाला. 'न्यायचक्षु' पहिलें एकच वर्ष चालला आणि पुढें कायमचा बंद झाला.

गाझेत द पेरनें

'गाझेत द पेरने' (पेडणें गॅझेट) हें पाक्षिक पत्र पेडणें येथें रा. रामचंद्र पुरुषोत्तम प्रभु देसाई देशप्रभु यांच्या संपादकत्वा-खालीं सन १८९३ सालीं सुरू झालें. याचा आकार ल्हानसाच होता. या पत्रांत मराठीप्रमाणेंच पोर्तुगीज विभागहि असून सरकारकडे करावयाच्या मागण्या वगैरे मजकूर बहुधा पोर्तुगीज भाषेंत येत असे.

आरंभीं हें पत्र साप्ताहिक स्वरूपांत सुरू करावें असा चालकांचा विचार होता. पण ऐन वेळीं तो बदलला जाऊन पत्र सध्या पाक्षिकच असावें असा त्यांनीं निर्णय घेतला आणि ता. २७ मार्च सन १८९३ रोजीं 'पेडणें गॅझेट' पाक्षिकाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. यांत सामाजिक प्रश्नासंबंधींचीच चर्चा अधिक येत असे.

सहा महिन्यानंतर हें पाक्षिक बंद होण्याची परिस्थिति अचानक दत्त म्हणून पुढें उभी ठाकली. तथापि देशप्रभु यांनीं सहाय्यायी इसमांच्या सहकार्यानें त्या परिस्थितीला बगल देऊन आपल्या पत्राचें एक वर्ष पुरें केलें.

दुसऱ्या सहामाहीपासून यांत गोव्याप्रमाणेंच बाहेरचेंहि वर्तमानसार येई.

सन १८९४ सालचा मार्च महिना उजाडला आणि 'गाझेत द पेरनें' पत्राचा कायमचा अंत झाला.

कालिका दर्शन

रा. आर्. पी. शेट नागवेंकर यांनीं पणजी येथें सन १८९८ सालीं 'कालिकादर्शन' या मासिकास जन्म दिला. स. १८९७ त कांहीं तरुणांच्या सहाय्यानें मडगांव येथें जुन्या बाजारांत हें सुरू करावें असा आधीं विचार ठरला होता; पण प्रकाशनाचे दिवस जवळ येतां येतां एकेक इसम त्यांतून माघार घेऊं लागला आणि त्यामुळे रा. नागवेकर यांनीं मग पणजी येथील एका मित्राच्या सहकार्यानें ते पणजी येथेंच सुरू केलें. यांत सुवर्णकारा-गिरांसंबंधीं बरीच माहिती येई. अखिल गोमंतकीय सुवर्णकारागिरांचें तें मुखपत्र व्हावें अशी संपादकांची सद्इच्छा होती; पण सर्वांच्या सहकार्याच्या अभावीं तें तसें होऊं शकलें नाहीं. रा. नागवेंकर यांनीं फार श्रम घेतले, तथापि मासिक दीर्घजीवीहि झालें नाहीं. सन १८९९ त तें कायमचें बंद झालें.

★ ★ ★

जुनी मराठी वृत्तपत्रें ३

ज्ञानांजन

हें मासिक पणजी येथें निघत असे. यांत पोर्तुगीज व मराठी अशा दोन भाषांतून मजकूर प्रसिद्ध होई. याचा आकार लहानच होता. पणजी येथील कांहीं मित्रमंडळी एकत्र येऊन हें मासिक चालवीत. संपादक व प्रकाशक यांचीं नांवें कळत नाहींत; पण अवलोकानांत आलेल्या एका फाटक्या अंकाच्या मलपृष्ठावर "हें पत्र पणजी येथें 'हिंदु-पोर्तुगेज' प्रेसचे मालक यांनीं आपल्या छापखान्यांत मालकांकरतां छापिलें" असा मजकूर आहे. याची सुरवात व अखेर कधीं झाली हेंहि समजून येत नाहीं. सदर अंकावर सन १८९८ असें वर्ष मात्र दिसून आलें.

श्रीखंड

मडगांव येथील कांहीं मंडळी हें मासिक चालवीत असे. संपादक व प्रकाशक कोण होते हें कळत नाहीं; पण याचा प्रथमांक पणजी येथील 'हिंदु-पोर्तुगीज' छापखान्यांत छापून निघाला असण्याचा संभव दिसतो. हेंहि मासिक स. १८९८ सालींच सुरू झालें व त्याच सालीं बंद पडलें, असें कळून येतें.

ज्ञानमित्र

सन १८९९ सालच्या एप्रिल महिन्यांत निघालेला या मासिकाचा एक जीर्ण अंक दिसून आला. त्यावर वर्ष २ अंक १ ला असें असल्यानें मागील अंक मिळविण्याचा प्रयत्न केला; पण तो साधला नाहीं. तथापि याच मासिकाचे सन १८८६ सालीं निघालेले सहा अंक अति जीर्णावस्थेंत उपलब्ध झाले. त्याचा पहिला अंक १८८६ सालीं जानेवारींत प्रसिद्ध झाला असून सहावा अंक जूनमध्यें निघाल्याचें कळून येतें. या मासिकाचा आकार लहान असून पृष्ठेंहि अवघींच होतीं. अखेरच्या अंकावर "पुस्तक १ लें अंक ६ वा" असें छापलेलें आहे. वा. वर्गणी २॥ रुपये. या मासिकाचे १ ते ६ अंक सन १८८६ सालीं निघून सहा महिन्यांनींच तें वर्ष पुरें झालें असावें व १८९९ सालीं दुसऱ्या सालचा १ ला व शेवटचा एकच अंक निघून तें कायमचें बंद झालें असावें असें वाटतें. हें मासिक कुठें प्रसिद्ध होई व त्याचे संपादक किंवा प्रकाशक कोण, हें कांहीं उपलब्ध अंकांवरून कळून येत नाहीं; तथापि "पणजी येथें छापून" इतकाच अर्धवट मजकूर एका फाटक्या अंकाच्या मलपृष्ठावर दिसला.

हितचिंतक

पणजी येथील तत्कालीन सुधारणाप्रिय सद्‌गृहस्थ मंगेश मुकुंद राव देशपांडे यांनीं हें साप्ताहिक पत्र सन १९०० सालीं पणजी शहरांतच सुरू केलें. तथापि तें फार काल न चालतां दुसऱ्याच वर्षी म्हणजे सन १९०१ सालीं बंद पडलें.

सुदर्शन

कविवर्य भिमाजी मुकुंदराव देशपांडे यांनीं वृत्तपत्रीय व साहित्यिक मजकुरानें युक्त असें एक मासिक पत्र चालवावें अशा हेतूनें या पत्राची पणजी येथें सुरवात केली; पण

आरंभींचा उत्साह न टिकल्यानें या मासिकाचा दुसरा अंकहि न निघतां पहिलाच दुर्दैवानें शेवटचा ठरला.

सत्संग

'सत्संग' मासिक पुस्तक कुमारजुवें येथें निघत असे. याचा आकार क्राउन आठ पेजी असून अंकाचीं पृष्ठें २० पासून २४ व कित्येक वेळां २८ असत. सन १९०२ सालीं म्हणजे शके १८२४ च्या चैत्र महिन्यांत गुढी पाडव्यादिवशीं या मासिकाचा प्रथमांक थाटानें प्रसिद्ध झाला. सत्संगाचे कायदेशीर संपादक रा. श्रीनिवास लखू भांडारी हे होते. तथापि प्रत्यक्ष सारी संपादकीय जबाबदारी वैद्य रामचंद्र वामन नायक करंडे शास्त्री उर्फ फोंडूशास्त्री यांकडे होती. यापूर्वींच्या साऱ्या मराठी नियतकालिकांत या मासिकाचा वाङ्मयीन दर्जा श्रेष्ठ असून इतर दृष्टीनेंहि याची मांडणी उल्लेखनीय होती.

'सत्संगा' ला श्री. शांबा कृष्णाजी सूर्यराव सरदेसाई, कै. दत्ताराम जगन्नाथ शेणवीं बोरकर वगैरे विचारवंत लेखकांचें सहाय्य लाभल्यानें त्याचे अंक एकापेक्षां एक उपयुक्त निघत असत. कोणाचीहि भीडभाड न ठेवतां सत्य तेच विचार निर्भीडपणें वाचकांसमोर मांडण्याचें दुर्घट कार्य सत्संगानें केलें. यांत येणारी सुचरित गलंतिका, वाक्कुठार प्रहार, मोठ्यांचे छोटे दोष, वगैरे चालू सदरें छान होतीं. सदरील गलंतिकेंत 'आफोंसु द आल्बुकेर्क,' 'व्हास्कु द गाम' अशा पोर्तुगीज सरदारांचीहि चरित्रें येऊन गेलीं आहेत! तत्कालीन जमान्यांत त्या चरित्रांनां महत्व असणें साहजिक आहे; तथापि आजच्या दृष्टीनें मात्र तें ठीक दिसत नाहीं.

सत्संगांत अधून मधून 'तोच मी' या नांवानें येणाऱ्या उपहासात्मक कविता खोंचदार व लक्षवेधक असत. या कविता खुद्द संपादक करंडेशास्त्रीच लिहीत. सत्संगमध्यें 'अवतार रहस्य' नांवाची एक लेखमाला क्रमशः येत असे. 'जुना इतिहास' या सदरांत ती येई. त्या लेखमालेंतून प्राचीन अवतारांवर भारतांतील तत्कालीन इंग्रजांचें राजकारण रंगवण्यांत आलें होतें. या अवताररहस्यांतील मजकुरानें भारतांतील इंग्रजी अधिकाऱ्यांच्या नाकास मिर्च्या झोंबल्या. त्यामुळें ब्रिटिश हिंदुस्थान सरकारनें आपल्या हद्दींत येण्याची सत्संगाला कडक बंदी केली. इतकेंच नव्हे तर पुढें लवकरच गोव्याच्या फिरंगी सरकारकडे अत्याग्रहाची मागणी करून त्याकडून त्यांनीं सत्संगाचें प्रकाशनच बंद पाडलें. या मासिकाचा अखेरचा अंक सन १९०८ मध्यें प्रसिद्ध झाला.

सन १९०२ पासून १९०८ पर्यंतच्या सात वर्षांच्या कालांत सत्संगानें आपला एक ठराविक वाचकवर्ग तयार केला. सत्संगाचें जमाखर्चाचें मान मात्र समाधानकारक नव्हतें. नेहमीं जमेपेक्षां खर्च अधिक होता.

पथ्यबोध

गतकालांत सामाजिक क्षेत्रांत ज्यांनीं विविध प्रकारची अविस्मरणीय कामगिरी बजावली आणि लोककल्याणार्थ तनुमनधनानें

झीज सोसली ते गोमंतकाचे एक प्रेमळ पुढारी भि. रामचंद्र पांडुरंग वैद्य ऊर्फ दादा वैद्य यांनीं फोंडें येथें सन १८८८ सालीं या आरोग्य विषयक मासिकास जन्म दिला. या सालच्या नोव्हेंबर महिन्यांत याचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. मासिकाचें ठळक नांव 'पथ्यबोध' असें असून त्याखालीं बारक्या टाइपांत "अथवा आरोग्याची मेजवानी" अशीं अक्षरें होतीं.

पहिल्या वर्षीं पथ्यबोधाचे अंक पणजी येथील हिंदु-पोर्तुगीज छापखान्यांत छापून निघत. दुसऱ्या वर्षापासून मराठीबरोबरच या मासिकाच्या अंकांतून पोर्तुगीज मजकूर येऊं लागला. स्वतंत्र छापखान्याचाहि विचार चालकांच्या मनांत घोळूं लागला, पण तो मूर्तस्वरूपांत न आल्यानें सन १८९१ च्या एप्रिलच्या अंकापर्यंत छपाई पणजी येथील छापखान्यांत होऊन प्रसिद्धी फोंडें येथें होऊं लागली.

सन १८९४ त ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर हे तीन अंक मुंबई येथून मुद्रण करून आणण्यांत आले. पुढें कांहीं दिवस हें प्रकाशन बंद होऊन पुन्हां स. १९०० पासून सुरू झालें. या सालच्या जुलैपासून १९०१ सालच्या जूनपर्यंत 'पथ्यबोध' खानापूर (बेळगांव) येथील रा. दत्तात्रेय गोविंद सडेकर यांच्या 'धनंजय' छापखान्यांत छापून निघाला. १९०२ व १९०३ सालीं बंद राहून पुन्हां सन १९०४ पासून फोंडें येथें स्वतःच्या 'आत्माराम मुद्रागार' छापखान्यांत छापून तो प्रसिद्ध होऊं लागला. यावेळीं त्याचा आकार डेमी पुस्तकाचा होता.

आरोग्यविषयक विविध लेख व सुबोध कविता यांमुळें 'पथ्यबोध' त्यावेळीं बराच लोकप्रिय झाला होता. 'सखि रात्र दिवस रडवि मज हि सवत गुड्गुडी,' 'खरें सांगा तेथें अनुचित असें काय घडलें?' वगैरे भि. दादा वैद्यांच्या त्यांतील कविता मजेदार होत्या. सन १९०८ सालीं 'पथ्यबोध' मासिक कायमचें बंद पडलें.

चित्ताकर्षण

क्रांउन सोळा पेजी छोट्या आकाराचें हें मासिक पुस्तक पणजी येथें निघत असे. याचे मालक कोण होते हें कळत नाहीं; पण संपादक रा. शिवराम बळवंत राव देशपांडे हे होते. ते कायद्याच्या अभ्यासासाठीं पोर्तुगालला जाण्यापूर्वी सार्वजनिक चळवळींत मनःपूर्वक भाग घेत असत आणि त्या त्यांच्या स्वयं-सिद्ध उत्साहामुळेंच त्यांनीं या मासिकाला जन्म दिला असें वाटतें. स. १९०६ सालीं हें मासिक सुरू झालें आणि अल्प काल चालून १९०८ सालीं बंद पडलें. हें मुंबई येथील निर्णयसागर छापखान्यांत छापून घेऊन इकडे आणण्यांत येई. केवळ मनोरंजन हाच या मासिकाचा उद्देश होता. या मासिकाच्या दर अंकाचीं पृष्ठें २४ असत. कै. जिवाजी दत्तु महात्मे यांची 'स्वदेशी चाकू' ही दीर्घकथा आणि कै. कारापूरकर यांची 'मालिनी' कादंबरी या याच मासिकातर्फे प्रकाशनांत आल्या. या मासिकाचा कागद गुळगुळीत व मुद्रण छान असे.

प्राचीप्रभा

पोर्तुगीज लोकांना हिंदी संस्कृतीची माहिती नसल्यानें येथील चालीरीतींचें त्यांनां मुळींच महत्व नव्हतें व त्यामुळें ते सारेंच थोतांड असें मानून बेफिकीरीनें वागत असत, हे लक्षांत आणून त्या लोकांनां हिंदी संस्कृतीची ओळख करून देऊन हिंदुधर्माचें वैशिष्ट्य त्यांनां पटविणें हें या मासिकाचें मुख्य ध्येय होतें.

प्राचीप्रभा मासिकाचे संस्थापक व मुख्य संपादक भि. रामचंद्र पांडुरंग वैद्य तथा दादा वैद्य हे असले; तरी संपादकीय जबाबदारी श्री. सीताराम विश्वंभर केरकर यांकडेच होती. त्याकाळीं अंत्रूज महालांतील अनेक सार्वजनिक चळवळींत दादा वैद्य व सी. वि. केरकर यांची जोडी कृष्णार्जुनाप्रमाणें वावरलेली दिसे.

'प्राचीप्रभा' हें नांव मासिकाच्या मुखपृष्ठावर अग्रभागीं असून त्या खालीं A Luz do Oriente असें पोर्तुगीज नांव असे. या मासिकांत इकडील व पोर्तुगालमधील निरनिराळ्या लेखकांचे लेख येत असत. 'हिंदुधर्म व सुधारणा' या सुप्रसिद्ध ग्रंथाचें सी. वि. केरकर यांनीं केलेलें पोतुगीज भाषांतर या मासिकांतून क्रमश: येत होतें. मासिकाचा आकार पुस्तकाचा असून तें फोंडें येथें स्वत:च्या आत्माराम मुद्रागार छापखान्यांत छापून निघे.

'प्राचीप्रभा' मासिकाची निर्भेळ मराठी आवृत्ति निराळी निघे. त्या आवृत्तीच्या संपादिका सौ. सरस्वतीबाई या होत्या.

प्राचीप्रभा मासिक सन १९०९ सालीं फोंडें येथें सुरू झालें आणि १९१४ सालीं तें बंद झालें.

मराठी आवृत्तींतून इ. सं. द. वि. आपटे, वि. रा. राजवाडे यांचे व इतर महाराष्ट्रीय लेखकांचे बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत.

पुढें हें साप्ताहिक स्वरूपांत प्रसिद्ध होऊं लागलें. त्याच्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'प्राचीप्रभा' Luz do Oriente. Edição Semanal. Director e Editor—Ramochondra P. Vaidia. Secretario- Sitaram V. Quercar अशीं अक्षरें होतीं. वा. व. ३ रु., वाचनालयांस २ रु. पृ. १ व २ पोर्तुगीज आणि ३ व ४ मराठी असे. अग्रलेखाच्या वर "जीवित संरक्षणानंतर शिक्षण हीच जनतेची पहिली गरज होय" हें ब्रीदवाक्य असे.

हें साप्ताहिक पत्र देखील फोंडें येथें आत्माराम मुद्रागारांतच छापून प्रसिद्ध होत असे. प्राचीप्रभा साप्ताहिक पत्र सन १९२६ सालीं बंद पडलें.

प्राचीप्रभेनें आपल्या ध्येयाप्रमाणें योग्य कार्य बजावलें; पण वर्गणीदारांनीं मात्र आपली वर्गणी योग्य वेळीं पाठवून साथ न केल्यानें या कार्यांत चालकांना बरीच आर्थिक झीज सोसावी लागली.

जुनी मराठी वृत्तपत्रें ४

हिंदुमत

हें पोर्तुगीज-मराठी साप्ताहिक पत्र पणजी येथें दि. १२ डिसेंबर सन १९१० रोजीं सुरू झालें. दि. ५ ऑक्टोबर रोजीं पोर्तुगीज राजांची राजवट संपुष्टांत येऊन पोर्तुगिजांच्या सत्तेखालील साऱ्या प्रदेशांत अर्थात् गोव्यासारख्या वसाहतींतहि प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू झाली, व तेव्हांपासून हिंदुसमाजांत जें एक विशिष्ट नवचैतन्य स्फुरलें त्यांतूनच विविध नव्या वृत्तपत्रांचाहि उदय झाला. 'हिंदुमताचा' जन्महि त्यांतूनच झाला.

हिंदुमताचे संपादक श्री. मंगेश मुकुंद राव हे असून प्रकाशक श्री. शिवराम बळवंत राव हे होते. हें पत्र हिंदुसमाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें अस्तित्वांत आलें होतें. प्रथमांकावरील तारीख "नवीन-गोवें, १२ डिसेंबर १९१०" अशी होती. या पत्राचीं दोन पृष्ठें पोर्तुगीज मजकुराचीं व दोन मराठी मजकुराचीं असत. आकार मोठा होता. पहिल्या पृष्ठाच्या अग्रभागीं पोर्तुगीज भाषेंत व रोमन लिपींत असा मजकूर असे :—

O OPINIÃO HINDU

Semanario colectivo e noticioso.
Editor– S. B. Rau. Assinaturas–India Portuguesa Rps. 1–12–00, India Inglesa Rps. 2–12–00.
Redacção e Administração – Rua Calicut, Nova–Gôa.

Sob o patrocínimo do
Exmo. Sr. Visnum Sinai Dempó
Director e Proprietario
Manguexa Mucunda Rau

Ano 1 — No. 1 .... Nova-Gôa, 12 de Dezembro de 1910

या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादकहि श्री. शिवराम बळवंत राव हेच होते. यांतील पोर्तुगीज विभाग कांहीं काल श्री. गो. पु. हेगडे देसाई यांकडे होता. बांधकाम खात्याच्या व्यवहारावर टीका केल्यामुळें सरकारनें या पत्रावर खटला भरून संपादकांना शिक्षाहि दिली. हें साप्ताहिक दोन वर्षें नियमीत चाललें व नंतर अनियमीत प्रसिद्ध होऊन पुढें बंद पडलें.

सन १९१४ सालीं 'हिंदुमत' पुन्हां सुरू झालें आणि तें १९१६ सालीं कायमचें बंद पडलें. या पत्राचा प्रसार गोव्याच्या सर्व भागांतून आणि बेळगांव, चंदगड, मुंबई इत्यादि ठिकाणींहि होता. तथापि त्याची आर्थिक बाजू मात्र समाधानकारक नव्हती. वर्गणी वसूल होणें फार कठिण होई हेंच त्याचें कारण असे.

हळदकुंकू

फोंडें येथें सन १९१० सालीं हें मासिक पुस्तक भि. रामचंद्र पांडुरंग वैद्य यांनीं सुरू केलें. याचा आकार क्रॉऊन सोळा पेजी होता. या मासिकाच्या संपादिका श्री. सौ. सरूबाई

वैद्य या होत्या. याचे सुरवातीचे कांहीं अंक खानापूर येथें छापून निघत व नंतरचे गोव्यांतच छापण्यांत येत असत. यांतील विषय स्त्रियांच्या विकासासंबंधींचेच असत. अतएव हें मासिक आमूलाग्र स्त्रियांकरतांच होतें. या मासिकाचीहि आर्थिक स्थिति कठीणतर झाल्यानें सन १९१२ सालीं तें कायमचें बंद करण्यांत आलें.

प्रभात

हिंदुसमाजाच्या हितसंरक्षणासाठीं आणि उन्नतीसाठीं हिंदूंनीं हिंदूंकरतां चालविलेलें हिंदूंचें एक प्रभावी पत्र सुरू असावें अशा हेतूनें पणजीचे एक तत्कालीन पुढारी डॉ. पुरुषोत्तम वा. शिरगांवकर यांनीं 'प्रभात' साप्ताहिकास सन १९११ सालीं पणजी येथें जन्म दिला. दि. २३ मे सन १९११ रोजीं या पत्राचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. या कार्यांत डॉक्टर महाशयानां कै. शिवाजी दत्तू महात्मे, दत्ताराम जगन्नाथ बोरकर, हेगडे देसाई प्रभृति मंडळीचें मोठें सहाय्य असे. प्रभातचे प्रकाशक डॉ. पु. वा. शिरगांवकर व संपादक डॉ. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई हे होते.

'प्रभात' चा स्वतःचा छापखाना नसल्यानें आरंभींचे त्याचे अंक बरेच अनियमीत निघत असत. पोर्तुगीज विभाग हेगडे देसाई यांकडे असून तो तडफदार असला तरी मराठी बाजू तितकी प्रभावी नव्हती. ती प्रभावी व्हावी येतदर्थ सहकारी तरुणांनीं बरीच खटपट चालविली. आरंभीं त्यांनीं स्वतंत्रा छापखाना उभारण्याचें ठरवून त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू केला. डॉ. हेगडे देसाई यांनीं एका ख्रिस्ती स्नेह्याकडून एक प्रेस व आवश्यक असा पोर्तुगीज टाइप मिळविला. यानंतर 'प्रभात' मधील सहकाऱ्यांनीं आपसांत पंचवीस पंचवीस रुपयांचे शेअर काढून मराठी टाइप व इतर आवश्यक सामुग्री जमविली आणि 'प्रभात' चा स्वतंत्र छापखाना उभा केला.

मराठी विभागाकडेहि विशेष लक्ष देऊन ती बाजू सुधारण्याचा प्रयत्न सुरू झाला; आणि अशा रीतीनें 'प्रभात' आकार घेऊं लागला. 'प्रभात' संस्थेला सार्वजनिक स्वरूप येतांच इतरांचेंहि तिला सहकार्य लाभलें. आणि तेव्हांपासून एक विचारवंत लेखक श्री. शांबाराव सरदेसाई हेहि 'प्रभात' मध्यें नियमीतपणें मराठी लेखन करूं लागले.

तथापि डॉ. शिरगांवकर व श्री. शांबाराव यांचीं मतें एकमेकांना पटणारीं नसल्यानें डॉक्टरनां त्यांचा 'प्रभात' मधील प्रवेश न आवडून त्यांनीं एके दिवशीं "प्रभातचे अंक आपल्या संमतीवांचून छापूं नयेत" अशी सहकाऱ्यांना नोटीस दिली.

नोटीस देण्यापूर्वी त्यांनीं वै. पुंडलीक अनंत केणी यांकडून मदत मिळवून 'प्रभात' साठीं स्वतंत्र छापखानाहि उभारला होता.

प्रभात प्रकाशनास पुरते सहा महिनेहि झाले नाहींत आणि अशा स्थितींत अशी नोटीस पाहून सहकाऱ्यांना वाईट वाटलें. दत्ताराम जगन्नाथ बोरकर, गोविंद पुंडलीक

हेगडे देसाई, सदाशिव शेणवीं सुखठणकर, घनःश्याम शेणवीं मळकर्णेकर, सोयरू शेणवीं मळकर्णेकर, शिवराम महादेव देसाई, रा. वा. ना. करंडेशास्त्री, जिवाजी दत्तू महात्मे, बाळकृष्ण वा. सांवर्डेकर, पुरुषोत्तम शेणवीं साळकर, रामा नाईक, शांबाराव सरदेसाई वगैरे ज्या गृहस्थांनीं एकत्र येऊन विचारविनिमय केला, खर्चासाठींहि सहकार्य केलें आणि उत्साहानें 'प्रभात' ला गति दिली त्यांचा, नोटीस पाहून बराच विरस झाला.

हेगडे देसाई यांचा पोर्तुगीज विभाग, शांबाराव, बोरकर, स्वत: डॉ. शिरगांवकर यांच्या नेतृत्वाखालील मराठी विभाग अशा रीतीनें प्रभात नुकताच नांवारूपास येऊं लागला होता; तथापि मतभेदांमुळें नोटीस निघाल्यानें इतर सहकारी मंडळी 'प्रभात' संस्थेंतून फुटून निराळी झाली आणि प्रभातची सारी जबाबदारी एकट्या डॉक्टरनांच स्वीकारावी लागली.

असें जरी असलें तरी डॉक्टर शिरगांवकरांनीं सर्व जबाबदारी स्वीकारून प्रभात पत्र चार वर्षेपर्यंत नियमीतपणें व्यवस्थित चालविलें. या कार्यांत पुढें त्यांना अन्य मित्रांचें चांगलें सहाय्य लाभलें.

प्रभातमध्यें शिरगांवकरांचे विविध मराठी लेख येत असत. त्यांची भाषा अगदीं घरगुती, साधी व सरळ होती. दिसलें तें सांगावें व वाटलें तें बोलावें असा त्यांचा उघडा स्वभाव असल्यानें लेखांनहि वाचकाला तेंच प्रतिबिंब दिसे. कोणाच्याहि बऱ्यावाईट बोलण्याकडे किंवा टीकेकडे पाहून दबणाऱ्यांपैकीं ते नव्हते. त्यांच्या मनानें घेतलेलें कृत्य प्रामाणिकपणें बजावण्याच्या कार्यांत त्या टीका कांहींच करूं शकत नसत.

'प्रभात' पत्राच्या प्रपंच्यांत त्यांना अनेक प्रकारचें नुकसान सोसावें लागलें. त्यामुळें त्यांचें स्वतःच्या प्रपंच्याकडेहि दुर्लक्ष होऊन संकोच झाला.

त्यावेळीं वृत्तपत्राच्या डायरेक्टरला निदान पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या परीक्षेचा तरी दाखला हवा होता, आणि डॉक्टरांचें शिक्षण गोव्याबाहेर इंग्रजी हद्दींत झाल्यामुळें त्यांच्याजवळ तो दाखला नव्हता. अशा वेळीं मुद्दाम दमण येथें जाऊन उतार वयांतहि त्यांनीं पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाची परीक्षा देऊन दाखला मिळविला आणि 'प्रभात' पत्र स्वतःच्या नावांनें रजिस्टर करून घेतलें. ता. २९ ऑगष्ट सन १९१२ पासून सन १९१५ पर्यंत डॉ. शिरगांवकर प्रभातचे कायदेशीर संपादक होते.

प्रभात वृत्तपत्र डॉ. शिरगांवकर यांनीं चार वर्षें पर्यंत शिकस्तीच्या प्रयत्नानें व्यवस्थित

चालविलें आणि सन १९१५ सालीं तें बंद पडलें. ता. १२ ऑगस्ट सन १९१५ चा 'प्रभात' चा अंक शेवटचा ठरला.

सन १९१६ सालीं डॉ. शिरगांवकर यांची जीवन यात्रा संपली. त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त पणजी येथें महालक्ष्मीच्या सभामंडपांत जी जाहीर सभा भरली त्या सभेंत शिरगांवकरांच्या स्मारकाबद्दल अनेकांनीं अनेक योजना पुढें मांडल्या. त्या सर्वांत शिरगांवकरांचे निस्सीम भक्त श्री. जनार्दन नारायण पै अस्नोडकर व नरसिंह राया भोंसले यांनीं डॉक्टरांचें स्मारक म्हणून 'प्रभात' पत्र सुरू ठेवण्याचीहि एक योजना पुढें आणली. तथापि त्या वेळीं तिला चालना मिळूं शकली नाहीं. पण पुढें कांहीं दिवसांनंतर ही योजना त्यांनींच अमलांत आणण्याचें ठरवून उभयतांनीं 'प्रभात' मासिकाला उत्साहानें जन्म दिला.

हें मासिक कांहीं काल चाललें आणि पुढें विशेष आर्थिक तोट्यामुळें त्यांना तें बंद करावें लागलें.

यानंतर रा. विनायक सखाराम शेणवी पिसुर्लेंकर यांनीं 'प्रभात' प्रकाशनास आरंभ केला. आकार क्रॉऊन सोळा पेजी करून पृष्ठ संख्याहि वाढविली. गोमंतकांतील व गोव्या-बाहेरील लेखकांचे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता मिळवून प्रत्येक अंक सजविण्याची खटेपट केली. तथापि पुढें त्यानांहि त्यांत नुकसानच सोसावें लागलें.

वर्गणीदारांची संख्या वाढविण्यासाठीं पिसुर्लेंकर यांनीं दुसराहि एक प्रयत्न आरंभला. प्रत्येक अंकावर निरनिराळे नंबर छापून ते नंबर दर महिन्याच्या अंकाच्या प्रसिद्धीनंतर सोडतींप्रमाणें बक्षिसाला टाकावयाचे व ज्याला निकालांत बक्षीस लागेल तो नंबर ज्याच्या-जवळच्या अंकावर असेल त्याला लागलेलें बक्षीस पाठवून द्यावयाचें. पण हा त्यांचा प्रयत्नहि यशस्वी होऊं शकला नाहीं.

अखेरीस 'प्रभात' मासिकाच्या पायीं त्यांना कल्पनेबाहेर नुकसान आल्यानें त्यांनीं तें प्रकाशन निरुपायानें मग बंद करून टाकलें.

अशा रीतीनें डॉक्टर शिरगांवकरांचें स्मारक म्हणून सुरू झालेलें 'प्रभात' मासिकहि अखेरीस बंद पडलें तें कायमचेंच.

वास्तविक डॉ. शिरगांवकर यांचें कार्य इतकें व्यापक व सार्वत्रिक होतें कीं, प्रत्येक गोमंतकीयांच्या अंतःकरणांत त्यांची स्मृति सतत रहावी; पण जसजसा काल जाऊं लागला तसतशी त्यांची स्मृतीहि बुजत चालली ही खेदाची गोष्ट होय !

भारत

प्रभात संस्थेंतून मतभेदामुळें विलग झालेल्या मंडळीनें सन १९१२ सालीं **'भारत'** साप्ताहिकास जन्म दिला. 'भारत' पत्राचा पहिला अंक दि. ६ नोव्हेंबर १९१२ रोजीं प्रकाशनांत आला. याचा आकार मोठा असून पहिलीं दोन पृष्ठें पोर्तुगीज व दुसरीं दोन मराठी असत. प्रथमांकाच्या मुखपृष्ठावर डावीकडे वर्ष, अंक, संपादक, प्रकाशक व वर्गणी असा मजकूर पोर्तुगीजमध्यें असून उजवीकडे तोच मराठी होता. "गोविंद पुं. हेगडे देसाई— संपादक. जिवाजी दत्तू महात्मे— प्रकाशक. वा. व. पोर्तुगीज हिंदुस्थानांत रु. १–८–० व इंग्रजी हिंदुस्थानांत रु. १–१२–०. कार्यालय—नवीन गोवें."

प्रथमांकाच्या मुखपृष्ठावर डावीकडे Palávras prévias आणि उजवीकडे Coisas e loisas अशा मथळ्यांखालीं पोर्तुगीज मजकूर होता.

मराठी विभागांत 'गुंजारव' (विविध चर्चा), अग्रलेख, स्फुट विचार इ. विषय होते.

अग्रलेखांत **'मुखबंध'** या मथळ्याखालीं पुढील मजकूर होता:—

"नव्यानेंच जन्म पावलेल्या 'भारत' पत्राचा हा प्रथमांक आज वाचकांच्या हातीं जात आहे. अशा प्रसंगीं या कामीं सर्वसंमत होऊन बसलेल्या रुढीस अनुसरून प्रथम परिचयादाखल आपली दिशा, हेतु, कार्यक्रम इ. वाचकांसमोर मांडणें हें आमचें पहिलें कार्य होतें, परंतु असे कांहीं योगायोग येऊन 'भारताचा' जन्म झालेला आहे कीं, त्यामुळें वरील प्रमाणें वाचकांस आमचा प्रथम परिचय करून देण्याची आवश्यकता आज राहिलेली नाहीं. 'भारत' कां निघाला हें आज गोमांतकांतील लेखनवाचनाभिरुचि असलेल्या ज्यांच्याशीं भारताच्या मुलाखती होतील अशा सर्वांस आधींच ठाऊक झालेलें आहे..." इ.

"तुर्की बाल्कन युद्ध, युद्धाचीं कारणें, न्याय कोणीकडे? खरें कारण, तुर्की राज्यकारभार, धर्ममुक्ततेचे प्रयत्न व आशेचें चिन्ह" अशीं सहा फुटें स्फुटविचारांत होतीं.

त्यानंतर वस्तुस्थितिदर्शन, ख्रिस्तेतर लोक, वर्तमानसार, इहवृत्त इ.

प्रथम सालचा ५१ वा शेवटचा अंक ता. २९ ऑक्टोबर १९१३ रोजीं निघाला. भारतपत्र एक वर्ष ठीक चाललें आणि १९१४ सालीं भारत संस्थेंतून इतर मंडळी निघाल्यानें सर्व जबाबदारी एकटे हेगडे देसाई यांच्यावरच आली. त्यांनीं तें पत्र तारीख ८ मार्च १९१७ पर्यंत चालविलें आणि बेसुमार नुकसानीमुळें नंतर बंद केलें.

पुढें पणजी येथून मुद्रणालयाचें सामान आणण्यांत आलें. मुंबई येथून नवीन टाईप आणला आणि डॉ. हेगडे देसाई यांनीं सन १९२० सालीं ता. २५ मार्च रोजीं केपें येथें 'भारताचें पुनरुज्जीवन केलें. आतां भारताचे

संपादक, प्रकाशक व मालक हे तेच झाले. आकारांत व वर्गणींत बदल करण्यांत आला. आरंभींचे कांहीं अंक नियमीत निघूं शकले नाहींत; तथापि पुढें संपादक हेगडे देसाई यांनीं नियमीतपणाकडे विशेष लक्ष देऊन भारत प्रकाशनाचा गुरुवार हा दिवसाअखेरपर्यंत कधींच चुकवला नाहीं.

कांहीं कालानंतर ट्रेडल आणण्यांत आलें व पानें वाढविण्यांत येऊन चार पानें पोर्तुगीज व चार मराठी अशीं दर अंकाचीं आठ पृष्ठें करण्यांत आलीं. पुढें भारताचें रोमन लिपींत कोंकणी प्रकाशनहि सुरू होऊन बरेच दिवस चाललें. अशा रीतीनें 'भारत' पत्राचा वाचकवर्गहि हळूहळू वाढला. केपें येथें प्रकाशन सुरू झाल्यापासून न्यायालयाच्या जाहिराती मिळूं लागल्यानें आर्थिक स्थितींत तेवढी सुधारणा झाली व त्यामुळें साधारणसें स्थैर्यहि लाभत गेलें. जेम तेम खर्चाची तोंड मिळवणी होऊं लागली. तथापि खरें आर्थिक स्वास्थ्य भारतकारांना अखेरपर्यंत लाभलेंच नाहीं.

डॉ. हेगडे देसाई हे पोर्तुगीज फरडे लेखक असल्यानें भारताची पोर्तुगीज बाजू अखेरपर्यंत निःस्पृह व बाणेदार होती. या निःस्पृहतेमुळेंच पोर्तुगीज सरकारनें निरनिराळ्या प्रसंगीं त्यांच्यावर जे छोटे मोठे खटले भरले त्यांची एकूण संख्या सहज वीसापेक्षां अधिक भरेल. त्यांपैकीं तीन खटल्यांत त्यांना कैदेची आणि दंडाची शिक्षा भोगावी लागली. जनतेनेंहि या प्रसंगीं त्यांनां आपुलकीनें सहाय्य केलें.

भारतपत्र पणजी येथें सुरू झालें त्यावेळीं श्री. शांबाराव प्रभृति भारत मंडळाचे सहकारी भारताची मराठी बाजू पहात असत; तथापि पुढें ती मंडळी सुटल्यावर दुसऱ्यावर्षीं त्यांतील फक्त एकटेच राहिलेले रा. दत्ताराम जगन्नाथ बोरकर यांचें मराठी लेखन भारतांत येऊं लागलें पण दुर्दैवानें १९१४ सालीं बंडवाल्यांकडून त्यांचा अमानुषपणें अंत झाला आणि भारताच्या मराठी विभागाचा त्यांचाहि संबंध अचानक सुटला. त्यानंतर भारतकारांना असे कांहीं मराठी लेखक मिळाले कीं, पुढें पुढें त्यांनीं ऐनवेळीं दगा द्यावा, आणि अशा या अडचणीमुळेंच मराठीकडेहि आपली लेखणी वळविणें डॉ. हेगडे देसाई यांना भाग झालें.

वास्तविक गोव्यांत नियतकालिक सुरू करतांनां सर्वच बाबतींत स्वतःच्या तयारीची जरूरी असे. पैसा, व्यवस्था, लेखन इ. इ. एखाद्या गोष्टींत दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याचा मूर्खपणा केला तर क्षुल्लक कारणासाठींहि मग अडून राहाण्याचा प्रसंग यायचाच !

भारताचें प्रकाशन केपें येथें सुरू झाल्यानंतर मराठी लेखनांत सहकार्य करणारे श्री ज. घ. मळकर्णेकर हे भारतकारांना मिळाले आणि त्यांनीं आपुलकीनें व एकनिष्ठेनें 'भारत' पत्राच्या अंतापर्यंत त्यांच्याशीं विविध-साहित्यानें सहकार्य केलें.

सन १९२१ सालीं महात्माजींच्या 'स्वदेशी' चळवळीचा प्रतिध्वनि गोमंतकांत उठला आणि

पणजीच्या लिसेवमधील हिंदु विद्यार्थ्यांनीं गांधी टोपी वापरण्याचा निश्चय केला. ही गोष्ट लिसेवमधील बहुतेक प्रोफेसरांना आवडली नाहीं. त्यांनीं हा ' गांधीझम् ' असून गोव्यांत धोका उत्पन्न करणारा असल्याचा टाहो फोडला. त्यांनीं गांधी टोपी न वापरण्याची विद्यार्थ्यांना तंबी दिली. ' गांधी टोपी वापरणारास वर्गांत प्रवेश मिळणार नाहीं ' असेंहि निक्षून सांगितलें. तथापि दुसऱ्या दिवशीं राहिलेल्या विद्यार्थ्यांनीहि; इतकेंच नव्हे, तर कित्येक ख्रिस्ती विद्यार्थ्यांनीं देखील गांधी टोपी धारण केली व ते लिसेवमध्यें आले. होतां होतां वर्ग-प्रवेशाचा सत्याग्रह सुरू झाला. एकमेकांच्या अनुकरणानें पणजींतील गांधी टोप्या संपल्यानें मडगांव, म्हापसें येथूनहि त्या आल्या आणि प्रकरण वाढत गेलें. यावेळीं पोर्तुगीज विभागांत भारतांत जो सडेतोड लेख डॉ. हेगडे देसाई यांनीं लिहिला त्यामुळें प्रोफेसर मंडळी व कांहीं सरकारी अधिकारी प्रक्षुब्ध होऊन ' भारत ' पत्रावर खटला भरण्यांत आला; तथापि वरिष्ठ कोर्टांत त्यांतून भारतकार दोषमुक्त झाले. ' ताश द गॅन्ह ' या प्रकरणांतहि भारत-मधील कडक लेखामुळें डॉ. हेगडे देसाई यांच्यावर खटला भरण्यांत आला होता; पण न्यायालयांत ते दोषमुक्त होऊन सरकारनें ती स्टॅंप-ड्यूटीहि रद्द केली.

आसाम प्रकरण, वास्कु द गामाचें श्राद्ध, कांवरें प्रकरण, राष्ट्रीय भावना वगैरे त्यांचे अनेक लेख आक्षेपार्ह ठरविण्यांत येऊन त्या त्या प्रकरणावर वेळोवेळीं त्यांच्यावर खटले भरण्यांत आले. तथापि कधीं खालच्या कोर्टांत तर कधीं वरिष्ठ कोर्टांत अपिलांत ते निर्दोषी ठरले. आणि अपिलांतहि ज्या खटल्यांना मूठमाती मिळाली नाहीं अशा कित्येक खटल्यांना राष्ट्रदिनाच्या वार्षिक जाहीरनाम्यांतील कलम लागून सार्वत्रिक सूटमधून ते गडगडले गेले.

भारताचा वृत्तपत्रीय व्याप केपें येथें सुरू झाल्यानंतरच्या कालांत अखेरपर्यंत डॉ. हेगडे देसाई यांच्याशीं ज्यांनीं साहित्यिक सहकार्य केलें त्यांत वै. वासुदेव भास्कर नायक तथा रंगनाथ नायक यांचा प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारखा आहे. ' मार्मिक ' या नांवानें यांचे अनेक टीकालेख भारतांतून आले आहेत. ' चिंतामणी ' या नांवानें लिहिलेल्या मानिफेस्त पुराण व ब्लॅक मार्केट पुराण या त्यांच्या मार्मिक खंडकाव्यामुळें ' भारत ' पत्राचे किरकोळ अंकहि दर गुरुवारीं मोठ्या कौतुकानें वाचक घेऊं लागले. गोमंतकीय मराठी वृत्तपत्रांच्या जीवनांत वार्षिक वर्गणीदारांखेरीज किरकोळ अंकांचा जादा खप म्हणजे एक महत्वाची गोष्ट समजली पाहिजे; आणि तिचा फायदा पहिल्या प्रथम भारतालाच लाभला होता. ब्लॅक मार्केट पुराणाची वाचकांना इतकी ओढ लागलेली होती कीं, त्याचा अध्याय वाचण्यासाठीं भारताच्या अंकाची ते आतुरतेनें वाट पहात.

३३ व्या वर्षांतील एक महत्वाचा अग्रलेख

"लोकशाही सज्ञान हवी !"

"एकतंत्री राज्यकारभारापेक्षां लोकशाही कारभार जनतेला जास्त पसंत असणें स्वाभाविक आहे. तथापि ज्या समाज घटकांची ही लोकशाही बनलेली असते ते घटक सज्ञान, सुबुद्ध व स्वयंविचारी असले तरच लोकशाहीचा कारभार सुखद होऊं शकेल आणि ते विचारी व सज्ञान नसले तर लोकशाही व हुकुमशाही यांत फरक तो काय राहणार ?

लोकशाहीचीं तत्त्वें गाण्यापूर्वी लोकशाहीची लायकी आधीं अवलोकन केली पाहिजे. लोकशाहीचीं उच्च तत्त्वें अंमलांत आणण्याची जबाबदारी लोकशाहीला पार पाडतां येत नसेल व 'गरीब बिचारीं कुणी हंका' अशापैकीं ती असेल तर त्या अप्रबुद्ध लोकशाहीपेक्षां खऱ्या राष्ट्रकल्याणाच्या भावनेवर अधिष्ठित झालेली हुकूमशाही काय वाईट ? जिला स्वतःचें हित समजत नाहीं, सारासार विचार करण्याची बुद्धी नाहीं, इष्टानिष्ट पडताळण्याचा समंजसपणा नाहीं आणि कुणाहि बेजबाबदार व अधिकारलोलुप लोकांच्या मागें जाण्याला जी कचरत नाहीं ती लोकशाही राष्ट्राला उपकारक न ठरतां उलट घातकच होते.

यासाठीं प्रथम लोकांना सज्ञान करून मगच त्या लोकांच्या विचारानें राज्यकारभार चालविला गेला पाहिजे. एकतंत्री कारभार जितका घातक, तितकाच अज्ञान बहुजन समाजानें चालविलेला कारभारहि घातक होण्याचाच संभव जास्त. बहुजन समाज जर सज्ञान नसेल तर पुढाऱ्याच्या तंत्रानें तो चालूं लागतो आणि परिणाम कायचे काय होतो. शिवाय पर्यायानें त्याला एकतंत्रीच स्वरूप प्राप्त होतें. केवळ लोकशाहीचे दिखाऊ संस्कार मात्र होऊन जातात. एकच माणूस एकाकी आला काय, किंवा एकच माणूस आपल्याच तंत्रानें चालणारीं शेंकडों निर्बुद्ध व अज्ञानी माणसें घेऊन आला काय, परिणाम एकच.

पुष्कळदां बहुजन समाजाचे पुढारी म्हणून जे मिरवतात त्यांची राहाण्याची पद्धत, वागण्याची तऱ्हा, आहार विहाराचे षौक मोठ्या भांडवलदारांनाहि लाजविणारे असतात. गरीबांना भरपूर अन्न मिळत नाहीं, पुरेसा कपडा मिळत नाहीं, म्हणून केव्हां कोणी त्यांचा पुढारी अर्धवस्त्रानें फिरलेला किंवा अर्धपोटीं राहिलेला दिसला नाहीं. गरीब जनता झोंपडींत राहते, पायांनीं वणवण फिरते व त्यांचे पुढारी मोठाल्या घरांत किंवा बंगल्यांत राहून तेथूनच श्रीमंतांनां खतम् करण्याची भाषा बोलतात ! अशा दिखाऊ पुढाऱ्यांच्या अनुरोधानें चालणारी लोकशाही ही खरी लोकशाही होऊंच शकत नाहीं...!

भारत २

ब्लॅक मार्केट पुराण अध्याय २९ वा

पोळें नामक गांवांत । जिथें फिरंगी हद्द संपत । तेथें होता राहात । खारवी एक जातीचा ॥१॥ नांव तयाचें खेमू तारी । तयासि असती दोन नारी । दोघीही सवती जरी । प्रेमभरें नांदती ॥२॥ वडील जायेसी नव्हतें संतान । म्हणोनि केलें दुजें लग्न । परी खेमू तारी निर्विघ्न । संसार चालवी आपुला ॥३॥ सुका कायदा कारवारवर । लादितें झालें काँग्रेस सरकार । खेमूचा तर्यी वाढला जोर । झाला गब्बर खारवी तो ॥४॥ भरोनी रायभाज्यांची भर । गोमंतकाच्या हद्दीसमोर । थाटिले दोन गुत्ते थोर । गांवठी दारू विकण्यासी ॥५॥ खुद्द कारवारचे प्रतिष्ठीत नर । सुंकेरी सदाशिवगडचेहि इतर । कोडीबाग माजाळीचे सटर फटर । गुत्यावरी नित्य येती ॥६॥ अस्तास जातां अंशुमाळी । पोळयांत नित्य चाले दिवाळी । ब्रह्मानंदीं लावोनि टाळी । लोक करिती सुरापान ॥७॥ एक मागे फेणी । दुजा म्हणे येती घाणी । मिसळोनियां सोडा पाणी । उच्च मासियेर देईजे ॥८॥ उकळलेले वाटाणे । त्याच परी कवठें जाणें । कोंबडी बकरीचें मटण खाणें । नित्य चाले तया ठायीं ॥९॥ रात्रौ साडेआठ वाजतां । घरीं जाण्यासी निघतां । हेलकाविती सरळ रस्ता । जणू घेती मोज माप ॥१०॥ ऐसा करितां व्यापार । खेमू झाला गब्बर । पैसा मिळविला अपरंपार । झाला कापितालीस्त हद्दीवरी ॥११॥ लगेच मग ब्लॅक बाजार । सुरू झाला दुनियेवर । तांदुळ खरिदण्या वारंवार । पोळयांत जाती लोक सारे ॥१२॥ खेमूची व्यापारी नजर । स्थिरावली त्या गिन्हाइकांवर । मग करिता झाला ब्लॅक बाजार । उभय गुत्ते सांभाळोनी ॥१३॥ काणकोणांत मिळणारी दारू । तो लागला पिपांत भरूं । इकडे केला जोरांत सुरू । व्यापार चोरटा दारूचा ॥१४॥ पोळेच्या पोस्तासमोर । दर्याच्या विस्तीर्ण वेळेवर । चिरेबंदी असे घर । तया खेमू खारव्याचें ॥१५॥ माजाळी कारवारकडील लोक । अचूक येती खेमूसमीप । पीपावरी पीप । वरचेवर खरिदतीं ॥१६॥ सर्वे येती घेवोनि तांदुळ । परत निघतांना नेती नारळ । किनाऱ्यावरील नावा सकळ । असती अनुकूल तयालागीं ॥१७॥ तया नौकांत भरून । मद्यपीपें नेती चोरून । खळबळणाऱ्या दर्यातून । सफर करिती काळरात्रीं ॥१८॥ ऐसें चालतां अहर्निश । खेमू झाला द्रव्याधीश । तांबडा रुमाल डोकीस । बांधोनी गुंगे ब्लॅकामाजीं ॥१९॥ अडले लोक दीनवदनें येतां । ब्लॅकीस्त खेमूचे पांय धरिती । म्हणती आगिली गाडी रिती । ती परती करूं नको ॥२०॥ वाटेल तें मोल घेई । परी गाडी भरोनी तांदुळ देई । अरे खेमू ईश्वराठायीं पुण्य तुजसी लाभेल ॥२१॥ ऐशा अडत्यांच्या माना । खेमू चराचरां कापी जाणा । दीडीदुप्पटीनें पैसे जाणा । रोखठोक घेई मोजून ॥२२॥ एवढ्या-

वरी चालले ब्लॅक बरें । परी पुढें पडलें काळ-वारें । खेमूसह घरदार सारें । गेलें नष्ट होवोनी ॥२३॥ तयास घडलें एक कारण । खेमूस भेटला नष्ट कारकून । हिशेब राखण्यासाठीं जाण । येत होता तद्गृहीं ॥२४॥ कारकून म्हणे खेमूसी । सरळ व्यवहार कां करिसी ? । जावोनी पहा तर्पणासी । कैसी लूट चालली ! ॥२५॥ गरजू गिऱ्हाईक अडल्यावरी । त्याचा विचार ढकलावा उद्यांवरी । त्याच रात्रीं-भितरी । तांदुळ कुजवावे पाण्यानें ॥२६॥ [illegible] उद्यांचा करितां वायदा । फायदेशीर [illegible] । अल्पकाळीं तुझी संपदा । [illegible] ॥२७॥ त्याच परी देशी दारूंत । पन्नास टक्के पाणी ओत । चक्षुपात लवत न लवत । कुबेर येथला होशील ॥२८॥ आपोआप संधि आली । ती जर ऐशी गमविली । खास पिढी पुढली । खदखदून हंसेल ॥२९॥ खेमूसही हा विचार । सुचत असे वारंवार । परि तया नव्हता धीर । बदकर्म तसलें करावया ॥३०॥ परी कारकुनें शिकवितां मंत्र । खेमूस पटलें तयाचें तंत्र । कर्म करण्या स्वतंत्र । पिटाळोनी लाविलें कारकुनासी ॥३१॥ दीर्घद्वेषी तो कारकून । 'ओफेंदेर' होतांची जाण । सेलाद फोल आणून । 'देनूंस' केली खेमूवरी ॥३२॥ स्वाक्षरीसह 'रेकेरिमेंत' । नोतारियाच्या रेकोंज्येसिमेंतासहीत । स्वयें घेवोनी हातांत । प्रविष्ट झाला चौकीवरी ॥३३॥ खेमूच्या सर्व खाणाखुणा । पूर्ण माहीत त्या कारकुना । प्रति दुर्वासासारिखा बाणा । लक्षणार्थी असे त्याचा ॥३४॥ पोलीस घेऊन बरोबर । आला पोळेंच्या किनाऱ्यावर । भर दुपारीं 'बुस्कार' घर । केलें खेमूचें ॥३५॥ तांदुळ मद्यासह चोरटा माल । तिथें सांपडला विपूल । पोलीस घेती ताब्यांत सकल । भरली शंभर खेमूची ॥३६॥ मग करितां 'आप्रेसांव' । बंद पडोनी 'कुरासांव' । देवाचेंहि न घेतां नांव । खेमू गेला यमपुरीं ॥३७॥ तया खेमूच्या उभय पत्नी । स्वगृहाचा त्याग करोनी । माजाळींत जावोनी । भीक मागोनी पोट भरिती ॥३८॥ घरादाराचा झाला लिलांव । खेमू शिकला 'लिलांव' । अंतीं तयाचें नुसतें नांव । लोक आतां विसरले ॥३९॥ ब्लॅकाचा हा परिणाम । न चुके भोगल्यावांचून । सर्व ब्लॅकिस्तांसी करोनी नमन । तत्त्वसार सांगितलें ॥४०॥

★ ★ ★

कवि चिंतामणी यांनीं एकंदर तीस अध्यायांत हें पुराण पुरें केलें आहे. तें पुरें करतांना अखेरच्या ३० व्या अध्यायांत ते लिहितात— " लिहिलें मानिफेस्त पुराण । नंतरी तें देमांद पुराण । आतां लिहून ब्लॅक पुराण । लेखणी खालीं ठेवितों ॥ आतां प्रभूसी एक मागणें । आणीक पुराण खरडण्या-कारणें । पुन्हां हातीं कलम घेणें । प्राप्त न करणें कवीसी ॥ दुष्टां शिष्टां करोनी नमन । सर्वांशीं 'दिशूकुल्प' मागोन । बंद करितों हें पुराण । म्हणे चिंतामणी ॥ ".

आणि यानंतर अल्पावधींतच कवीचें देहावसान झाल्यानें हें त्यांचें काव्य दुर्दैवानें अखेरचें ठरलें.

'जनसेवा ही ईश्वरसेवा' हें उच्च ध्येय दृष्टीपुढें ठेऊन डॉ. गोविंद पुंडलीक हेगडे देसाई हे भारत पत्राच्याद्वारें वृत्तपत्र व्यवसायाच्या कठिण कार्यांत शिरले आणि अनेक संकटांना धडाडीनें तोंड देत देह पडेपर्यंत त्यांनीं तें असिधाराव्रत एकनिष्ठपणें चालविलें. स्वत:ची प्रकृति, परिवार, संसार यांकडेहि दुर्लक्ष करून निष्ठापूर्वक आपलें कार्य करतां करतांच सोमवार दि. १५ ऑगष्ट सन १९४९ रोजीं त्यांनीं अखेरचा श्वास सोडला.

"मला जरा उठवून बसवा म्हणजे पोर्तुगीज प्रुफें तेवढीं बघून टाकतों" हे त्यांचे अखेरच्या अत्यवस्थ स्थितींतील शब्द 'भारत' पत्राशीं ते किती तादात्म्य पावलेले होते हें स्वच्छ दर्शवीत आहेत.

मोठ्या कठिण प्रसंगींहि न डरणारी आपली निःस्पृह लेखणी फक्त अखेरच्या दिवशीं त्यांनीं खालीं ठेवली.

दुर्दैव असें कीं, त्यांच्या अंतासोबतच 'भारत' पत्राचाहि अंत झाला. दिनांक ११ ऑगस्ट सन १९४९ रोजीं प्रकाशनांत आलेला 'भारत'चा ३४ व्या सालचा १९ वा अंक दुर्दैवानें अखेरचा ठरला.

★ ★ ★

विद्याप्रसार

हें पाक्षिक पत्र सन १९१५ सालीं फोंडें येथें सुरू झालें. 'लीग द प्रोपागांद द इंस्त्रुसांव' या फोंडें येथील शिक्षण प्रसारक संस्थेचें तें मुखपत्र होतें. 'प्राचीप्रभा' नियतकालिकाची पाक्षिक पुरवणी म्हणून हें निघत असे. शिक्षणविषयक व इतर विविध सामाजिक विषयांवरील लेख यांत येत असत. आरंभीं याचा आकार मोठा असे, पण नंतरचे अंक लहान आकारांत निघूं लागले.

या पाक्षिकाचे संपादक मि. रामचन्द्र पांडुरंग वैद्य तथा दादासाहेब वैद्य हे असून सेक्रेटरी कै. सीताराम विश्वंभर केरकर हे होते. या पत्राची वार्षिक वर्गणी अवघी १ रुपया होती.

उत्तरार्धांत कांहीं काल या पत्राच्या संपादनकार्याकडे वै. दत्तात्रेय व्यंकटेश पै हे लक्ष देत असत.

विद्याप्रसार पत्र ५ वर्षें चाललें आणि सन १९२१ सालीं तें कायमचें बंद पडलें.

★ ★ ★

स्वयंसेवक

'स्वयंसेवक' त्रैमासिकाचा जन्म फोंडें येथें सन १९१५ सालीं झाला. व्यवहारी कार्यालय फोंडें येथें असलें, तरी कायद्याच्या बाजूनें तें केपें येथील 'भारत' पत्राची पुरवणी म्हणून निघत असे. याचे संपादक श्री. वि. का. प्रियोळकर हे असून प्रकाशक रा. शां. का. प्रियोळकर हे होते. तीन वर्षांनंतर याचें स्वतंत्र रजिस्ट्रेशन होऊन सन १९१८ पासून त्याचें प्रकाशन मासिक स्वरूपांत फोंडें येथें

होऊं लागलें. नियमीतपणा साधण्यासाठीं चालकांनीं स्वतंत्र छापखानाहि उभारला; पण तो कित्येक वेळां साधलाच नाहीं. स्वयंसेवकाच्या कार्यांत आर्थिक तुटीमुळें संपादक प्रियोळकर यांना बरीच झीज सोसावी लागली, तरी अंकाचें अंतरंग व्यवस्थित सजविण्याकडे त्यांचें फार लक्ष असे. महाराष्ट्रांतील कांहीं प्रसिद्ध लेखकांचे लेखहि स्वयंसेवकांत प्रसिद्ध झालेले आहेत. मातृअंक व बृहन्महाराष्ट्र अंक हे स्वयंसेवकाचे दोन्ही विशेषांक वाचकांचें लक्ष वेधून घेणारे होते. यांत क्रमशः प्रसिद्ध झालेलें 'देमांदमहात्म्य' खंड काव्य तर कित्येकांना फार आवडलें.

सन १९२६ सालीं आर्थिक तुटीमुळें 'स्वयंसेवक' मासिक बंद पडलें. तथापि मासिकासाठीं थाटण्यांत आलेलें मुद्रणालय सुरू होतें; आणि त्याच मुद्रणालयांतून श्री. प्रियोळकर यांनीं पुढें सन १९३० सालीं लहान आकाराचें 'स्वयंसेवक' साप्ताहिक सुरू केलें. या पत्राचें अंतरंग व बहिरंगहि नवीन पद्धतीचें होतें. तरी जमाखर्चाचा मेळ बरोबर बसणें अशक्य होऊं लागल्यानें 'स्ववंसेवक' नियतकालीक कांहीं कालानें कायमचें बंद पडलें.

★ ★ ★

स्वदेश (अ पात्रिअ)

सन १९१७ सालीं पणजी येथें कै. रामचंद्र मंगेशराव देशपांडे यांनीं हें साप्ताहिक सुरू केलें. या पत्राचें मुखपृष्ठ व आंतील प्रथम पान यांवर पोर्तुगीज लेख येत असत आणि नंतर काहीं मजकूर मराठींत येई. अल्प कालांतच म्हणजे सन १९१८त हें पत्र बंद झालें.

★ ★ ★

गायकमित्र

गोमंतकांतील गायक समाजाच्या पुढाऱ्यांतर्फे हें मासिक केपें येथील 'भारत' पत्राची पुरवणी म्हणून सुरू झालें. याचें कार्यालय फोंडें येथें असे. हें मासिक सन १९१८च्या जुलै महिन्यांत सुरू झालें आणि १९१९ सालीं अवघेच अंक निघून नंतर बंद पडलें.

★ ★ ★

नवजीवन

नवजीवन पत्र पणजी येथें सन १९२० सालीं सुरू झालें. आरंभीं याचें प्रकाशन साप्ताहिक होतें. साप्ताहिक स्वरूपांत तें १९२१ पर्यंत चाललें आणि नंतर त्याचा आकार बदलून प्रकाशन मासिक करण्यांत आलें. या नियतकालिकाचे संपादक पणजी येथील एक व्यापारी रा. जनार्दन ना. पै अस्नोडकर हे होते आणि प्रकाशक रा. नरसिंह रा. भोंसुले हे होते. साप्ताहिकाचा आकार 'भारत' पत्राचा असून मासिकाचा लहान असे. मासिक मोठ्या स्वरूपांत दीर्घकाल चालवावें अशी संपादकाची उत्कट ईच्छा असली तरी जमेपेक्षां खर्च वाढत गेल्यानें चालकांनीं तें बंदच करण्याचा निर्णय घेतला.

★ ★ ★

- १२ -

प्रगति

गोमंतक-मराठा समाजाच्या सर्वांगीण सुधारणेसाठीं झटणाऱ्या त्या समाजांतील कांहीं तरुण पुढाऱ्यांनीं आपल्या संकल्पित कार्याचें एक साधन म्हणून 'प्रगति' पत्रास जन्म दिला. सन १९२० सालीं पहिल्या प्रथम हें पणजी येथें सुरू झालें. या साप्ताहिकाचा आकार 'भारत' पत्राच्या नंतरच्या आकारा-एवढा असून पृष्ठें चार होतीं. कै. मोतिराम बा. जांबावलीकर व कै. सखाराम रामनाथकर असे जांबावली व रामनाथीं येथील दोघे पुढारी या वृत्तपत्राचे संपादक होते. उत्तरार्धांत 'प्रगति'चें कार्यालय व छापखानाहि राम-नाथीं येथें थाटण्यांत आला होता.

प्रगति पत्राचा खप मर्यादित असल्यानें या पत्राच्या प्रकाशन कार्यांत चालकांना बराच तोटा आला आणि फार काल न टिकतां तें अल्पावधींतच म्हणजे १९२१ सालीं कायमचें बंद पडलें.

★ ★ ★

गडगडाट

सदरील प्रगति पत्राची पुरवणी म्हणून 'गडगडाट' पाक्षिक पणजी येथें सुरू कर-ण्यांत आलें. या पाक्षिकाचे संपादक रा. जे. के. देसाई हे होते. याचा आकार लहानसाच असून पृष्ठें ४ होतीं. सन १९२१ तच याचा आरंभ नि अंतहि झाला. अवघेच अंक प्रकाशनांत आले होते.

★ ★ ★

नापितोदय

नाभिक समाजांतील कांहीं पुढाऱ्यांच्या प्रयत्नानें पणजी येथें सन १९२१ सालीं हें मासिक सुरू झालें. याचा आकार क्रॉऊन सोळा पेजी होता. पृ. १६ शिवाय कव्हर.

मासिक अगदीं छोटें असलें तरी त्यानें ज्ञातिसेवा यथाशक्ति बजावण्यास कुचराई केली नाहीं. चालकांनीं याच्या छपाई कामांतहि फार त्रास सहन करून कुशलता दाखविली आहे. नापितोदय हें नांव २ ऱ्या वर्षीं बदल-ण्यांत येऊन त्या ऐवजीं पुढें 'नाभिकोदय' असें नांव या मासिकाला प्राप्त झालें. या मासिकाचे संपादक रा. व्ही. एफ्. कालेलकर व आमोणकर हे होते. हें मासिक दोन वर्षें चाललें व नंतर बंद पडलें.

★ ★ ★

भारतोदय

सन १९२१ सालच्या महाशिवरात्रीच्या दिवशीं रिवण येथील श्रीविमलेश्वर देवस्थानांत भारतकार हेगडे देसाई यांच्या हस्तें 'भारतोदय' मासिकाच्या प्रथमांकाचें प्रकाशन झालें. या मासिक पुस्तकाचा आकार डेमी आठ पेजी होता. केपें येथील 'भारत' प्रेसांत याचें मुद्रण करण्यांत येत असे. भारत पत्राची पुरवणी म्हणून हें निघत असलें तरी भारताशीं त्याचा अन्य कोणताच संबंध नसून तें पूर्णपणें रिवण येथील 'हिंदु समाज' संस्थेच्या माल-कीचें होतें. शेतकी आणि उद्योगधंदे या

विषयांना वाहिलेलें हें गोमंतकाचें पहिलेंच व एकमेव मासिक होतें. अंकाची पृष्ठसंख्या २४ व शिवाय कव्हर असे.

श्री. ना. भा. नायक व वा. वि. प्र. देसाई हे भारतोदयाचे संपादक होते. व्यवस्थापकीय जबाबदारी देसाई यांकडे असे. भारतोदयाच्या प्रथमांकापुरताच खर्च हिंदु समाज संस्थेकडून करण्यांत आला. दुसऱ्या अंकाचा खर्च वा. वि. देसाई यांकडून झाला आणि तिसऱ्या अंकाचा खर्च ना. भा. नायक यांनीं केला. प्रती फक्त ५०० निघत. अवघ्या तीनच अंकांनी भारतोदयानें दीर्घ विश्रांति पत्करली. या मासिकाची वा. वर्गणी दोन रुपये होती.

★ ★ ★

भारतमित्र

भारतमित्र मासिकाचें मुंबई सरकारांत रजिस्ट्रेशन होऊन खानापूर (बेळगांव) येथें त्याचा नमुना अंक १९२१च्या डिसेंबरच्या ५ तारखेस प्रसिद्ध झाला. आणि जानेवारी १९२२ पासून त्याच्या प्रकाशनास सुरवात झाली. खानापूरच्या धनंजय छापखान्यांतच त्याचें बरींच वर्षे मुद्रण झालें. पुढें योग्य वेळीं त्याचें गोवा सरकारांत रजिस्ट्रेशन झालें, तरी बरींच वर्षे पर्यंत छपाई धनंजय छापखान्यांतूनच करून घेण्यांत येई.

भारतमित्राचा आकार आरंभापासून आज-पर्यंत डेमी अष्टपेजी आहे. सुरवातीला १६ पृष्ठें व कव्हर, नंतर २० आणि पुढें २४ व २८ अशी वाढ होऊन पृष्ठें ३२ पर्यंत झालीं. अलीकडे जाने-वारीच्या अंकाचीं पृष्ठें ५२ व ६० ते ६४ पर्यंत असतात. यांत सामाजिक, सांस्कृतिक, राज-कीय, धार्मिक, औद्योगिक इ. विविध विषयां-वरील लेख, कथा, कविता, इतिहास इ. साहित्य प्रकाशीत होत असतें. प्रती ५०० पासून सुरू होऊन ८००, १०००, २००० अशा वाढत गेल्या. वर्गणी आरंभीं वा. दोन रुपये, २ऱ्या वर्षापासून अडीच रुपये, २०व्या वर्षापासून तीन रुपये आणि २५व्या वर्षापासून वार्षिक साडेतीन रुपये करण्यांत आली. ती आज परवडणारी नसली तरी चालू आहे. भारत-मित्राच्या वाचक वर्गांत हिंदु आहेत, ख्रिस्ती आहेत आणि इस्लामीहि आहेत.

भारतमित्राचें प्रकाशन साप्ताहिक व पुढें दैनिकहि करावें अशा प्रबल इच्छेनें सन १९५८ सालीं स्वतंत्र छापखाना उभारला. छापखान्याच्या स्थापनेसाठीं सरकारी परवा-न्याची जरूरी असल्यानें गोव्याच्या तत्कालीन पोर्तुगीज सरकारांत अर्ज केला ; पण ‘ भारत ’ हें पोर्तुगिजांचें शत्रुराष्ट्र झाल्यानें भारतमित्र मासिकाच्या छापखान्याला ‘ भारतमित्र ’ हें नांव देण्यास मंजुरी मिळेना. एक अर्ज नामंजूर झाल्यावर दुसरा अर्ज केला, पण त्यालाहि मंजुरी मिळण्याचें चिन्ह न दिसल्यानें पुनः प्रयत्न केला आणि त्यानंतर फक्त ‘ मित्र ’ हें नांव वापरण्यास परवानगी मिळून छापखाना अस्तित्वांत आला. भारतमित्राचें कार्यालय रिवण येथें असलें तरी छापखान्याचा

संसार धंद्याच्या सोयीसाठीं मडगांवला थाटावा लागला. १९५८ ते १९६१ अशीं चार वर्षें छापखाना चालविला, तथापि अनेक कारणामुळें दैनिक तर सोडाच; पण साप्ताहिकहि काढणें कठिण होऊं लागलें. त्यांत महा भयंकर अडचण आली ती सेंसरची !

कार्यालय रिवणला, छापखाना मडगांवला आणि सेंसर कमिटी पणजीला ! सेंसरच्या जाचांमुळें खरें बोलणारें पत्रच नव्हे; तर मासिकहि टिकविणें कठिण होऊन बसलें आणि अशा रीतीनें छापखान्याचा प्रयत्न कोणत्याच दृष्टीनें फायद्याचा न होतां दरमहा जबरदस्त नुकसान येऊं लागल्यानें निरुपाय होऊन १९६१ च्या ऑक्टोबरांत छापखाना बंद करावा लागला. पुढें दोनच महिन्यांनीं गोवा मुक्त होऊन मुद्रणालयांना चांगले दिवस दिसूं लागले.

कार्याचीं पंचवीस वर्षें पूर्ण झाल्यावर भारतमित्राचा जो रौप्यमहोत्सव समारंभ झाला त्यावेळीं निघालेला रौप्यमहोत्सव अंक साहित्य नि सजावट या दोन्हीं बाबतींत सरस निघाल्याबद्दल अनेक वृत्तपत्रांचे व विद्वानाचे अभिप्राय प्रगट झाले आहेत. यानंतरचे गोमंतक स्वातंत्र्य-अंक, संस्कृति-अंक, त्रितप महोत्सव-अंक वगैरे वाचकांना फार आवडले.

संचालन, संपादन, संगोपन व संवर्धन अशीं सर्व सूत्रें संभाळीत श्री. नारायण भास्कर नायक यांनीं भारतमित्र मासिक सतत ३६ वर्षें चालवून आज त्याचें ३७ वें वर्ष सुरू आहे. इतकें दीर्घ काल चाललेलें गोव्याचें हेंच एकमेव मासिक आहे. आरंभापासून भारत-मित्राचे संपादक, चालक, मालक व प्रकाशकहि तेच आहेत.

१९५५ ते १९६० या सहा वर्षांत भारतमित्राला सरकारी त्रास फार सहन करावे लागले. भारताविरूद्ध मजकूर, पं. नेहरूंना शिव्या, महात्माजींची थट्टा अशा विषयांच्या सरकारतर्फे आलेल्या मजकुराला प्रसिद्धी न दिल्यानें आणि उलट इतिहासकालांतील पोर्तु-गिजांच्या अत्याचारांना साधार प्रसिद्धी दिल्यानें संपादक नायक यांना सरकारी काळया यादींत नोंदण्यांत येऊन प्रत्येक गोष्टींत पोलिसी अडथळा येऊं लागला. एकदां तर पणजीला पोलिस कमांडरच्या कॅबिनमध्यें चार तासपर्यंत स्थानबद्ध होऊनहि बसावें लागलें.

यानंतर 'भारतमित्र' हें नांव बदलून 'गोवामित्र' करण्याबद्दलचा ससेमिरा संपा-दकाच्या पाठीशीं लागला. हें सांगणें सकृत्दर्शनीं हास्यास्पद असलें, तरी तें सबलांचें असल्यानें काय करावें हेंच समजेना. फार सावधानतेनें हळुवारपणें हा प्रश्न हाताळावा असें ठरवून दिवस घालविले. तथापि एकदां गव्हर्नरच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून आमंत्रण आलेंच. पणजीला जाऊन विचारासाठीं मुदत मिळविली आणि इतक्यांत अखेरचे गव्हर्नर जनरल ज. व्हासालु सिल्व इकडे आल्यावर त्यांना संपा-दकांचें निवेदन पटून पुढें मूळचेंच नांव बदल करावें न लागतां कायम राहिलें.

'भारत' पत्राच्या विश्रांतीनंतर सन १९५० पासून १९६० पर्यंत दहा अकरा वर्षांच्या कालांत गोमंतकीय हिंदूंनां आपलें असें म्हणण्यास एकहि मराठी नियतकालिक नव्हतें. अशा वेळीं भारतमित्राशिवाय ते अन्य कोणाकडे आपुलकीनें बोट दाखविणार? त्यावेळीं भारतमित्रानें त्यांचें यथाशक्ति प्रतिनिधित्व केलें आणि जनतेनेंहि त्याचें आपुलकीनें कौतुक केलें.

संकल्पित इच्छेप्रमाणें स्वत: भारतमित्राला जरी साप्ताहिक किंवा दैनिक स्वरूपांत प्रगट होतां आलें नाहीं; तरी त्याची गोमंतकीय दैनिकाची इच्छा आजच्या चार दैनिकांनीं साकार केली आहे.

त्रितप महोत्सव अंकांतील एक उतारा :—

"काल कोणत्याहि कारणाकरतां न थांबतां असा भराभर निघून जातो कीं, कित्येक वेळां त्याकडे कोणाचें अवधानहि राहात नाहीं. पळें, घटिका, तास, दिवस, मास, वर्षें व तपें निघून जाऊन कालाच्या विशाल उदरांत गडप होतात आणि त्यांतील एखादें पळहि आपल्याला परत मिळत नाहीं. पण त्या कालांत जें कांहीं सत्कृत्य घडलें त्याचा फायदा मात्र देशाला सतत मिळत राहातो."

"भारतमित्राच्या लोकसेवेच्या तीन तपांच्या कालांत त्याचे एकूण ४३२ अंक प्रसिद्ध झाले, व त्यांतून काव्य, कथा, निबंध, इतिहास, समाजकारण, राजकारण, कायदे, स्थलवर्णनें, प्रचलित माहिती इ. विविध विषयांवरील लेखन प्रकाशनांत आलें. या साहित्यसेवेबद्दल वाचकवर्गानें व हितचिंतकांनीं आपली ठीक सहानुभूति दाखविली. अतएव त्यांच्या सहानुभूतीमुळेंच 'मित्रा'सहि स्वीकृत कार्यास स्फूर्ति मिळाली आणि अशा रीतीनें त्रितप महोत्सवाचें भाग्य त्याला लाभलें याबद्दल आमच्या प्रमाणेंच त्यांनांहि फार समाधान वाटेल यांत शंका नाहीं......"

"देशाची संस्कृति चिरंजीव करून राष्ट्रोत्तेजक विचार, उत्साह व स्फूर्ति वाढविण्याचें सामर्थ्य नियतकालिकांतच विशेष असतें, म्हणून देशाच्या उत्कर्षाशीं विलक्षण संबंध असलेल्या या नियतकालिकांच्या बाबतींत औदासिन्य न दाखवितां त्यांच्या उत्कर्षासाठीं मन:पूर्वक हातभार लावणें स्वाभिमानी नागरिकांचें आद्यकर्तव्य आहे. या आपल्या कर्तव्यास ते चुकणार नाहींत अशी आशा आहे......"

★ ★ ★

हिंदुस्थान (इस्तादु द ईंदिअ)

हें पाक्षिक पत्र पोर्तुगीज व मराठी अशा दोन भाषांतून प्रसिद्ध होई. आकार लहानसाच असून पृष्ठें चार असत. पहिल्या दोन पृष्ठांवर पोर्तुगीज मजकूर व तिसऱ्या पानावर मराठी लेखन येत असे. चौथें पृष्ठ बहुतेक जाहिरातींना देण्यांत येई. याचे संपादक श्री. शिवेस्कर हे होते.

★ ★ ★

– १३ –

हिंदु

सन १९२४ च्या २७ जानेवारी रोजीं मडगांव येथें 'हिंदु' साप्ताहिकाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. या पत्राचे संस्थापक व संचालक पारोडें येथील विचारवंत कार्यकर्ते वै. पुरुषोत्तम श्रीनिवास शेणवीं सुकेरकर हे असून प्रकाशक वै. जयवंत श्रीनिवास सुकेरकर आणि कार्यकारी संपादक वै. दत्तात्रेय व्यंकटेश पै हे होते. या पत्रासाठीं स्वतंत्र छापखाना थाटला होता व त्याचें नांव 'हिंदु छापखाना' असें होतें.

'हिंदु' फक्त मराठी भाषेंत दर रविवारीं निघे व त्याची वार्षिक वर्गणी ३॥ रुपये असे. आकार 'भारत' पत्राएवढा लहानसाच असून प्रथमांकाचीं पृष्ठें फक्त चार होतीं. पुढें तीं दुप्पट करण्यांत आलीं. या साप्ताहिकाची मांडणी व्यवस्थित व लेखनपद्धत ठीक होती. आपल्या सात वर्षांच्या आयुष्यांत 'हिंदू'नें हिंदुसमाजांत उल्लेखनीय कार्य केलें.

हिंदु पत्राच्या प्रथमांकांत प्रसिद्ध झालेला पहिला अग्रलेख असा होता :—

उद्दिष्ट कार्य

वर्तमानपत्राच्या द्वारें विशेषत: गोमांतकाची व पर्यायानें आपला मायदेश जो आसेतुहिमाचल हिंदुस्थान त्याची शक्त्यनुसार अल्पस्वल्प सेवा करण्याची कित्येक वर्षांची मनीषा आज मूर्त स्वरूपांत येऊं लागल्याबद्दल समाधान वाटणें साहजिक आहे ! अशा प्रसंगीं ज्या सत्संकल्पदात्या भगवंताच्या कृपेनें तें समाधान लाभलें त्याच्या कृपाप्रसादाची पुढील कार्यांतहि यश देण्याबद्दल याचना करणें हें आमचें पहिलें कर्तव्य होय.

कोणतेंहि नियतकालिक म्हटलें कीं, त्याचा उद्देश स्वसमाजाच्या अगर देशाच्या उत्कर्षास हातभार लावणें हाच असणार. पण समाजाचीं अंगें अनेक आहेत आणि त्याचा खरा उत्कर्ष म्हटला म्हणजे त्या सर्व अंगांचा उत्कर्ष होय. परंतु एकाच व्यक्तीला अगर संस्थेला या सर्व अंगांच्या उत्कर्षार्थ सदोदित सारख्याच प्रमाणांत झटतां येणें शक्य नाहीं. सबब जिला ज्या अंगांची विशेष महती व आवड वाटत असेल तिनें त्या अंगाच्या उत्कर्षार्थ झटणें हेंच आपलें मुख्य उद्दिष्ट ठरवून इतर अंगांकडे फक्त प्रसंगविशेषीं नजर पुरवणें साहजिक असतें.

'हिंदू'ला गोमांतकाच्या सद्यपरिस्थितींत राजकारणाचें महत्व सर्वांत अधिक वाटतें. या बाबतींत त्याचीं कांहीं विशिष्ट तत्त्वें ठरलेलीं आहेत. तीं लोकांना पटवून द्यावीं व तदनुरोधानें त्यांना कार्यप्रवृत्त करावें एतदर्थ आपलें शक्तिसर्वस्व वेंचण्याची उमेद बाळगून तो आपल्या कर्तव्यक्षेत्रांत आज पहिलें पाऊल टाकीत आहे.

राजकारण म्हटलें कीं, त्याला राष्ट्राची अपेक्षा असते. राष्ट्राशिवाय राजकारण मुळीं संभवतच नाहीं. गोमांतकाचें राष्ट्रीयत्व सध्या अनिश्चितावस्थेंत भ्रमण करीत आहे. त्याला स्थिरत्व प्राप्त झाल्याशिवाय आमची खरी राजकीय उन्नति केव्हांहि होणें शक्य नाहीं. हें आमचें पहिलें तत्व आहे.

प्रत्येक राष्ट्राला इतर राष्ट्रांपासून भिन्न करणारे म्हणजे अनन्यसामान्य किंवा व्यवच्छेदक असे कांहीं गुणधर्म असतात. या गुणधर्मसमुच्चयाला त्या त्या राष्ट्रांतील लोक 'स्वत्व' अशी व्यापक संज्ञा देत असतात. या स्वत्वाच्या अस्तित्वावरच राष्ट्राचें जीवन अवलंबून असतें. स्वत्वनाश हाच राष्ट्रनाश असतो. सबब आम्हां गोमांतकीयांना जर राष्ट्रीयदृष्ट्या जगावयाचें असेल तर स्वत्वाची ओळख पटवून घेऊन त्याच्या संरक्षणाची तरतूद करणें अपरिहार्य होय हें आमचें दुसरें तत्व आहे.

शासित वर्गाच्या कल्याणांतच शास्त्यावर्गाचेंहि कल्याण असतें. सबब पहिल्यानें दुसऱ्यावर जुलूम न होईल अशा रीतीनें आपलें वर्तन ठेवल्याशिवाय आणि दुसऱ्यानें पहिल्यावर आपला वचक राहील अशा रीतीनें सुशिक्षित, कर्तव्यदक्ष व सुसंघटित झाल्याशिवाय राज्यकारभाराचें गाडें प्रगतिपथावरून सुरळीतपणें जाणें शक्य नाहीं हें तत्व तर सर्वमान्यच आहे.

आमचें चवथें तत्व असें आहे कीं, कांहीं विशिष्ट कारणामुळें गोमांतकाचें राजकारण इष्ट वळणावर नेण्यास फक्त हिंदु किंवा परधर्मी पण हिंदूंच्या विचारांचे लोकच समर्थ आहेत. तथापि आज अशा लोकांची चलती नसून इतरेजनांतच त्यांची गणना होत असते. ही स्थिति बदलावयाची असली तर हिंदु प्रथमत: सतेज झाले पाहिजेत. व याचसाठीं राजकीय विषयांची मराठींतून केलेली चर्चा सरकारी अधिकाऱ्यांवर विशेष परिणामकारक होणार नाहीं हें जाणत असूनहि आम्हीं मराठींतूनच पत्र काढण्याचा विचार केला. हिंदूंत पाहिजे तितकें सामर्थ्य उत्पन्न झाल्यावर त्यांच्या संघटित शक्तीनें राज्यकारभारांत इष्ट सुधारणा घडवून आणण्याकरतां पुर्तुगेज भाषेंतूनहि स्वतंत्र पत्र काढण्याचा आमचा मनोदय आहे.

या चारहि तत्वांना अनुसरून लोकमत तयार करणें, त्यांना पोषक अशा चळवळींचा जोरानें पुरस्कार व मारक असणारांना कसून विरोध करणें एतदर्थ 'हिंदु' आपलें शक्तिसर्वस्व वेंचण्यास कसलीहि कसूर करणार नाहीं. वाचकांना गोव्यांतील पुर्तुगेज राजकारणाचें यथार्थ ज्ञान व्हावें म्हणून पुर्तुगालचें राजकारण, पुर्तुगेज राज्याची रचना, गोव्याचा इतिहास वगैरे विषयांवर भरपूर माहितीचे स्वतंत्र लेख मधून मधून प्रसिद्ध होतील.

'हिंदू'च्या सर्वसामान्य धोरणाची कल्पना येण्यास आज जितकें लिहिलें आहे त्याच्यापेक्षां अधिक लिहिण्याची गरज नाहीं, असें आम्हांस वाटतें.

* * *

या अग्रलेखावरून 'हिंदु' पत्राचें ध्येय व धोरण यांची सहज कल्पना येते.

अग्रलेखानंतर 'स्फुट विचार'; पुढें एक स्वतंत्र लेख आणि नंतर त्रोटक 'वर्तमान सार' देण्यांत येई.

प्रथमांकांतील स्वतंत्र लेख असा होता:—

गोव्यांत तयार झालेलीं मराठी व्याकरणें

पोर्तुगीज मिशनरी प्रथमतः जेव्हां गोव्यामध्यें आले, तेव्हां धर्मप्रसाराचें खरें साधन जी एतद्देशियांची भाषा, ती हस्तगत करून घेण्याचे थोडेबहूत प्रयत्न त्यांनीं केल्याचें आढळून येत; परंतु हे प्रयत्न योग्य रीतीनें केले गेले नाहींत आणि खुद्द भाषेच्या ज्ञानापेक्षां धर्मप्रसाराकडे त्यांचें अधिक लक्ष असल्यामुळें त्यांच्या हातून एतद्विषयीं फारच मोठ्या चुका झाल्या. एका पाद्रीनें उठावें आणि Bracmana-Canarim असें नांव देऊन एक मराठी भाषेचें अशुद्ध व्याकरण लिहावें; दुसऱ्यानें उठावें आणि Gramatica da lingua bramanica असें कांहीं तरी नामाभिधान देऊन रोमन लिपींत कोंकणी भाषेचें म्हणून एखादें पुस्तक लिहावें, आणखी कोण्या सोम्यानें पुढें यावें आणि Gramatica Concarina अशी संज्ञा देऊन आपली भाषाभिज्ञता प्रगट करावी. असा प्रकार कित्येक वर्षेंपर्यंत चालू होता. परंतु एकाहि मिशनऱ्याला गोमांतकाची खरी भाषा कोणती याचें वास्तविक ज्ञान झालें नसून केवळ खालच्या वर्गांतील अज्ञ लोक जी भाषा बोलत, त्या भाषेच्या निरनिराळ्या स्वरूपाचींच त्यांनीं अशुद्ध व्याकरणें लिहिलीं. या संबंधीं Murray Michel यानें आपल्या Marathi Works Composed by the Portuguese या पुस्तकांत पुढील उद्‌गार काढलेले आहेत:—

O dialecto marata dos pescadores e cultivadores de Gôa foi adoptado pelos missionarios portugueses sem fazerem esforço algum para o elevar ou sistematisar.

इ. स. १८४३ सालीं पणजी येथें जेव्हां एक नवीनच सरकारी मराठी शाळा सुरू झाली (Cadeira da lingua marata e Canará) तेव्हां त्या शाळेंत कोणतें मराठी व्याकरण शिकविलें जावें हा वाद होता. मुंबई पुण्याकडे देखील मराठीचीं व्याकरणें तयार झालीं नव्हतीं. खुद्द दादोबा पांडुरंगी व्याकरण १८४३ च्या नंतर तयार झालें हें प्रसिद्ध आहे. अशा स्थितींत वरील शाळेच्या उपयोगाकरितां म्हणून १८५४ सालीं फिलिप नेरी पीरिश् नावांच्या एका गृहस्थानें एक मराठी व्याकरण प्रसिद्ध केलें (Gramatica explicada em lingua marata - Bombay 1854) आणि सरकारनेंहि त्याच वर्षीं सदरहू व्याकरणाला मंजुरी दिली. याच्या पूर्वीं हस्तलिखित खर्ड्यांच्या द्वारें त्या शाळेंत शिक्षण दिलें जात असे.

फिलिप नेरी याचें वरील व्याकरण हें गोव्यांत पोर्तुगीज भाषेंतून प्रसिद्ध झालेलें थोडेंबहूत शुद्ध व पद्धतशीर असें पहिलेंच व्याकरण होय.

पीरिश् याचें अशा प्रकारचें व्याकरण हें प्रथम प्रसिद्ध झालेलें पहिलें व्याकरण असलें,

तरी त्याच्या पूर्वी म्हणजे इ. स. १८१९ सालीं सखाराम वाघ या नांवाच्या एका गृहस्थांनीं मराठी भाषेचें फार चांगलें नमुनेदार असें पोर्तुगिजींत एक व्याकरण लिहिलें होतें. तें ते प्रसिद्ध करूं शकले नाहींत, याचें कारण गोव्यांत १८२१ पर्यंत एकहि छापखाना नव्हता आणि यावेळीं खुद्द मुंबईकडे देखील मराठी टैप पाडले जात नसत. त्या व्याकरणाची एक हस्तलिखित प्रत कै. सूर्याजीराव देशपांडे यांच्या संग्रहीं होती असें स्वत: सूर्याजीरावांनीच लिहिलेलें आढळतें.

स. १८१९सालीं म्हणजे दादोबा पांडुरंगाच्या पुष्कळच पूर्वी मराठी व्याकरण लिहिणारे कै. सखारामपंत वाघ यांजविषयींची थोडीशी मनोरंजक माहिती येथें देतों. ते पणजी नजिक पानवेल येथें रहाणारे असून त्यांचें संपूर्ण नांव सखाराम नारायण वाघ असें होतें. हे चांगले बहुश्रुत व बुद्धिमान असून त्यांना संस्कृत, मराठी, लॅटिन, फ्रेंच, इंग्रजी वगैरे भाषा अवगत होत्या. त्यांची विद्वत्ता पाहून सरकारनें 'लिंग्व द इस्ताद'च्या जागेवर त्यांची नेमणूक केली होती; परंतु कांहीं कारणामुळें या जागेला मुकावें लागल्यानें पुढें त्यांना फारच विपत्तींत दिवस कंठावे लागले. ह्या त्यांच्या स्थितीबद्दल कींव येऊन Garcez Palha नांवाच्या एका सेक्रेतार जेरालनें १८४३त नवीनच स्थापन झालेल्या पणजीच्या पोर्तुगीज–मराठी शाळेवर त्यांची रु. १५ म्हणजे महिन्याकांठीं ३० असुर्प्यांच्या पगारावर नेमणूक केली. परंतु ह्याहि जागेवर त्यांना फार दिवस राहतां आलें नाहीं; कारण त्रिविध दुःखानें पच्छाडल्यामुळें त्यांची मानसिक स्थिति बिघडली. ते १८५७ सालीं वारले.

कै. वाघांनीं भगवद्गीतेचें पोर्तुगीजमध्यें भाषांतर केलें होतें. त्याचा हस्तलिखित एक भाग कै. सूर्याजीराव देशपांड्यांच्या संग्रहीं होता. ह्या भाषांतरासंबंधीं तत्कालीन हिंदूंची समजूत होती कीं, वाघांच्या वेडाचें कारण त्यांनीं म्लेंच्छांच्या भाषेंत केलेलें श्रीमद्‌भगवद्गीतेचें भाषांतर हें होय! हा भ्रष्टाकार सहन न होऊन श्रीकृष्ण परमात्म्यानें त्यांच्या बुद्धीचा भ्रंश केला!

पोर्तुगेज–मराठी शाळेवर सखारामपंत वाघांनंतर कै. सूर्याजी आनंदराव देशपांडे यांची २५ असूर्प्यांच्या पगारावर नेमणूक झाली. मराठीशीं यांचा दांडगा परिचय होता. फिलीप नेरीचें व्याकरण या शाळेंत शिकविलें जात असे, हें मागें लिहिलेंच आहे. तथापि सूर्याजीरावांना पीरिशच्या व्याकरणांत फार चुका आढळल्या आणि असलें व्याकरण यापुढें चालवणें बरोबर नसून नवीन व शुद्ध मराठी व्याकरणाची अत्यंत आवश्यकता असल्याचें त्यांना दिसून आलें.

ही अडचण दूर व्हावी म्हणून कै. सूर्याजी आनंदराव देशपांडे यांनी स्वत: एक मराठी व्याकरण पोर्तुगीजीमध्यें लिहिलें.

कै. देशपांडे यांनी लिहिलेल्या त्या व्याकरणाची माहिती आमच्या वाचकांना पुढें केव्हां तरी अवश्य देऊं......

* * *

हिंदु २

व्हास्कु द गाम याचा सरकारतर्फे चतुर्थशत सांवत्सरिक उत्सव साजरा झाला त्यावेळीं 'हिंदु' पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लेखनाबद्दल खटला होऊन हिंदूचे प्रकाशक या नात्यानें वै. जयवंत श्री. सुकेरकर यांना सजाहि झाली.

नवीन कायद्यामुळें पुढें हिंदूचे कायदेशीर डायरेक्टर म्हणून कांहीं काल डॉक्टर महादेव मंगेश शिवेंकर व नंतर रा. उपेंद्र गोविंद जोशी हे असून संपादक वै. दत्तात्रेय व्यंकटेश पै हे होते. पुढें अल्प दिवस या पत्राची संपादकीय जबाबदारी श्री. दामोदर अच्युत कारे व श्री. महाबळेश्वर प्रतापराव सरदेसाई यांकडेहि होती.

'हिंदु' पत्रापायीं चालक व मालक सुकेरकर बंधु यांना बरीच झीज सोसावी लागली. पत्र व्यवस्थीत चालणारें व आवश्यक असें असतांहि अखेरीस तें फार नुकसानींत आलें आणि त्यामुळें चालकांना ते बंद करावें लागलें. हें पत्र फक्त सात वर्षें चाललें. 'हिंदु' पत्राचा ता. १० मार्च १९३१ चा सातव्या सालचा ४८ वा अंक दुर्दैवानें अखेरचा ठरला. या अंकांत गोमंतकीय जनतेस उद्देशून चालकांनी पुढील विनंती केली होती:—

'हिंदू'च्या जीविताचा प्रश्न

सोडविण्याचा अखेरचा प्रयत्न करण्यासाठीं तीन महिने विश्रांति. गोमंतकीय जनतेस अगत्याची विनंति—

"चालू अंकानें 'हिंदू'चें ७वें वर्ष संपतें. त्या काळांत 'हिंदू'नें कांहीं इष्ट कार्य केलें कीं काय हें सांगण्याचें काम त्याच्या वाचकांचें आहे; आमचें नव्हे. आम्हीं स्वतः इतकेंच सांगूं शकतों कीं, 'हिंदू'त जें जें काय लिहिलें तें केवळ लोककल्याणकर वाटलें म्हणून लिहिलें. त्याचप्रमाणें 'हिंदु' वृत्तपत्र-शास्त्राच्या नियमांनुसार चालवला जावा, ह्याबद्दलहि आम्हीं नेहमीं प्रयत्न केला.

पण, दोष कोणाचा असेल तो असो, 'हिंदू'ची आर्थिक स्थिति दिवसें दिवस बिघडतच गेली आणि आज ती इतक्या थराला पोंचली आहे कीं, त्याचें जीवितच धोक्यांत सांपडलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. 'हिंदु' व त्याचा छापखाना ह्यांच्या डोक्यावर असलेल्या कर्जाचें व्याज आणि वर्ष अखेर पडणारी तूट यांची भरपाई करणें यापुढें त्याच्या चालकांस केवळ अशक्य होऊन बसलें आहे.

तथापि, हातीं घेतलेलें कार्य मध्येंच बंद पडूं नये अशी आमची मनापासून इच्छा असल्यानें, 'हिंदू'च्या जीविताला शाश्वती आणतां येईल कीं काय ह्यासंबंधीं शेवटचा प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे. हा प्रयत्न म्हणजे 'हिंदू'ची वर्गणीदारांकडे बाकी असलेली सुमारे ३००० रुपये वर्गणी वसूल करणें आणि नियमीत वर्गणी देणारे नवे व

कायम वर्गणीदार मिळविणें. तो करण्यासाठीं येत्या अंकापासून तीन महिनें 'हिंदू' बंद ठेवण्याचें आम्हीं योजिलें आहे. आम्हांस आशा आहे कीं, गोमंतकस्थ, परस्थ गोमंतकीय व महाराष्ट्रीय लोक 'हिंदू'च्या जीवितास शाश्वती आणण्यासाठीं शक्य तो स्वार्थत्याग करण्यास कमी करणार नाहींत. तरी ज्या कोणी 'हिंदू'ची वर्गणी बाकी आहे त्यांनी ती त्वरित पाठवून द्यावी आणि 'हिंदू'चे स्वतः वर्गणीदार राहून आणखी वर्गणीदार मिळवून द्यावे अशी विनंति आहे."

ही विनंति प्रसिद्ध करून त्याप्रमाणें चालकां-कडून प्रयत्नहि बराच झाला; पण त्याचा योग्य उपयोग न झाल्यानें हिंदूनें घेतलेली अल्प विश्रांतीच दुर्दैवानें पुढें खरी ठरली.

कार्यकारी संपादक या नात्यानें वै. दत्तात्रेय व्यंकटेश पै यांनीं संपादकीय क्षेत्रांत आणि पत्राच्या टापटिपींत तत्कालीन परिस्थितीच्या मानानें चांगली कुशलता दाखविली; तथापि तें दीर्घजीवि होण्याच्या बाबतींत त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं आणि अशा रीतीनें गोमंतक एका चांगल्या साप्ताहिकास कायमचा मुकला!

('हिंदू'चा अखेरचा अग्रलेख)

संघटना हाच तरणोपाय.

आपल्या ह्या गोमंतक प्रांतांत स्वातंत्र्याची किंवा स्वराज्याचीहि आकांक्षा पाहिजे तितकी सार्वत्रिक व व्हावी तितकी तीव्र झालेली नाहीं ही गोष्ट सिद्ध आहे. इतकेंच काय, पण रिपब्लिकच्या राज्यघटनेनें जे हक्क आम्हांस मिळाले होते ते तोडले जात असतां आणि राजधानींतील महालपालिकेसारखी संस्था अन्यायानें खालसा केली गेली असतां सामुदायिक रीत्या नुसता शाब्दिक प्रतिकार करण्याइतका मनुष्यपणाहि आमच्यामध्यें शिल्लक राहिलेला दिसत नाहीं!

सुप्रसिद्ध तत्वज्ञ ॲरिस्टॉटल यानें 'मनुष्य' शब्दाची व्याख्या 'राजकारणी जनावर' अशी केलेली आहे. ह्या व्याख्येचें विशदीकरण असें कीं, राजकारण करण्याची इच्छा व पात्रता हे दोन गुण जर वगळले तर मनुष्य आणि पशु ह्यांच्यांत अंतर असें शिल्लकच उरत नाहीं.

पण आमच्या गोव्यांत पहावें तर 'मला तुमचें तें राजकारण नको'. असें म्हणण्यांत शिक्षित समजले जाणारेहि कांहीं लोक भूषण मानीत असलेले आढळतात! ॲरिस्टॉटल जिवंत असते व त्यांची व्याख्या त्यांना कबूल राहती तर या लोकांना त्यांनी 'पशु' म्हणून संबोधलें असतें हें उघड आहे!

गोमंतकास अशी स्थिति प्राप्त होण्याचें कारण म्हणून पोर्तुगीज राज्यकारभाराच्या चांगुलपणाचा जो मुद्दा पुढें केला जातो तो कसा अर्थशून्य आहे हें आम्हीं अनेक वेळां दाखविलें असून त्याची संक्षिप्त उजळणी गतांकींहि केली आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानावर परकी अंमल स्थापन झाल्यास दोनशें वर्षेंहि पुरीं झालीं नाहींत व गोमंतकाच्या पायांत दास्यशृंखला अडकल्यास चार शतकें लोटून गेलीं. त्यामुळें तेथील स्वातंत्र्याकांक्षा जिवंत राहिली व आमची मरून गेली असेंहि कित्येक समजतात. पण यांतही तितकेंसें तथ्य दिसत नाहीं. कारण, एक तर गोमंतकाचे सारेच भाग पारतंत्र्यांत पडल्यास चारशें वर्षें होऊन गेलीं आहेत असें नव्हे; नव्या काबिजादी पोर्तुगीज सत्तेखालीं गेल्याला अद्याप दोन शतकेंहि पुरीं झालीं नाहींत. पण तेथें तरी काय स्थिति आहे? शिवाय, गोमंतकाच्या स्वातंत्र्य नाशाला हीं जीं चारशें वर्षें झालीं तीं कांहीं एकाएकीं झालेलीं नाहींत. आधीं शंभर, मग दीडशें, नंतर दोनशें याच क्रमानें हा चार शतकांचा कालावधि भरलेला आहे. मग ज्यावेळीं स्वातंत्र्यनाशाला दोनच शतकें झालीं होतीं त्यावेळींहि आम्हीं कांहींच हालचाल जी केली नाहीं त्याचें कारण काय? तात्पर्य हेंच कीं, हा दीर्घकालीन पारतंत्र्याचा मुद्दाहि आमच्या लांछनीय स्थितीचें कारण म्हणून पुढें करतां येत नाहीं. पण पुढें आलेलीं कारणें खोटीं आहेत, एवढेंच सिद्ध करून भागत नाहीं. तर खरीं कारणें कोणतीं तें सांगणें क्रमप्राप्त ठरतें.

आमच्या मतें, गोमंतकाच्या स्वातंत्र्याकांक्षा शून्यतेचें मुख्य व व्यापक कारण म्हणजे पोर्तुगिजांची संगति हेंच होय. स्वतः पोर्तुगाल राष्ट्र हें आळशी व हलगर्जी असल्यानें त्यांच्या अधिसत्तेतील देशांतहि तेच दुर्गुण शिरले असल्यास नवल नाहीं. इंग्रजी राष्ट्रास अन्य कोणतेहि दुर्गुण असतील; पण तें हुशारी, समयशीलता, दूरदर्शित्व, शिस्त इ. गुणसंपन्न आहे आणि त्या गुणांचा ठसा त्यांनी हिंदुस्थानावर उठवला आहे हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इंग्रज लोक स्वभावतःच जीवंत असून पोर्तुगीज लोक ऐदी आहेत. आणि ब्रिटिश हिंदुस्थानांत जीवंतपणा व गोव्यांत मुमूर्षु स्थिति दिसून येण्याचें मुख्य कारण हेंच होय.

पोर्तुगिजांच्या संगतीप्रमाणें त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीच्या माथींहि गोमंतकाच्या आजच्या पशुवत् जीवनाचा दोष येतो. त्यांच्या वृत्ति आत्मसात् करण्याच्या पद्धतीनें गोमंतकीय लोक स्वत्वभ्रष्ट झाले आणि त्याचें पर्यवसान स्वाभिमानशून्यतेंत होणें हें स्वाभाविक होय. ज्या लोकांना त्यांनीं खिस्ती धर्माची दीक्षा दिली त्यांच्या स्वत्वनाशाची गोष्ट तर पुसूंच नये. त्यांचा धर्मच केवळ तुटला असता तर तितकेंसें बिघडलें नसतें. पण धर्माबरोबरच भाषा, रीति, राष्ट्र, परंपरा सर्वच कांहीं तुटून त्यांची स्थिति त्रिशंकूसारखी झाली. आणि सर्वांत दुःखद गोष्ट म्हणजे हिंदु व खिश्चन या समाजांचीं तोंडें परस्पर भिन्न दिशांकडे होऊन बसलीं. त्यामुळें एक दुसऱ्याविषयीं अज्ञान, साशंक, किंबहुना विरोधीहि बनला. राष्ट्रस्वातंत्र्यासारखीं महत्कार्यें जीं देशांतील बहुसंख्य वर्गाचें मतैक्य व सहकार्य झालें असतांच पार पडणें शक्य, तीं हातांत घेण्यासहि कोणी धजेनासा झाला!

खिश्चन समाजाचा हा जो मतिभ्रंश झाला त्यानें अनेक खोट्या कोटिक्रमांस जन्म दिला आणि खिश्चन समाजाच्या वैभवानें दिपून किंवा भुलून जाणाऱ्या हिंदु लोकांतहि त्यांतील कांहीं शिरले. हे कोटीक्रम परकी राज्यकर्त्यांच्या तोंडांत एक वेळ साजतील; पण त्यांनीं बसवलेला त्यांचा पगडा आमच्या मनावर इतका उमटला कीं, तो आजतागायतहि निघून गेलेला नाहीं. उदाहरणार्थ हिंदी लोकांच्या हातांत त्यांच्या देशाचा राज्यकारभार आला तर ते आपसांत भांडून देश पुन: बुडवतील असें परकी राज्यकर्ते म्हणूं लागले व आम्हींहि त्यांचीच री ओढूं लागलों.

राज्यकारभार हातीं आला असतां हिंदी लोक आपापसांत भांडतील ही गोष्ट घटकाभर खरी मानली तरी तिच्यावरून त्यांचें राज्य परक्यांनी हातांत घेऊन लुटावें असा सिद्धांत कसा निघतो ? हा सिद्धांत जर खरा मानावयाचा तर दोघे भाऊ एकमेकांत कलह करूं लागले असतां व त्यामुळें त्यांच्या मालमत्तेची नुकसानी होऊं लागली असतां ती तिसऱ्यानें गिळंकृत करावी हा न्यायहि योग्य कां मानूं नये ? पण कोणत्या न्यायालयानें व कोणत्या सरकारनें असला न्याय वा कायदा अंमलांत आणलेला आहे ? मग घरगुती किंवा वैयक्तिक बाबतींत जी गोष्ट आपण अन्यायाची व जुलमाची मानतों तीच राष्ट्राच्या बाबतींत न्यायाची मानतों हें आश्चर्य नव्हे काय ? राष्ट्रहित हें व्यक्तिहितापेक्षांहि गौण मानण्याची जी वृत्ति आमच्यांत खिळवली गेली तिचेंच हें द्योतक नव्हे काय ?..................

आमचा नेभळटपणा घालवून देऊन गेलेली माणुसकी कमवावी अशा इच्छेचे कित्येक लोक गोमंतकांत आढळून येतात ही आशेची गोष्ट होय. पण त्यांकडून प्रयत्न एकाकी होत असल्यानें ते निष्फळ ठरतात............ तेव्हां जर एखादी संघटित राजकीय संस्था निर्माण करण्यांत आली तर तिचा फार उपयोग होण्यासारखा आहे.

या संघटनेंत हिंदु, खिस्ती, मुसलमान असा धर्मभेद; ब्राह्मण, मराठा, क्षूद्र असा जातिभेद किंवा अन्य पक्षभेद पुढें येऊं नये. आपण आधीं गोमंतकीय किंबहुना हिंदी आहों आणि गेलेलें कमावणें व योग्य तें नवें संपादन करणें आपलें कर्तव्य आहे अशा बुद्धीच्याच लोकांचा समावेश या संघटनेंत झाला पाहिजे. ध्येयसिद्धीच्या मार्गाचें सर्वसामान्य धोरण याच्या बाबतींत मतभेद होणार नाहींत. आणि तुरळक स्वरूपाचा तो झाला तरी संघटनेंतून फुटून जाणार नाहींत अशाच लोकांत ही संघटना प्रथम घडवून आणली पाहिजे. तिचें सूत्रचालक मंडळ सुटसुटीत, विनयसंपन्न, कार्यदक्ष असें असलें पाहिजे. अशी संघटना जर अमलांत आणली गेली तर आमची असहाय्य स्थिति सुधारून 'मनुष्य' या संज्ञेस पात्र ठरण्याचे प्रयत्न यशस्वीपणें करतां येतील असा आम्हांला विश्वास वाटूं लागला आहे. ईश्वर करो आणि तो खरा ठरो !

★ ★ ★

- १५ -

आर्यविज्ञान

सांगें येथें सन १९२६ सालीं ज्योतिषी नारायण अनंत नाईक पाटणकर यांनीं 'आर्यविज्ञान' मासिक सुरू केलें. हे मोठे प्रयत्नवादी मनुष्य होते. शिकस्तीच्या प्रयत्नानें यांनीं सामायिक भांडवलावर एक लहानसा छापखाना सांगें येथें सुरू केला आणि त्याला 'संगमोदय छापखाना' असें नांव दिलें. याच छापखान्यांतून 'आर्यविज्ञान' मासिक छापून निघे. अतएव या मासिकासाठींच हा छापखाना उभारण्यांत आला होता.

'आर्यविज्ञाना'चा आकार डेमी अष्टपेजी असून मजकुराचीं पृष्ठें १६ असत. या मासिकाचें ध्येय भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्यदर्शन हें होतें. त्या दृष्टीनें यांत शास्त्रीय व तात्त्विक विषयांवरील निरनिराळे लहान लहान लेख येत असत.

प्रथमांकांतील आपल्या निवेदनांत संपादक पाटणकर लिहितात कीं —

"भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य" दाखविणें हेंच 'आर्यविज्ञाना'चें जन्मकार्य आहे. हा देश एका काळीं अत्युच्च स्थितींत होता व अखिल जगास या भरतखंडांतूनच सर्व प्रकारचें ज्ञान मिळत असे, हें पाश्चात्यांनींच कबूल केलें आहे. प्राचीन अर्वाचीन भारतीय व पाश्चिमात्यांच्या अतुल ज्ञानव्यवसायपरिश्रमानें भारतीय संस्कृतीचें यथार्थ श्रेष्ठत्व सर्वत्र प्रसृत झालें असलें तरी उभय देशांत असाहि एक वर्ग आहे कीं, तो भारतीय संस्कृतीसंबंधीं उदासीनच आहे. याच्या उलट आधुनिक सुशिक्षितांत व प्राचीनाभिमान्यांत पहावें तों 'सर्वच कांहीं आमच्यांत आहे. दुसऱ्याचें आम्हांला कशाला पाहिजे ?' असें म्हणणारा एक वर्ग आहे. तर दुसरा एक 'न वदेद्यावनी भाषाम्' म्हणून स्वमताव्यतिरिक्त दुसऱ्याच्या मतास तिरस्करणीय मानितो. ही स्थिति शोचनीय आहे. या उभयतांच्या तुलनात्मक मिश्रणानें दोषत्याग करणें व गुणग्रहण करणें हें आमचें वरील प्रमाणेंच एक कर्तव्य आहे.

'पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवंद्यम्' जुनें तेंच सोनें किंवा नवें तेंच हवें न म्हणतां 'ज्ञानोच्छिष्टं जगत्सर्वं' म्हणून उभय तत्त्वांचें सार घेणेंच योग्य आहे. या पद्धतीनुसार दुरभिमान किंवा फाजील चिकित्सा न करतां आर्यविज्ञान हें आमच्या जगद्वंद्य, प्रतिभावान् व ज्ञानसंपन्न अशा आर्य पूर्वजांचें ज्ञान त्यांच्या थोर कृतीसंबंधीं सप्रमाण व सोपपत्तिक असें विज्ञान इ. त्याच्या नांवाप्रमाणें सर्वांपुढें ठेवणें आणि स्वत्वाची ओळख करून देणें हेंहि आर्यविज्ञानाचें एक ध्येय आहे.

एक काल असा होता कीं, आमच्या संस्कृतीची आठवण आम्हांलाच नव्हती. अशा कालीं कै. विष्णुशास्त्री चिपळुणकरांसारखे बाणेदार व ओजस्वी पुरुष निपजून त्यांनी आपल्या तडफदार लेखणीनें राष्ट्र व संस्कृति यांची ओळख पटवून दिली. लो. टिळक हे जसे राष्ट्राचे नेते झाले तसेच भारतीय संस्कृतीवर आपल्या विद्वत्तेनें प्रकाश पाडणारे ते एक तेजस्वी सूर्यच होते.

विद्वद्वर्य डॉ. भांडारकर प्रभृति भारतीय पंडितांनी आर्यसंस्कृतीचें महत्व व श्रेष्ठत्व अनेक प्रकारें विशद् करून दाखविलें आहे. सध्याहि अनेक विद्वान् हें कार्य करीत आहेत. असें असतां पाश्चात्यांच्या वरपांगी देखाव्यास भुलून आमच्यांतील कांहीं महाभाग स्वतःची व समाजसंस्थेची अधःपतनावस्था करीत आहेत. कालिदासाचें शाकुंतल कितीहि श्रेष्ठ ठरलें तरी अशा परप्रत्ययनेय झालेल्यास त्याची महती गटे यांच्या शब्दांत सांगावी लागते तेव्हां कोठें त्याचे डोळे उघडतात !

' नही कस्तूरिकामोदः शपथेन प्रवर्तते ' हें खरें असलें तरी वास येत असतां त्याला घाण म्हणणाराला ' रिझावूं शकेना विधाता तयाला ' ही भर्तृहरीची उक्ति यथार्थ लागू होते. म्हणून आज आमच्या संस्कृतीची कितीहि थोरवी असली तरी ती युरोपियनांच्या वेदवाक्यांनी सिद्ध करून दाखवावी लागते ! व हें प्राप्त कार्य म्हणून उभय विद्याविशारदांच्या ओजस्वी वाङ्मय प्रकाशनानें आर्यविज्ञान हळुहळू सप्रमाण दाखवून देणार आहे. " इ.

प्रथमांकांत ' मीमांसा शास्त्रम् ', आर्य-संस्कृति, भारतीय आर्य विज्ञान, संस्कृत साहित्याचें महत्व इ. विषयांवरील लेख आले होते.

या मासिकाची वार्षिक वर्गणी २ रु. होती. पहिला अंक १९२६ सालीं फाल्गुन (मार्च) महिन्यांत प्रसिद्ध झाला. २ रा एप्रिलांत, ३ रा मे, चौथा जून, ५वा ऑगस्ट, ६वा ऑक्टोबर, ७–८ वा फेब्रुवारी १९२७, ९-१०-११ मे आणि १२ वा अंक जुलै महिन्यांत प्रसिद्ध होऊन मासिकाचें प्रथम वर्ष पूर्ण झालें. २ ऱ्या सालचा प्रथमांक ऑक्टोबरांत, २ रा अंक १९२८ च्या जूनमध्यें, ३ रा नोव्हेंबरांत, ४ था १९२९च्या मे महिन्यांत, ५ वा ऑगस्टांत, ६–७ वा ऑक्टोबर महिन्यांत, ८–९ वा जानेवारी १९३० आणि १०-११-१२ वा जोड अंक १९३१ सालच्या सप्टेंबरांत प्रकाशनांत आला. हाच या मासिकाचा अखेरचा अंक होय. पहिल्यापासून शेवटच्या अंकापर्यंत प्रति फक्त ५०० निघत असत.

या अंकांत संपादकांनी ' पुनश्च हरिॐ !' या मथळ्याखालीं लिहिलें आहे कीं —
" आर्यविज्ञानाचा पौष्य शके १८५१चा अंक निघाल्यानंतर पुढील अंक वेळेवर देण्याचें वाचकांना आश्वासन दिलें होतें. पण या आश्वासनाला भवितव्यता प्रतिकूल दृष्टीनें पहात होती म्हणून अथवा यदृच्छाच तशी होती म्हणून, एकाएकीं परिस्थितीच अशी उद्भवली कीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली असतांना सुद्धां आजपर्यंतच्या अवधींत नवीन अंकास जन्म देणें अशक्यप्राय होऊन बसलें ! तथापि, परमेश्वरावर भरंवसा टाकून आमचा असा विश्वास होता कीं, उच्च ध्येयानें प्रेरित होऊन व आर्यसंस्कृतीच्या प्रेमाल्हादानें उभारलेलें कार्य होतां होई तों बंद करावयाचें नाहीं आणि या दरम्यानच्या काळांत मासिकाच्या पुनश्च उदयाचे शक्य ते यत्न झाले, इष्टमित्र, चाहते व हितैषी यांच्या सहानुभूतीचाहि उपयोग झाला व मनाच्या उल्हासाप्रमाणें सर्वत्र दृष्टींनी नाहीं

तरी शक्य त्या दृष्टींनी आजचा हा अंक वाचकांच्या सेवेस सादर करण्याचा सुयोग आला. याबद्दल आमच्या प्रमाणेंच आम या प्रेमळ आश्रयदात्यांस समाधान वाटेल यांत शंका नाहीं. " इ.

तिसऱ्या वर्षाच्या सुरवातीपासून अंक नियमीत काढण्याचा संपादकांनी संकल्प केला; पण परिस्थितीच अशी प्रतिकूल उद्‌भवली कीं, कोणत्याहि स्वरूपांत आणखी अंकच निघूं शकला नाहीं आणि अशा रीतीनें या मासिकाची इतिश्री झाली.

'संगमोदय' छापखाना आणि 'आर्यविज्ञान' मासिक यांच्यापायीं झालेल्या कर्जामुळें छापखाना विकूनहि पाटणकर यांच्या खासगी शेतावर त्याचा बोजा राहिला आणि पुढें त्यांच्या ज्योतिषी व्यवसायानें त्यांना हात दिल्यानें बऱ्याच कालानें आयुष्याच्या अखेरीस ते कर्जातून कसेबसे मुक्त झाले.

सुबोध

श्री. सां. घ. कंटक यांनी सन १९२८ सालीं कुडचडें येथें 'सुबोध वाङ्मय प्रसारक माला' या नांवाच्या एका पुस्तकमालेस जन्म दिला आणि त्या मालेंतून 'आर्य स्त्री' ही छोटी कादंबरी, एक कथा संग्रह आणि इतर दोन पुस्तकें १९३० पर्यंत प्रकाशीत केलीं. अशा रीतीनें प्रथम वर्ष पूर्ण झाल्यावर सन १९३१ च्या नोव्हेंबरांत मालेचें मासिकांत रूपांतर करून द्वितीय वर्षाचा प्रथमांक मुर्गांव येथें त्यांनी प्रसिद्ध केला. या अंकाचा आकार डेमी अष्टपत्री व पृ. ४८ होती. मासिकाची वा. वर्गणी ३ रु. असे. प्रथमच्या चार अंकांनंतर दोन जोड अंक निघून ऑक्टोबरांत सुबोधचें दुसरें वर्ष पूर्ण झालें.

लेख, गोष्टी, कविता इ. रीतीनें संपादकांनीं साहित्याची सजावट यथाशक्ति ठीक केली; पण मासिकाची वर्गणीच वेळेवर न आल्यानें त्यांना आर्थिक बाबतींत बरेच त्रास सहन करावे लागले. त्याबद्दल त्यांनी दुसऱ्या वर्षाच्या १२व्या अंकांत पुढील मजकूर प्रसिद्ध केला—

" गोव्यांतील वर्गणीदारांनी अद्याप आपली वर्गणी दिली नाहीं, त्यामुळें आमची स्थिति अत्यंत बिकट होत चालली आहे. गोव्यांतील ४२५ वर्गणीदारांपकीं हा वेळपर्यंत ३३ वर्गणीदारांनी काय तें आपलें कर्तव्य बजावलें आहे व बाकीचे 'आज उद्यां' चे धडे आम्हांस शिकवींत आहेत. 'सुबोध' ची सेवा लक्षांत घेऊन त्यांनी कृपा करून आपली वर्गणी पाठवावी अशी मी त्यांजजवळ ही शेवटची विनंति करी आहें. "

तथापि या विनंतीचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. नोव्हेंबर व डिसेंबर असे १९३२ मधील दोन महिने गेल्यावर जानेवारी १९३३ पासून 'सुबोध' च्या ३ ऱ्या वर्षास सुरवात झाली. पण त्याचे पुढील अंकहि नियमीत निघूं शकले नाहींत. २ रा अंक एप्रिलमध्यें, ३ रा मे, ४ था जून, ५-६ वा ऑगस्ट, ७ वा सप्टेंबर, ८ वा ऑक्टोबर, ९ वा नोव्हेंबर, १० वा डिसेंबर, ११ वा १९३४ च्या मार्च मध्यें आणि १२ वा अंक जून माहेच्या ता. १८ रोजीं प्रसिद्ध होऊन तिसऱ्या सालची समाप्ति झाली.

'सुबोध'च्या प्रथमांकांत श्री. शं. वा. किर्लोस्कर, वि. कृ. नेरूरकर, ताम्हनकर, शिखरे, तिवारी इ. नामवंत साहित्यिकांचे लेख आले होते. २ ऱ्या पासून पुढील अंकाचाहि लेखकवर्ग ठीक होता. अंकाचें मुद्रण बेळगांवच्या 'तरुण भारत' छापखान्यांत व्यवस्थित होई. तथापि 'सुबोध'ला आरंभापासून अखेरपर्यंत आर्थिक स्थैर्य लाभलेंच नाहीं आणि नुकसान बेसुमार झाल्यानें श्री. कंटक यांना मासिक बंद करावें लागलें.

तृतीय वर्षाचा सुबोधचा अखेरचा अंक निघाला त्यावेळीं तो शेवटचा ठरेल असें संपादकांना मुळींच वाटलें नव्हतें. तर त्याच अंकांत त्यांनी मासिकाचा आकार वाढवून सुधारणा करण्याचाहि आपला मनोदय प्रगट केला होता.

त्या अंकांत 'सुबोध'साठीं त्यांनीं वाचकांना अशी विनंति केली होती:—

'सुबोध'ला साह्य करा

"येत्या अंकापासून 'सुबोध' चवथ्या वर्षांत पदार्पण करीत असून त्याचा आकार मनोरंजन मासिका एवढा करण्यांत येणार आहे. शिवाय बाह्यांगांत चित्ताकर्षकता आणण्यांत येणार व अंतरंगाचें महत्व त्याहिपेक्षां सरस होणार. यासोबत वर्गणीदारांनी भरून पाठविण्याचा तक्ता आहे. तरी ज्यांना वर्गणीदार व्हावयाचें असेल त्यांनी तो उपयोगांत आणावा. 'सुबोध'च्या हितचिंतकांनी वर्गणीदार वांढविण्याची मदत करावी अशी विनंति आहे. जे कोण पांच वर्गणीदारांचे रु. १५ वर्गणी आगाऊ पाठवतील त्यांना 'सुबोध' वर्षभर भेट देईल. — चालक सुबोध"

तथापि सदर विनंतीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. सुधारणा तर राहिलीच; पण आहे त्याच स्थितींत नियमित वा अनियमित अंक प्रसिद्ध करणेंहि जेव्हां कठिण होऊं लागलें त्यावेळीं सुबोधकारांनी निरुपाय होऊन सुबोध बंद केला.

'सुबोध'मध्यें जुलै १९३२च्या अंकापासून 'गोमंतकांत मराठी नियतकालिकें अल्पजीवि कां?' या विषयावर संपादकांनी एक लेखमाला देण्यास सुरवात केली होती आणि त्या लेखमालेंत पहिला लेख वृत्तपत्रकार भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग वैद्य तथा दादा वैद्य यांचा आला होता. त्या लेखाच्या शेवटीं त्यांनी लिहिलें होतें कीं —

"सारांश गोमांतकाचा प्रदेश फार लहान. येथील हिंदु वाचकांची संख्याहि फार अल्प. त्यांतहि मराठी वाङ्मयाचे व्यसनी असलेले बाहेरील वाङ्मयानें तृप्ति करून घेतात. शेजारची मुलगी शेंबडी असेंहि कांहीं जणांना वाटतें. नियतकालिकें नेट धरून त्यांजवरील आपत्ति टाळून तीं जगविण्याइतकें द्रव्यबळ, चिकाटी आणि परिश्रम (प्रयत्न) हीं संपादकांकडे नसतात, म्हणजे असलेलीं कमी पडतात, यामुळें त्यांचें जीवित अल्प होत आहे. असें जरी असलें तरी निराश होणें योग्य नाहीं. उद्योग्यांनी विचारपूर्वक उद्योग नेटानें चालविला पाहिजे. उत्तरोत्तर यश मिळत जाणार. अजून बराच उशीर लागला तरी पुढें साफल्य मिळणारच."

भि. दादा वैद्य हे प्राचीप्रभा, हळदकुंकू, पथ्यबोध, विद्याप्रसार या नियतकालिकांचे संचालक होते आणि त्या व्यवसायांत त्यांनी बराच पैसा खर्च केला होता.

★ ★ ★

सुबोध २

‘गोमंतकांत मराठी नियतकालिकें अल्पजीवि कां ?’ या लेखमालेंत दुसरा लेख ‘भारत’कार डॉ. गोविंद पुंडलिक हेगडे देसाई यांचा आला होता. तो असा —

“आमच्या गोमांतकांत अनेक नियतकालिकें जन्मलीं व तीं अल्पावधींतच विराम पावलीं. अस्तंगत झालेल्या नियतकालिकांत सगळींच कांहीं टाकाऊ नव्हतीं. सत्संग, स्वयंसेवक, हिंदु हीं तर साहित्यदृष्ट्या बऱ्याच योग्यतेचीं होतीं. पण त्यांनाहि कोणत्या ना कोणत्या कारणानें आपला साहित्य व देशसेवेचा पसारा रेंगाळत रेंगाळत आटोपून घ्यावा लागला.

अशा स्थितींत ‘गोमंतकांत नियतकालिकें अल्पजीवि कां होतात ?’ या प्रश्नाची पायाशुद्ध छाननी व्हावी, अशी स्वाभाविक जिज्ञासा सुबोधकारासारख्या एकाद्या होतकरू तरुणाच्या अंत:करणांत जागृत झाली असल्यास आश्चर्य नाहीं.

गोमांतकांत नियतकालिकें अल्पजीवि होण्याचें प्रमुख कारण म्हणजे पात्र संपादकांचा अभाव हें होय. कित्येकांस हें माझें विधान धार्ष्ट्याचें वाटण्याचा संभव आहे. पण पात्र या विशेषणाचें अर्थीकरण होतांच त्यांचा तो गैरसमज सहजच नष्ट होईल अशी माझी बालंबाल निश्चिति आहे.

पात्र या विशेषणाची अर्थमर्यादा ‘उत्कृष्ट’ येथेंच थांबली असती, तर ‘सत्संग’, ‘स्वयंसेवक’, ‘हिंदु’ यांचे संपादक उत्कृष्ट लेखक नव्हत काय, असा प्रश्न उपस्थित झाला असता. पण पात्र शब्दाचा अर्थ उत्कृष्टता पार ओलांडून बराच दूरचा पल्ला गांठीत असल्यानें त्या प्रश्नाचें महत्व आपोआपच लय पावतें.

पात्र या विशेषणांत लेखनपटुत्व तर संभवतेंच पण त्याशिवाय पात्र संपादकाचे अंगांत पुढील गुण असावे लागतात :— स्वार्थत्याग, चिकाटी आणि धनोत्पादक जोड धंदा. स्वत:च्या व स्वकीयांच्या भविष्यकाळासंबंधीं पूर्ण बेफिकीर वृत्ति म्हणजे स्वार्थत्याग; कितीहि कठीण संकटांशीं झगडावें लागलें तरी हरकत नाहीं, पण वृत्तपत्र किंवा मासिक बंद ठेवायचें नाहीं म्हणजे चिकाटी आणि आश्रयदात्यांच्या अनास्थेमुळें प्रकाशनाच्या बाबतींत पडत असलेली द्राव्यिक तूट भरून काढण्यासाठीं करावी लागणारी खटपट म्हणजेच धनोत्पादक जोड धंदा.

पात्र संपादकाच्या अंगांत इतके हे गुण असावे लागतात. स्वत: व स्वकीयांपेक्षांहि स्वदेशावर विशेष प्रेम असल्याविना मी वर्णन केलेली संपादकीय पात्रता प्राप्त होणें कदापिहि शक्य नाहीं हें अर्थात् उघड होय.

गोमांतकाचें क्षेत्र आकुंचित असल्यानें येथील नियतकालिकांची संपादकीय पात्राता विस्तृत होत असते तर नकळे ! पण बहुजन समाजांत खऱ्या शिक्षणाची व स्वदेशप्रेमाची वृद्धि होतांच, नियतकालिकांचें अस्थित्व यापुढें तितकेंसें अस्थिर होणार नाहीं, असा माझा होरा वाहतो.

पण, हो ! संपादकीय पात्रतेचा आणखी एका गोष्टीशीं ओझरता का असेना, संबंध येतो. त्याचा उल्लेख करून प्रस्तुत लिखाण पुरें करतों. स्तुतीनें हुरळणें किंवा निंदेनें विगतधैर्य होणें संपादकाला बिलकूल कामाचें नाहीं. परमेश्वराला स्मरून अंत:करणाच्या सद्भावनेनें त्यानें आपलें प्रकाशनकार्य करीतच राहिलें पाहिजे. मग कोणी वंदो किंवा निंदो."

या विषयावर एकूण अकरा लेख आले आणि संपादकांचा समारोप प्रसिद्ध होण्यापूर्वींच मासिकाचें प्रकाशन बंद झालें.

★ ★ ★

गोमंतक

डिचोली येथील एक मराठी साहित्यसेवक आणि समाजकार्यकर्ते स्व. वामन नारायण पालेकर यांच्या मनांत फार दिवसांपासून गोव्यांत वृत्तपत्र सुरू करण्याची उत्कट इच्छा होती; तथापि त्यांची ती इच्छा बराच काल पर्यंत मूर्तस्वरूपांत येऊं शकली नव्हती. गोमंतकाचा भूगोल, इतिहास, पाद्रींचें बंडे अशीं त्यांनीं कांहीं पुस्तकें लिहिलीं आणि तीं खानापूर येथें वै. द. गो. सडेकर यांच्या धनंजय छापखान्यांत छापलीं. त्या पुस्तकांच्या मुद्रणाच्या वेळीं सडेकर यांच्याकडे साप्ताहिकाच्या मुद्रणाबद्दलहि त्यांचीं बोलणीं होत; पण त्यांच्याकडून पालेकरांना अनुकूल जबाबच न मिळाल्यानें साप्ताहिकाची त्यांची योजना पुढं पुढें जात होती.

कांहीं कालानंतर अन्य ठिकाणीं मुद्रणसोय बघून डिचोली येथें त्यांनी 'गोमंतक' साप्ताहिकास जन्म दिला. सन १९२८ च्या सुमारास हें साप्ताहिक पत्र सुरू झालें. याचा आकार भारत पत्राएवढा असून पृ. ४ व कागद सफेत गुळगुळीत असे. पोर्तुगीज व मराठी अशा दोन भाषांत यांत मजकूर प्रसिद्ध होई. मराठी बाजू ठीक होती, पण पोर्तुगीज साधारणच होती. या साप्ताहिक पत्राचे संचालक स्व. वामन नारायण पालेकर हे असून संपादक श्री. महाबळेश्वर रुद्राजी प्रतापराव सरदेसाई हे होते.

गोमंतकांत प्रसिद्ध होणारा मजकूर विशेषत: सामाजिक व साधारणसा राष्ट्रीय अशा स्वरूपाचा असे.

दोन तीन अंकानंतर दुर्दैवानें हें साप्ताहिक पत्र बंद पडलें.

★ ★ ★

मनमोहन

डेमी अष्टपत्री आकाराचें हें 'मनमोहन' मासिक खानापूर येथें धनंजय छापखान्यांत छापून तेथेंच प्रसिद्ध होई. या मासिक पुस्तकाचा पहिला अंक दि. २१ जून १९२९ रोजीं प्रकाशनांत आला. दुसरा जुलैचा अंक दि. ६ ऑगस्ट रोजीं, ७ सप्टेंबरला ऑगस्टचा तिसरा अंक, १५ ऑक्टोबरला सप्टेंबरचा चौथा अंक आणि ता. ३१ ऑक्टोबर रोजीं ऑक्टोबरचा पांचवा अंक प्रसिद्ध झाला.

आरंभीं याचे संपादक रा. महादेव कृष्णाजी अभिषेकी हे असून आत्माराम भि. अभिषेकी हे सहसंपादक होते. दुसऱ्या अंकाच्या वेळीं म. कृ. अभिषेकी, आ. भि. अभिषेकी व रा. गं. अभिषेकी हे चालक झाले. तिसऱ्या व चौथ्या

अंकाचे पहिले दोघेच चालक राहिले आणि सर्व व्यवस्था मे. एम्. के. अभिषेकी आणि कं. कडे आली. पुढें पांचव्या अंकाच्या वेळीं संपादक म. कृ. अभिषेकी व सहसंपादक आत्माराम भि. अभिषेकी हे होते.

मनमोहनचीं पृ. ३२ असून वार्षिक वर्गणी २ रु. होती.

प्रथमांकांत मासिकाच्या ध्येय धोरणाबद्दल स्वतंत्र असें लिहिलेलें कांहीं आढळत नाहीं. **'प्रथम–दर्शनीं'** या मथळ्याखालीं थोडा मजकूर असून त्यांत असें लिहिलेलें आहे :

"प्रथम दर्शनीं काय होत असतें, हें कादंबरी वाचकांना तरी सांगावयास नको. साधारण हाच नियम अत्यंत घाईघाईनें पहिला अंक प्रसिद्ध करणाऱ्या 'मनमोहन' मासिकासहि लागू होईल. प्रकाशनाच्या कार्यांत अत्यंत नवशिके असल्यामुळें आमच्याकडून प्रथमांकांत किती तरी चुका घडलेल्या असणारच. त्याबद्दल आम्हीं फार दिलगीर असूं. पुढील अंकांत त्या सुधारूंच व त्याशिवाय नवीन योजना अंमलांत आणून घडलेल्या चुकांची दामदुप्पटीनें भरपाई करूं......... "

"लेख, लघुकथा, चरित्रें व कविता यांच्या द्वारा समाजांत नवजीवन उत्पन्न करणारें महाराष्ट्राचें एकच मासिक" या प्रथम पृष्ठावर अग्रभागीं असलेल्या मजकुरानें मासिकाच्या ध्येयाची साधारण कल्पना येते.

मनमोहनच्या पांचव्या अंकांत पृ. १३३ वर "लवकरच मनमोहन दुप्पट आकारांत निघूं लागणार, तरी त्वरित वर्गणीदार व्हा" असा ठळक मजकूर दिसतो, त्यावरून मासिकांत सुधारणा करण्याची चालकांची इच्छा दिसून येते; पण दुर्दैव असें कीं, सुधारणेशिवाय चालू स्वरूपांतहि सहावा अंक निघूं शकला नाहीं आणि प्रकाशनांत आलेला पांचवा अंकच अखेरचा ठरला.

★ ★ ★

वैश्य

सन १९३१ सालीं जानेवारी महिन्यांत 'वैश्य' मासिकाचा प्रथमांक पणजी येथें प्रसिद्ध झाला. या मासिकाचे संपादक रा. शंभू अनंत शेट केसरकर हे असून पत्ता 'सं. वैश्य C/o सीताराम गणपति मणेरकर, पणजी' असा होता. कागद गुळगुळीत व मुद्रण सुंदर असून मासिकाची वार्षिक वर्गणी रु. १–१२–० असे.

'वैश्य' मासिकाचें कार्यक्षेत्र सकृत्दर्शनी वैश्य समाजापुरतें मर्यादित दिसलें तरी त्याची दृष्टि व्यापक, उदार व सहिष्णु होती. भाषा व विषयांची निवडहि ठीक होती. या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध होत असलेलें प्रवासवर्णन नमुनेदार व वेधक असें होतें. अशा वृत्तीचीं ज्ञातिविषयक नियतकालिकें देखील समाजांत चांगलें कार्य करूं शकतात. या दृष्टीनें 'वैश्य' चालू राहणें योग्य होतें; तथापि प्रतिकूल कालाच्या तडाक्यांत तेंहि दुसऱ्याच सालीं अंतर्धान पावलें.

★ ★ ★

पतितपावन

चिंबल येथील शुद्धि प्रकरणांत असामान्य श्रम घेतलेले आणि गोमंतकांतील शुद्धीच्या

इतिहासांत ठळकपणें झळकणारे वै. रामचंद्र नारायण लंवदे यांनी रायबंदर येथें 'पतित-पावन' मासिकास जन्म दिला. या मासिकाचा आकार क्राऊन सोळा पेजी असून पृ. २४ होतीं. विषय विशेषत: शुद्धि व नवहिंदु वर्गाची सुधारणा याबद्दलचे असत. या मासिकाबद्दलच्या विविध सुधारणा, स्वतंत्र छापखाना, नव-हिंदूंच्या जोड उद्योग धंद्याची योजना अशा विविध कल्पना लंवदे यांना प्रत्यक्षांत आणण्याची उत्कट इच्छा होती. तथापि त्या दृष्टीनें त्यांना ज्या आर्थिक सहाय्याची सक्रीय सहानुभूति हवी होती. ती लाभली नाहीं आणि सगळ्या कल्पना हवेंत विरून गेल्या.

वै. लंवदे हे प्रयत्नवादी मनुष्य. मासिकाच्या बाबतींतहि त्यांनी अनेक प्रयत्न केले; पण त्यांत त्यांना यश मिळालें नाहीं आणि अवघ्याच अंकांनंतर पतितपावन कालवश झालें.

★ ★ ★

युगांतर

फोंडें येथें सन १९३४ सालीं 'युगांतर' द्वैमासिकाचा जन्म झाला. कांहीं कालापूर्वी तेथें 'विद्यार्थी' नांवाचें एक हस्तलिखित नियतकालिक निघे. त्याच्या उत्साहि चालकांनींच युगांतरास जन्म दिला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

युगांतराचे मुख्य संपादक आजचे 'प्रदीप' पत्रकार श्री. जनार्दन जगन्नाथ प्रभु शिंकरे हे असून त्यांच्या सहकारी मंडळांत श्री. विष्णु प्र. शिंके, गोपाळ प्र. शिंके, नरसिंह शेणवीं सुखठणकर, बाळकृष्ण जोशी, रघुवीर धुमटकर, फोंडू केरकर, वसंत केरकर वगैरे कित्येक उत्साहि इसम होते.

युगांतराचा आकार क्राउन अष्टपेजी असून कागद सफेत व मुद्रण ठीक असे. मजकूर निवडक आणि ललित विषयाला प्राधान्य असे.

'युगांतर' फक्त एक वर्ष चाललें. या एका वर्षाच्या कालांत प्रकाशनांत आलेले सहाहि अंक उत्साही तरुणांना विशेष आवडले, कारण ते त्यांच्या दृष्टीनें एकापेक्षां एक तडफदार होते.

युगांतर केवळ साहित्यविषयक हौस म्हणून सुरु झाल्यानें ती ओसरूं लागल्यावर द्वैमासिकाबद्दलचें सहकारी लोकांचें अगत्यहि कमी होत चाललें. शिवाय गोमंतकांतील नियतकालिकांच्या राशीस असलेल्या प्रतिकूल कालाचीहि आंच बसूं लागल्यानें चालकांत पूर्वीचा नेट राहिला नाहीं; आणि अशा रीतीनें युगांतर द्वैमासिकहि एकाच वर्षानें कालाच्या उदरांत गडप झालें.

युगांतराचे संपादक श्री. शिंक्रे आपल्या निवेदनांत म्हणतात—"हौस ही कांहीं झालें तरी क्षणिक वा विशिष्ट मुदतीपुरती असते. ती सर्वकाल सोडाच पण दीर्घकालहि टिकत नाहीं. कोणतेंहि कार्य, त्याच्या मागें श्रद्धेचें अधिष्ठान नसलें, त्याच्या मागें पोटतिडिक नसली तर टिकाऊ ठरत नाहीं." (प्रदीप)

★ ★ ★

गोमंतक

गोमंतकांतील हिंदु विद्यार्थ्यांनीं मुंबई येथें स्थापन केलेल्या 'गोमंतक हिंदु विद्यार्थी मंडळ' या संस्थेचें मुखपत्र म्हणून 'गोमंतक' षण्मासिक मुंबई येथें सुरू झालें. याचा पूर्वांक सन १९३३ च्या ऑक्टोबरांत दिवाळीच्या सुमारास प्रसिद्ध झाला. संपादक मंडळांत पुढील नांवें होतीं:— कु. विजया तळावलीकर, श्री. स. पु. दणाईत, श्री. ग. शां. प्रियोळकर, श्री. जी. एन्. लवंदे, श्री. बा. द. सातोस्कर. आकार डेमी अष्टपत्री असून पृष्ठें पूर्वांकाचीं ५१ व उत्तरांकाचीं ४४ होतीं. उत्तरांक १९३४ च्या एप्रिल महिन्यांत वर्षप्रतिपदेदिवशीं प्रसिद्ध झाला.

'गोमंतक'चें जन्मवृत्त, उद्देश व धोरण यासंबंधीं पूर्वांकांत पुढील मजकूर होता:—

"मुंबईत राहणाऱ्या गोमंतकीय विद्यार्थ्यांची शिस्तवार संघटना करणें हें 'गोमंतक हिंदु विद्यार्थी मंडळा'चें ध्येय आहे. हें ध्येय साध्य करण्याकरतां, इतर कार्याप्रमाणें, 'गोमंतक विद्यार्थी' नावांचे एक हस्तलिखित द्वैमासिक पूर्वीं निघत असे. 'गोमंतक' हें त्याचेंच छापील स्वरूपांत निघणारें रूपांतर होय. मात्र 'गोमंत विद्यार्थी' विद्यार्थ्यांकरतांच होता, तर 'गोमंतक'चें क्षेत्र विस्तृत झालें आहे. 'गोमंतक' आबालवृद्धांस उपयुक्त होईल.

"गो. हिंदु विद्यार्थ्यांची संघटना करावी व या संघटनेच्या जोरावर कोणतीहि चळवळ यशस्वी करून दाखवितां यावी अशा दिशेनेंच मंडळ व गोमंतक प्रयत्न करील. गोमंतकाविषयीं गोमंतकीयेतरांत परंपरागत चालू असलेल्या कांहीं गैरसमजांस जोराचा धक्का देऊन त्यांचें निर्मूलन करावें आणि त्यांना व गोमंतकीयांनाहि गोमंतकाची खरी ओळख करून द्यावी हाहि 'गोमंतक'चा उद्देश आहे. गोवा हा हिंदुस्थानचाच अविभाज्य भाग असून तो संस्कृति, साक्षरता, कला, शास्त्र इ. बाबतींत इतरांच्या मागें नाहीं. इतिहासकालीं मोंगलांच्या सिंहासनावर मराठ्यांचा शिक्का मारण्याचे कामीं गोमंतकीयांनीं युद्धकलेंत प्रावीण्य दाखविलें आणि मोठाले ग्रंथ निर्माण करून गोमंतक विद्वत्तेचेंहि केंद्र होतें हें सिद्ध करून गोमंतकाचें नांव दिल्ली, आग्रा, काशीपर्यंत नेलें; तर वर्तमानकालीं चित्रकला, शिल्पकला, वगैरे कलांत हिंदुस्थानांत सिमल्यापर्यंत आणि परदेशीं लंडन, पॅरिस, रोमपर्यंत हिंदी कलेचा झेंडा फडकविण्यास पुष्कळ अंशीं गोमंतकीय कलावान् कारण झाले. हें आपलें उज्ज्वल स्वरूप गोमंतकीयांना स्पष्ट दिसावें व इतरांना दाखवावें म्हणून 'गोमंतक'चा जन्म आहे.

सध्या गोमंतकीय लेखकवर्गाकडे पाहिलें तर त्याचे पुढील तीन वर्ग स्पष्ट दिसतात, पहिला ज्यांनीं दोन तीन दशकांमागें वाङ्मयीन चळवळी केल्या, अशा प्रथितयश व सध्या वाङ्मयसंन्यास घेतलेल्या ज्ञानवृद्ध लेखकांचा; दुसरा महाराष्ट्रांत व गोमंतकांत थोडीबहुत प्रसिद्धी मिळालेल्या तरुण लेखकांचा; आणि तिसरा प्रतिभासाधन व लेखनकला संपादन करूं पाहणाऱ्या अप्रसिद्ध अशा नवोदित लेखकांचा. पहिल्यांचे वाङ्मयीन, व्यावहारिक व सामाजिक अनुभव, दुसऱ्यांच्या ललित

कलाकृति, व तिसऱ्यांचें आशादायक लिखाण यांचा त्रिवेणी संगम 'गोमंतक'च्या दर अंकांत होईल. गोमंतकीय लेखकांचे लेख महाराष्ट्रांतील निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रत्यहीं प्रसिद्ध होत आहेत. परंतु त्या सर्वांचें दर अंकांत संमेलन भरवून तें वाचकांस खुलें करावें व गोमंतकाची ही वाङ्मयतपश्चर्या किती तरी मोठी आहे हें मराठी जगाच्या निदर्शनास आणावें अशी 'गोमंतक'ची महत्वाकांक्षा आहे.

'गोमंतकां'त फक्त गोमंतकीयांचेच, क्वचित् गोव्याविषयीं आस्था वाटणाऱ्या गोमंतकी-येतरांचे गोव्याविषयीं लिहिलेले लेख प्रसिद्ध होतील. दर अंकांत जुन्या पिढींतील अधिकारी लेखकाचा एखादा लेख येईल. 'गोमंतकांत' या सदरांत महत्वाच्या घडामोडींवर टीकात्मक चर्चा प्रसिद्ध होइल. 'गोमंतकांतील आजकालचीं मराठी नियतकालिकें' या शीर्षकाखालीं गोव्यांतील जिवंत व मृत नियतकालिकांचा इतिहास व कामगिरी यांचा आढावा घेण्यांत येईल. 'गोमंतकचे सुपुत्र' हें सदर गोव्यांतील कर्तबगार व्यक्तींचा परिचय करून देईल. बालवाचकांसाठीं दोन पृष्ठें दिलीं जातील. एकंदरींत गोमंतकाचें अंतरंग व वैशिष्ट्य दाखविणाऱ्या लेखांस व ललितरम्य कलाकृतींस गोमंतक स्थान देईल.

'गोमंतक'चें वैशिष्ट्य दाखविणारीं व गोमंतकीय कलावंतांनीं चितारलेलीं चित्रें, शिल्पकारांच्या उत्कृष्ट कृतींचीं छायाचित्रं, वास्तुशास्त्राचे नमुने यांनीं प्रत्येक अंक सजणार आहे.

गोमंतकीय व गोमंतकीयेतर जनतेच्या सहानुभूतीनें 'गोमंतक' षण्मासिकाचें येत्या वर्षी त्रैमासिक झालेलें दिसेल अशी आम्हांस पूर्ण खात्री आहे......

'गोमंतक'चे प्रकाशक श्री. बा. द. सातोस्कर हे असून प्रकाशनस्थल त्रिभुवन रोड, मुंबई ४ हें होतें.

या नियतकालिकाच्या पूर्वांकांत गोमंतक, विजेची कोर, गोड स्मृति, संपादकीय, पतित, चुरगळलेलें फूल, कारागीर, शारदेच्या पायाशीं, सासूबाई, गोव्यांतील वाङ्मयविषयक उणीव, परिवर्तन, गोमंतकाचे सुपुत्र, मुकुंद, घाई, गोमंतकांत इ. विषय होते आणि उत्तरांकांत पतंगास, संपादकीय, गोमंतकाविषयीं मला काय वाटतें, दत्तक, गोमंतकांतील आजकालचीं मराठी नियतकालिकें, जनदृष्टि, जीवनविराम, शिल्पकार रा. पां. कामत, अप्रिय पण पथ्यकर हिऱ्याचीं कुडीं, अखेरची आस, बाललेखक व बालवाचकांसाठीं, गो. हिं. वि. मंडळाचा अहवाल, शारदेच्या पायांशीं वगैरे विषय आले होते.

उत्साही तरुणांनी मोठ्या उमेदीनें हें नियतकालीक सुरू केलें; पूर्वांक व उत्तरांक प्रसिद्ध करून प्रथम सालची कामगिरीहि व्यवस्थित नि यशस्वीपणें पार पाडली; पण त्याचें त्रैमासिकांत रूपांतर होण्याचें भाग्य मात्र कार्यकर्त्यांना लाभलें नाहीं आणि अशा रीतीनें हें षण्मासिक एकाच वर्षानें बंद झालें.

'गोमंतक'च्या उत्तरांकांत प्रसिद्ध झालेला

कै. यशवंत सूर्यराव सरदेसाई तथा भाई देसाई यांचा उपयुक्त लेख —

गोमंतकाचें वैशिष्ट्य

'गोमंतकाचें वैशिष्ट्य काय ?' असा कोणी प्रश्न केला तर त्याचें उत्तर चार शब्दांत देतां येईल. सत्य, सौजन्य, सौंदर्य व सेवा या चार शब्दांत गोमंतकाचें वैशिष्ट्य सांठलेलें आहे. या वैशिष्ट्याला धरून जें जें कार्य होतें त्याला गोमंतकांत यश व वृद्धि आहे. याला सोडून झालेली कोणतीहि चळवळ इकडे फलदायी होत नाहीं. हा अनुभव जुन्या काळापासून चालत आला असून हजारों उदाहरणांनी तो सिद्ध झालेला आहे. गोमंतकाच्या वृथाभिमानानें अगर आंधळ्या प्रेमानें मी हें सांगत नाहीं, तर डोळसपणा वापरून हें म्हणतों. जरा खोल विचार केला व डोळ्याचा डोळा उघडून गोमंतकाकडे पाहिलें म्हणजे या म्हणण्यांत अर्थ आहे असें प्रत्येकाच्या प्रत्ययास येईल.

जन्मभूमि किंबहुना आपला प्रांत प्रत्येकाला प्रिय व श्रेष्ठ वाटतो यांत नवल नाहीं. मग या सुंदर व नितांतरमणीय प्रांतांत जन्म घेण्याचें भाग्य ज्यांच्या वांट्यास आलें आहे, त्याला या भूमीचें मनोहारि स्वरून पाहून आनंद व अभिमान वाटणें साहजिक नाहीं काय ? पण हा विशिष्ट अभिमानापुरता मुद्दा नाहीं; तर इतर प्रांतांशीं तुलना करून आणि सत्याला सर्वस्वी धरून म्हणावयाचें झाल्यास गोमंतकाचें एकंदर स्वरूप वर सांगितलेल्या वैशिष्ट्याच्या चौकटींत बसतें. सत्याकरतांच येथील वारे ढळतात, सौजन्याकरतांच येथील पक्षी गातात, सौंदर्याकरतांच येथील पहाड पालवतात आणि सेवेकरतांच येथील नद्या वाहतात. निसर्गाची ही शिकवण मनन करण्यासारखी आहे. मुक्या प्राण्यांची ही हालचाल लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मानवी मनाला धडा देणाऱ्या गोष्टी पदोपदीं दिमत असतां त्या नाकारून कसें चालणार ?

गोमंतकाची भूमि महाराष्ट्रांतील स्वरूप-संपन्न अशा कोंकणपट्टींत हृदयाच्या ठिकाणीं आहे. कोंकणची भूमि बुद्धिमत्ता व कर्तबगारी या दोन्हीं दृष्टींनी महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. आपली लेखणी आणि तरवार या दोन्हीं नात्यांनी महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थानचा इतिहास बनविण्याचें कार्य या लोकांकडून झालें आहे. अशा या कोंकणच्या रेषेंत मध्यगत ठाणें दिलेल्या गोमंतकानें बुद्धी-बरोबर भावनेची जोपासना केलेली आहे. कारकुनी लेखणीसोबत मुत्सद्देगिरीची वाढ केलेली आहे. तरवारबहाद्दरीबरोबर निष्ठावंत गुणांची पराकाष्ठा आणि समरांगणावरील शत्रू नेस्तनाबूद करतांना मनोजयाच्या दृष्टीनेंहि प्रशंसनीय कामगिरी बजावलेली आहे. मराठी इतिहासाचें अवलोकन केलें तर त्यांत गोमंतकीय विभूतींनी आपल्या जन्मभूमीचें वैशिष्ट्य राखण्याच्या बाबतींत सदैव जागरूकता ठेवलेली दिसते. सत्याचा पक्ष धरण्यांत काय, किंवा सौजन्याची सीमा करण्यांत काय, सेवेची कमाल करण्यांत काय किंवा सौंदर्याची उपासना करण्यांत काय, गोमंतकीयांनी देहाची पर्वा धरलेली नाहीं, जित्राची कदर बाळगलेली नाहीं अगर सत्ताधारी व्यक्तीचा मुलाहिजा

राखलेला नाहीं. स्वतःचा बळी दिला, पण निष्ठावंत भाव मरूं दिला नाहीं. स्वाभिमानावर तिलांजली दिली पण राष्ट्राभिमान बुडूं दिला नाहीं. राज्य मिळवून दिलें पण राज्यलोभ धरला नाहीं. नव्या धन्याची सेवा केली पण जुन्या धन्याचा विसर पडूं दिला नाहीं. सबंध हिंदुस्थान ही आपली कर्मभूमि केली पण आपल्या जन्मभूमीचा अभिमान पुसूं दिला नाहीं. हा इतिहास केवळ कहाणी नव्हे, सत्यकथा आहे. शेंकडों वर्षें नव्हे तर हजारों वर्षांपासून तो हेंच बोलत आहे. मनापासून सांगत आहे अन् वैऱ्याच्या तोंडून देखील हीच कबुली देत आला आहे !

मागच्या काळाकडे पहा. त्यांत घडलेल्या बनावाचें स्वरूप न्याहाळा. त्यांतील अनेक व्यक्तींच्या हालचाली लक्षांत आणा आणि वरील विधान यथार्थ आहे कीं नाहीं याची प्रचीति घ्या. सत्यासाठीं गोमंतकीय आत्मघातकी ठरला असेल. सौंदर्याच्या लोभानें तो वेडावून गेला असेल. सौजन्यापायीं त्याची स्थिति हास्यास्पद झाली असेल. सेवाधर्म बजावण्याच्या भरांत तो स्वत्वहि विसरला असेल. तथापि मार्मिक परीक्षकाच्या कसोटीला, चिकित्सक इतिहासकाराच्या प्रशंसेला व सहृदय माणसाच्या मान्यतेला तो पात्र झाल्यावांचून राहिलेला नाहीं हें देखील तितकेंच खरें आहे.

गोमंतकीयांची ही वृत्ति महाराष्ट्रीय थोर पुरुषांनी वाखाणलेली आहे. महाराष्ट्रांतील राजकुलोत्पन्न थोर विभूतींनी या गुणांची चहा केली आहे आणि हिंदुस्थानच्या इतिहासांत या वृत्तीचें प्रतिबिंब सर्वत्र उमटलेलें आहे. कपट, द्रोह, उन्मत्तपणा, नाशकवृत्ति, अधर्म या दुर्गुणांचीं मुळें या भूमीवर पडलीं तरी वाढ घेत नाहींत. संसर्गानें कांहीं भेसळ झाली तरी ती टिकून राहात नाहीं. आणि टिकली तरी तिला मान्यता नाहीं. साधा सरळ व्यवहार, प्रामाणिक उन्नत विचार, काळजाच्या कप्प्यांतून उघडलेला जीवनाचा झरा आणि एकमेकांना सहाय्य करण्यांत आयुष्याचा झालेला वेंच हींच गोमंतकाच्या मनोरचनेला प्रियतर लक्षणें आहेत. या व्यतिरिक्त झालेला प्रकार तो आयुष्याचा तमाशा होय. त्याला यश नाहीं, स्थैर्य नाहीं, मान नाहीं आणि इतिहासांत थाराहि नाहीं.

गोमंतक शब्दब्रह्माच्या जाळ्यांत अडकून पडत नाहीं, तो कृतीवर भाळून जातो. त्याला पांडित्याचा सोस नाहीं, तो प्रेमाचा भुकेला आहे. त्याला शास्त्रालंकाराची मातबरी नाहीं, तो गुणांचा भोक्ता आहे. त्याला वकिलीचें तर्कट नको, सरळ न्यायाची अपेक्षा आहे. जाहिरातीचा हैदोस तो घालीत नाहीं, स्वतःच्या विश्वावर संतुष्ट राहाण्यांत त्याला आनंद वाटतो.

★ ★ ★

गोमंतक २

गोमंतकाला मागसलेला प्रांत म्हणून कोणी नांव ठेवो; तो मागसलेला असला तर स्वतःची जाहिरात करण्यांत, जीवनाच्या लटपटी करण्यांत व आजकालच्या संभावित शब्दांची देवघेव करण्यांत ! श्रीकृष्णांनी वर्णिलेल्या दैवी संपत्तीच्या बाबतींत त्याचा आढावा अजून नुकसानकारक नाहीं. ऋषींनीं महत्व दिलेल्या गृहस्थाश्रमाच्या बाबतींत तो अजून कंगाल झालेला नाहीं. श्रीज्ञानेश्वरांनीं सांगितलेल्या माणुसकीच्या लक्षणांतून तो अजून उठलेला नाहीं. श्रीतुकारामांनीं केलेल्या विष्णुदासांच्या व्याख्येंतून तो अजून गळलेला नाहीं. आणि जेव्हां जेव्हां या गोष्टींपासून तो दूर सरकूं लागतो तेव्हां तेव्हां थप्पड खाऊन त्याला परत आपल्या स्थानीं यावें लागतें. आपल्या जागेवर अढळ राहाण्याची जणू काय सर्वदमक काळाकडून त्याला इशारत मिळते !

गोमंतक साधा भोळा आहे असें बाहेरचे लोक म्हणोत, ती बाब महत्वाची नाहीं. किंबहुना उपेक्षणीय आहे. तो साधा भोळाच राहो असें मी म्हणेन, पण अहंकाराचा वारा त्याला न लागो; दंभाची पीडा त्याला न बाधो. आणि असलेले अंगचे गुण घालविण्याची बुद्धि त्याला न येवो ! इतर लोकांकडून गुण आम्हीं मिळवावे पण त्याबरोबरच असलेले संरक्षित करावे; इतर लोकांच्या वर्तनापासून आम्हीं बोध घ्यावा, पण त्याबरोबर आपली रेषा धरून असावें; इतर लोकांचे डावपेंच आम्हीं ओळखावे, पण ते सावधगिरीनें वागण्यासाठीं.

इतरांचा फायदा आम्हीं घ्यावा पण तो प्रेमाचा मोबदला देऊन. इतर लोकांत आम्हीं मिसळून जावें पण स्वत्वाची जागृति ठेवून. इतर लोकांकरतां आम्हीं सुखनैव राबावें, पण तें कर्तव्यबुद्धीनें आणि इतर लोकांचा इतिहास बनविण्यांत आम्हीं मदत करावी पण ती स्वतःचा इतिहास न गमावतां. आमच्या पूर्वजांची आंखलेली रेषा ही, आणि ती तशीच पुढें ओढीत नेणें हेंच आमचें खरें तत्त्व !

या तत्त्वाची घोषणा गोमंतकची भूमि कणाकणांतून करीत आहे. या ध्येयाची इशारत उंच मान करून उभे राहिलेले माड आपल्या झावळयांच्या शिराशिरांतून देत आहेत. हा मार्ग चोखाळण्याचा संकेत पिवळया चिमण्या आपल्या मोहक सुरा सुरांतून दिवसानुदिवस काढीत आहेत आणि हें कर्तव्य बजावण्याची गर्जना पर्वतांच्या दरी गुहांतून रातबेरात ऐकूं येत आहे ! माणुसकी राखून काम करावें. माणूसपण हें पहिलें, स्वीकारलेला पेशा नंतर. तो इमानें इतबारें कर्तव्यता बुद्धीनें सजवावा, पण अंतरींचा ज्ञानदिवा सदैव प्रज्वलित असावा. निज हृदयींची खूणगांठ अशी दृढ बांधलेले ठेवावी. रस्त्याच्या आंखीव जागेंतून प्रवास करतांना ध्येयाच्या मुक्कामाकडे दृष्टि असावी. तत्त्वाची शिकवण हेंच या भूमीचें वैशिष्ट्य आहे. गोमंतकाची भूमि पुण्यभूमि होय ! या भूमीवर हजारों वर्षांपासून

अनेक थोर पुरुषांनीं व महात्म्यांनीं आपल्या कर्तबगारीचा शिक्का मारलेला आहे. सर्ववंद्य-ऋषिमुनींच्या आध्यात्मिक साधनाला या भूमीचा आश्रय मिळालेला आहे. बुद्धिमान अशा शेंकडों माणसांच्या कार्याचा इतिहास या भूमीवर रचला गेला आहे. अनेक कवींच्या कल्पनेचीं बीजें या भूमींतील ओलाव्यानें उगवून प्रसन्नपणें भरारलीं आहेत. शेंकडों लोकांच्या तरवारींनीं या भूमीवर आपली क्रीडा केली आहे. शेंकडों लोकांच्या लेखण्यांनीं या भूमीचा ज्ञानपट चित्रित केला आहे. आणि शेंकडों लोकांच्या सद्‌भावनेनें या भूमींतील नीतिधर्माची जोपासना झाली आहे !

ही भूमि पुण्यभूमि नाहीं असें कोण म्हणेल ? भगवान परशुरामाच्या वास्तव्यानें पुनीत झालेली, योगेश्वर श्रीकृष्णाच्या पादस्पर्शानें भूषित झालेली, कदंबकुलाचें माहेरघर बनलेली, विद्यारण्य माधवाचें मस्तक नम्र करणारी, शिवाजी महाराजांनां पाहून धन्य झालेली, संभाजींच्या पराक्रमाची साक्षीदार बनलेली, नारोराम, रामचन्द्र मल्हार, जिवबादादा, लखबादादा असे शेंकडों मुत्सद्दी वीर प्रसवलेली, जगांतल्या शेंकडों प्रदेशांतून चमकलेल्या व युरोप अमेरिकेंत आपल्या बुद्धिमत्तेचा प्रभाव गाजविणाऱ्या अनेक खिस्ती बांधवांनां जन्म देणारी ही भूमि, पुण्यभूमि नाहीं असें कोण म्हणेल ?

इतिहासांतील कोणताहि भाग वाचा आणि त्यावरून तुम्हांला समजून येईल कीं, गोमंतकीय माणूस सत्यासाटीं झगडला आहे. त्याची समजूत चुकीची झाली असेल, पण जी झाली व त्यावरून त्यानें जो मार्ग आंखला, तो पाहिला तर सत्याकरतांच त्याची धडपड होती असें आढळून येईल.

सौंदर्य हें तर त्याच्या जन्मभूमीचें महत्वाचें अंग. त्याचें संवर्धन करणें हा गुण त्यानें मातेपासून उचलला आहे यांत नवल कसलें ? चित्रकला घ्या, शिल्पकला घ्या, काव्यरचना घ्या, अगर साध्यासिध्या आयुष्यक्रमाची संगति लक्षांत आणा, त्यांत महत्वानें डोळयांत भरण्यासारखीच गोमंतकीयांची कृति असेल.

सौजन्य हा भाग गोमंतकीयांचा गुणधर्म आहे, आणि सेवा ही तर त्यांची उपास्यदेवता होय !

यापासून जो ढळला गेला त्याच्या कार्यास यश नाहीं आणि महत्वहि नाहीं. या गुणांवरच गोमंतकीय माणसाचें वैशिष्ट्य आहे.

सत्य नीति, दया, क्षमा, शांति, प्रेम, वात्सल्य हे गुण मूर्तस्वरूपानें ज्या भूमींत नांदतात, वावरतात, वाढतात व सुखाची देवघेव करतात ती भूमि पुण्यभूमि नव्हे तर काय ?

म्हणून गोमंतकीयांनीं याच गुणांची वृद्धि करणें, याच गुणांचें महत्व वाढविणें आणि याच गुणांचें पीक सर्व भूमींतून काढणें हाच खरा पुरुषार्थ होय !

गोमंतकाच्या भूमींत भलत्या बियाची पेरणी उगवणार नाहीं. या भूमींत नसत्या झाडांची लागवड केली तर ती वृथा होईल. त्या खटाटोपापासून कांहींच निष्पन्न न होतां उलट अपेशाचे भागीदार व्हावें लागेल. व्यक्तीचा

स्वभाव पाहून उपदेश, तसा भूमीचा गुण पाहून लागवड केली पाहिजे. हिंसेचा उठाव इकडे होणार नाहीं. असत्याचा बाजार इकडे भरणार नाहीं. गर्वाचा ताठा इकडे टिकणार नाहीं. कर्मठपणाचें बाह्य सोंग इकडे मिरवतां येणार नाहीं. शुष्क विद्वत्तेचा उग्र वास इकडे महत्व पावणार नाहीं आणि व्यवहारापासून अलिप्त असलेलें तत्त्वज्ञान इकडे जीव धरणार नाहीं. या भूमीचाच तो गुण आहे.

म्हणून या आपल्या पूज्य व पवित्र गोमंतक-च्या भूमींत जे गुण विशेषत्वानें नांदत आहेत त्यांचा अभ्यास करणें, त्या गुणांशीं तादात्म्य पावणें, त्या गुणांचा प्रसार करणें आणि त्या गुणांचा उत्कर्ष करणें हेंच आपलें काम आहे.

जी जी गोष्ट सत्याच्या कक्षेत येईल ती ती करणें हें आपलें ब्रीद आहे. जी जी गोष्ट सौजन्याच्या मर्यादेंत असेल ती ती करणें ही आपली परंपरा आहे. जी जी गोष्ट सौंदर्याच्या स्वरूपांत दिसेल ती ती करणें ही आपली शिकवण आहे. आणि जी जी गोष्ट सेवाधर्मानें मुद्रांकित असेल ती ती करणें, मनापासून करणें निरपेक्ष बुद्धीनें करणें, किंबहुना जिवाचा मोबदला देऊन करणें हें आपलें कर्तव्य आहे. आपल्या थोर पूर्वजांचा हाच संप्रदाय आहे आणि तो आपण पुढें चालविणें यांतच आपल्या जन्माचें सार्थक्य आहे !

'गोमंतक' षण्मासिकाच्या पूर्वांकांतीलएक कविता —

उद्यान सोडल्यावर

ये जेव्हां मधुमास, भृंग दुरुनी उद्यानिं संमेलती
हर्षें गुंजुनियां सुगंध, मधु यां स्वेच्छें तिथें सेविती
कष्टें तो मग सौख्यकाल सरतां जाताति ते तेथुनी
पुष्पांतील पराग वेंचुनि सवें नेती परी वाहुनी
आकाशीं उडतां दिसे मग जधीं ओसाड भूमी तयां
देती फेंकुनि पुष्परेणु; रुजतां ते वृष्टि होवोनियां
तेथें वृक्षलता वसंतिं धरिति पुष्पांस अंकांवरी
भूमी रुक्ष जरी, सुरम्य मग ती उद्यानशोभा वरी !

* * *

आम्हीही दुरुनी असेच जमतों विद्यालयोद्यानिं या
प्याया ज्ञानसुमांतुनी मधु सुखें गंधासही सेवण्या
जातां येथुनि पुष्परेणु परि का शिंपील कोणी तरी
कोठेंही कधिं रुक्ष भूमि बनण्या उद्यान, भृंगांपरी !

— वि. स. सुखठणकर

नवेंगोंय

धंद्यानिमित्त मुंबई येथें वास्तव्य करणारे कोंकणी वाङ्मयाचे अभिमानी व कोंकणी साहित्यिक श्री. काशिनाथ श्रीधर नायक यांनीं अत्यंत प्रेमानें मुंबई येथें 'नवेंगोंय' त्रैमासिक सुरु केलें. हें कोंकणी भाषेंत व देवनागरी लिपींत निघे. या त्रैमासिकाचा प्रथमांक सन १९३४ सालीं निघाला. १९३४ ते १९३७ अशीं चार वर्षे हें चाललें.

'नवेंगोंय'चे संपादक, मुद्रक व प्रकाशक या नात्यानें आपली कामगिरी श्री. नायक यांनीं अत्यंत जबाबदारीनें पार पाडली. 'नवेंगोंय'चें मुद्रण इतकें सुंदर व आकर्षक होतें कीं, कोणत्याहि वाचकाचें लक्ष तें त्वरित खेंचून घेई.

कोंकणी वाङ्मय, समाजकारण व क्वचित राजकारण अशा विषयांवर यांत लेख येत असत. या त्रैमासिकाचा आकार डेमी अष्टपत्री व कागद स्वच्छ गुळगुळीत असे.

गोवा कामगार

मुंबई येथें १९३४ सालीं 'गोवा कामगार' हें हस्तलिखित स्वरूपांत दर दोन महिन्यांनीं प्रगट होई. यावेळीं याचे संपादक कोण होते हें निश्चित कळत नाहीं. तथापि सन १९३९ सालीं हें साप्ताहिक स्वरूपांत मुद्रीत निघूं लागलें. त्यावेळीं याच्या संपादकांच्या जागीं श्री. एम. एस्. देसाई यांचें नांव असे. हें अल्पावधींतच बंद झालें.

कळा

श्री. सामंत, श्री. शेटये व श्री. फ. बा. आगशीकर अशा मित्रत्रयांनीं हें मासिक पणजी येथें सन १९३५ सालीं सुरू केलें. आरंभीं याचा आकार लहानसाच असे; पण पुढें तो वाढविण्यांत आला. या मासिकाचें कायदेशीर रजिस्ट्रेशन न झाल्यानें पुढील कालांत एखादी स्वतंत्र गोष्ट देऊन तिचेंच नांव अंकाला देण्यांत येई व अंक पुस्तक म्हणून प्रसिद्ध होई. अवघ्याच वर्षांनंतर त्याचें मासिक प्रकाशन बंद झालें आणि दर दिवाळीला त्याचा 'कला दिवाळी' अशा नांवानें दिवाळी विशेषांक तेवढा निघूं लागला. सर्वश्री सामंत व शेटये यांचा संबंध कांहीं अंकांनंतर सुटल्यानें नंतरच्या कालांत आगशीकर हे एकटेच 'कले'चे संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक राहिले. मुद्रणाच्या सोयीसाठीं त्यांनीं 'प्रफुल्ल' प्रेसहि उभारला होता; तथापि त्यांतहि त्यांनां यश लाभलें नाहीं.

'कले'चे वार्षिक वर्गणीदार फारसे नव्हतेच. कलाकारांचें लक्ष कलेच्या किरकोळ खपाकडेच विशेष असे. 'कला' वार्षिक स्वरूपांत दर दिवाळीस निघे; तथापि खप बेताचाच असल्यानें त्यामुळें आयव्ययाचें प्रमाण नीट राहूं शकलें नाहीं.

अखेरीस प्रफुल्ल प्रेस विकून टाकून 'कले'चें प्रकाशन आगशीकरांनीं बंद केलें.

★ ★ ★

— १९ —

ब्राह्मण

सन १९४६ च्या जानेवारींत पेडणें महालांतील मान्द्रें येथें 'ब्राह्मण' मासिकाचा जन्म झाला. पोर्तुगीज सरकारी परवान्याच्या अभावीं याची प्रसिद्धी गोव्याबाहेर सावंतवाडी येथें होई. तेथेंच श्रीगुरु दत्तात्रेय छापखान्यांतून तें छापून निघे. 'ब्राह्मण'चें कार्यालय मात्र मान्द्रें येथें असून सर्व व्यवहार तेथूनच होई.

ब्राह्मण मासिकाचे संपादक, मालक व प्रकाशक श्री. रामकृष्ण नारायण केळकर हे मान्द्रें येथील रहिवासी असल्यानें तेथूनच ते मासिकाची सर्व व्यवस्था बघत असत. या मासिकाचा आकार क्राऊन सोळा पेजी असून मजकुराचीं पृष्ठें सोळा असत. विषय सामाजिक, पौराणिक, वैदिक व कधीं कधीं ऐतिहासिकहि येई.

या मासिकाची आर्थिक स्थिति ठीक नव्हती; त्यामुळें कित्येक वेळां अंक जोड काढावे लागत असत. तथापि श्री. केळकर हे प्रयत्नवादी असल्यानें त्यांनीं हें मासिक तीन चार वर्षें चालविलें. आणि सन १९४९ सालीं तें बंद पडलें.

★ ★ ★

ज्वाला

स्वातंत्र्य लढ्याची गोव्यांत सुरवात झाली त्यावेळींच गोमंतकांत पोर्तुगीज, मराठी, गुजराथी व कोंकणी अशा चार भाषांतून 'ज्वाला' नियतकालिकाचे अंक चोहोंबाजूंनीं धडाडूं लागले. या पत्रानें फिरंग्यांची तारांबळ उडविली. याचे मालक कोण, संपादक कोण व प्रकाशक कोण हें कांहीं कळत नव्हतें. अंकाची छपाई कुठें होते व छापखाना कोठें आहे याचाहि पत्ता लागत नव्हता. एकदां म्हापशेंच्या पोस्टांत तर दुसऱ्या खेपेस पणजीच्या आणि तिसऱ्या खेपेस मडगांवच्या पोस्टांतून अंक रवाना होत. अंकाच्या बाह्य स्वरूपांतील घडोघडीच्या बदलीवरून पोस्टल नोकरांनांहि पोस्टल शिक्का मारतांनां त्याची ओळख मिळत नसे. मजकूर तर इतका जहाल आणि फिरंग्यांची दुर्दशा करून टाकणारा होता कीं, संतापानें त्यांचें रक्त तप्त होई. याचे अंक फिरंगी अधिकाऱ्यांकडे, त्यांच्या बगलबच्च्यांकडे, वाचनालयांनां व इतर ठराविक इसमांनां मोफतच रवाना होत. जिवावरील प्रसंगांतूनहि ज्वाला पत्राचें प्रकाशन करण्यांत गोमंतकीय तरुणांनीं दाखविलेलें धैर्य व चिकाटी और आहे. 'ज्वाला' नियतकालिकाबद्दल 'प्रदीप' दैनिकांत आलेला मजकूर असा आहे—

"१८ जून १९४६ला गोमंतकाचा स्वातंत्र्य –लढा सुरू झाला. फिरंगी हुकूमशाहीच्या जमान्यांत नागरिक स्वातंत्र्याचा संपूर्णतः अभाव असल्यामुळें त्याकाळीं सनदशीररीत्या प्रचार साधनें उपलब्ध होऊं शकत नव्हतीं. स्वातंत्र्य–लढा हा जिवाभावाचा प्रश्न होता. त्याकाळच्या सनदशीर नसल्या तरी बेसनदशीर मार्गांनीं का होईना, स्वातंत्र्य–लढ्याचा प्रचार करणें जरूर होतें. तें कार्य आम्हीं आणि आमच्या सहकाऱ्यांनीं 'ज्वाला' या नियतकालिकाद्वारें केलें. पोर्तुगीज, मराठी, गुजराथी व

कोंकणी मधून निघणाऱ्या या नियतकालिकाची सेवा अजून त्यावेळचे वाचक आणि स्वातंत्र्य-वादी विसरलेले नसतील."

★ ★ ★

आमचें गोंय

'आमचें गोंय' हें देवनागरी लिपींतील कोंकणी पाक्षिक पत्र मुंबई येथें निघत असे. भाषा कोंकणी असली तरी व्यवस्थित आणि याची मांडणीहि ठीक होती. आकारहि आटोपशीरच होता. 'आमचें गोंय' पाक्षिकांत सामाजिक, राजकीय व इतरहि विषय येत असत.

या पत्राचा जन्म सन १९४७ सालीं मुंबई येथें झाला आणि १९४९ सालीं तें बंद झालें.

'आमचें गोंय' पाक्षिकाचे संपादक श्री. बा. भ. बोरकर हे होते.

★ ★ ★

दीपगृह

सन १९४७ सालच्या अखेरीस राजकीय चळवळीमुळें ज्यांनां गोमंतक सोडणें भाग झालें त्यांत श्री. जनार्दन जगन्नाथ शिंक्रे यांचाहि समावेश होतो. गोमंतकीय स्वातंत्र्यलढ्याच्या प्रचाराचें एक साधन म्हणून त्यांनीं मुंबई येथें सन १९४७ सालींच एका साप्ताहिकास जन्म देऊन त्याचें नांव 'दीपगृह' असें ठेवलें. या पत्रांत गोव्याच्या तत्कालीन राजकारणावर सणसणीत लेख येत असत. याशिवाय सामाजिक व इतरहि लिखाण यांत प्रसिद्ध होई.

'दीपगृह' पत्राचा आकार सध्याच्या प्रदीप दैनिकाएवढाच असे. वर्गणीहि माफक होती. दिवाळी व इतर वेळीं 'दीपगृह'चे जे खास अंक निघत त्यांमधून विविध आकर्षक वाङ्मयाची मेजवानी वाचकांनां लाभत असे.

हें पत्र मुंबई येथें निघत असलें तरी त्याचे अंक भूमिगत संघटनेच्या द्वारें गोमंतकांतहि वांटण्यांत येत असत. सन १९६१ च्या मार्च महिन्यापर्यंत 'दीपगृह' पत्र चाललें व नंतर तें कायमचें बंद झालें. 'दीपगृहा'नें तब्बल तेरा वर्षे जनताजनार्दनाची जी सेवा केली ती कौतुकास्पद आहे.

आपल्या 'प्रदीप' दैनिकांत श्री. शिंक्रे 'दीपगृह' पत्राविषयीं म्हणतात कीं—

"आम्हांला १९०७ च्या अखेरीस गोमंतक सोडणें भाग पडलें, आणि तो प्रयत्न (ज्वाला इ. प्रकाशनचा) स्थगित झाला. आम्हीं मुंबई गांठली आणि गोमंतकीय स्वातंत्र्य–लढ्याच्या प्रचाराचें एक साधन म्हणून 'दीपगृह' साप्ताहिक काढलें. कर्मभूमि मुंबई ठरली, पण या साप्ताहिकाचे अंक भूमिगत संघटनेद्वारें गोमंतकांत वांटले जात होते. अल्पकाल स्थगित झालेलें 'ज्वाला' नियतकालिकाचें प्रकाशनहि सायक्लोस्टाईलवरून सुरू झालें. 'दीपगृह' दुरून प्रकाश देत होतें तर ज्वाला गोमंतकांत धगधगत होती. 'क्वीट गोवा'चा संदेश सर्वत्र गाजत होता......".

★ ★ ★

साद

मुंबई येथें स्थापन झालेल्या कोंकणी भाषा मंडळातर्फे या नियतकालिकाचा प्रथमांक सन १९५२ सालच्या डिसेंबर महिन्यांत प्रकाशनांत आला. 'सांगणी आनी मागणी' या आपल्या आरंभींच्या निवेदनांत कोंकणी भाषा मंडळानें जाहीर केलें होतें कीं, कमींत कमी एक हजार वर्गणीदार मिळाल्यास हें नियतकालिक त्रैमासिक स्वरूपांत प्रगट होत जाईल. तथापि ज्यावरून याचा दुसरा अंक निघाला नाहीं त्यावरून अपेक्षित वर्गणीदार लाभले नाहींत असें वाटतें.

'साद'च्या पहिल्या अंकाचे संपादक श्री. मनोहरराय सरदेसाई हे असून कार्यकारी संपादक व प्रकाशक श्री रामचंद्र नारायण नायक हे होते. प्रकाशनस्थल 'गिरगांव-मुंबई ४' येथें होतें.

'साद'च्या या प्रथमांकांत सर्वश्री मनोहरराय सरदेसाई, बाकी बोरकर, कांत हेगडे देसाई, र. वि. पंडित, प्रा. रामचंद्र शंकर नायक, मलबाराव सरदेसाई, वसंत नेवरेंकर, लक्ष्मणराव सरदेसाई, पांडुरंग रा. भांगी, रा. ना. नायक वगैरे लेखकांचें विविध विषयांवरील लिखाण आलें होतें. वर्गणी चार अंकांची तीन रुपये व या अंकाचें मूल्य एक रुपया होतें. हें मासिक विशेषत: कोंकणी भाषेचा पुरस्कार करणारें होतें.

★ ★ ★

विकास

'हिंदु' साप्ताहिकाच्या आकाराचें हें 'विकास' साप्ताहिक पत्र १९५४ सालीं रा. द. व्यं. पै यांनीं बेळगांव येथें सुरु केलें. ज्या मुद्रणालयांत बेळगांवला हें मुद्रीत होई त्याचे मालकहि या पत्राचे भागीदार असावे असें वाटतें. 'विकास'चें ध्येय राजकीय असलें तरी त्यांत सामाजिक व इतर विषयांवरहि चर्चा येत असे. हें पत्र अल्प कालच चालून पुढें बंद झालें.

★ ★ ★

दूधसागर

गोमंतकाच्या सर्वांगीण प्रश्नांनां वाहिलेलें पाक्षिक म्हणून हें मुंबई येथें दि. १५ ऑगस्ट १९५४ रोजीं सुरु झालें. मुंबई येथील त्रिभुवन रोडवरील सागर साहित्य प्रकाशनचें हें मुखपत्र असून त्याचे संपादक, संचालक व प्रकाशक श्री. बा. द. सातोस्कर आणि कार्यकारी संपादक श्री. ज. वि. कामत हे होते. वा. व. ४ रुपये होती. आकार 'भारत' पत्राचा आणि पृष्ठें प्रथमांकाचीं व द्वितियांकाचीं १० व पुढील अंकांचीं ६ किंवा ८ असत. हें ८ वर्षें चाललें आणि १ मार्च १९६२ रोजीं त्याचा अखेरचा अंक निघाला.

प्रथमांकांत अग्रलेखाशिवाय इतरहि कांहीं लेख असून नगरहवेली, स्वातंत्र्याची वाटचाल, स्वातंत्र्याच्या अखेरच्या पर्वास प्रारंभ झाला, सार्वजनिक संस्थांचा संसार इ. स्फुटें 'तुषार' या सदरांत होतीं. प्रथमांकांतील अग्रलेख असा होता--

आमची भूमिका

" आज भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या सुमुहूर्तावर 'दूधसागर'च्या पहिल्या अंकाचें प्रकाशन होत आहे. अनेक वर्षांची अनेकांची कामना सफल होत आहे. मुंबई शहरांत गोमंतकाची वस्ती इतकी वाढली आहे कीं, हा छोटा गोमंतकच मुंबईत अस्तित्वांत आला आहे. भारताहून या गोमंतकाची अस्मिता भिन्न नसली तरी विशिष्ट ऐतिहासिक कारणांमुळें निर्माण झालेले त्याचे कांहीं खास प्रश्न आहेत. गोमंतकीयांच्या स्वतंत्र प्रादेशिक संस्था व संघटना आहेत. व्यक्तिगत जीवनाप्रमाणेंच त्यांनां एक सामुदायिक, सामाजिक जीवन आहे. या दृष्टीनें या शहरांत गोमंतकीयांच्या एका मुखपत्राची गरज भासत होती. मध्यें कांहीं काळ चाललेल्या 'दीपगृहा'चा अपवाद सोडला तर मुंबईत असें वृत्तपत्र नव्हतें. म्हणूनच दूधसागरच्या प्रकाशनानें गोमंतकीयांची एक महत्वाची गरज भागेल असा आम्हांला विश्वास वाटत आहे.

महाराष्ट्रालाहि दूधसागरमुळें गोमंतकाचें नवीन वास्तव दर्शन होण्यास मदत होईल अशी आम्हीं आशा करतों. गोमंतकाविषयींच्या खूप बातम्या मराठी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतात आणि तरीहि गोमंतकाविषयीं गोमंतकीयेतरांच्या कांहीं अस्पष्ट, अबोध, ढगाळलेल्या स्वप्नाळू कल्पना आहेत. त्यांनां स्वप्नसृष्टींतून वास्तव-सृष्टींत आणण्याचें काम दूधसागरच्या द्वारें झालें तर आम्हांला आनंद होईल.

गोमंतकाच्या भौगोलिक व्याप्तींत आम्हीं कारवारचा समावेश करतों हेंहि या ठिकाणीं नमूद करून ठेवलें पाहिजे पुरातनकालापासून भौगोलिक, ऐतिहासिक, भाषिक, सांस्कृतिक वगैरे दृष्टींनीं हा भाग गोमंतकाचा घटक होता.......

पोर्तुगिजांच्या निर्गमनानंतर चिरफाळलेला गोमंतक एकरूप व्हावा या दिशेनेंच दूध-सागरचीं पावलें पडतील.

दूधसागरचें राजकीय वा इतर धोरण कोणतें राहील याचा खुलासा करण्याची फारशी आवश्यकता नाहीं. संपादकांचीं मतें ज्यांनां माहीत आहेत त्यांनां दूधसागरच्या धोरणाची कल्पना येईल. ज्यांनां तीं माहीत नाहींत त्यांनां कांहीं अंकांच्या वाचनानंतर तें समजून येईल.

दूधसागरचा हा अंक प्रसिद्ध होतांनां ८२ वर्षांच्या गोमंतकाच्या दीर्घ व उज्ज्वल पत्रव्यव-सायाचा चित्रपट आमच्या डोळ्यांपुढून सरकत आहे. १८७२ सालीं कै. आ. पु. सुखठणकर यांनीं 'देशसुधारणेच्छु' सुरू करून गोमंतकांतील मराठी पत्रव्यवसायाचा पाया घातला आणि कै. हेगडे देसाई यांचा 'भारत' हा त्यांचा अखेरचा चिरा ठरला.................."

याच अग्रलेखांत पुढें "दूधसागर" या नांवाविषयीं चार शब्द लिहिले आहेत.

प्रथमांकाच्या मलपृष्ठावर शेवटीं असें लिहिलें आहे —

"संपादक, मुद्रक, प्रकाशक बा. द. सातो-स्कर यांनीं फेमस प्रिंटर्स १२ त्रिभुवनरोड मुंबई ४ येथून प्रसिद्ध केलें."

★ ★ ★

विसावा

डेमी अष्टपत्री आकाराचें हें मासिक पुस्तक मुंबई येथें प्रसिद्ध होई. या मासिकाचे संपादक व प्रकाशक श्री. बा. द. सातोस्कर हे असले, तरी त्याचे मालकी हक्क 'महाराष्ट्र ग्रंथ भांडार'कडे होते. 'विसावा' मासिकाच्या दर अंकाचीं पृ. ६४ व वार्षिक वर्गणी ५ रुपये होती. कागद गुळगुळीत व मुद्रण सुंदर असे. हें मासिक कथा साहित्याला वाहिलेलें असलें तरी त्यांत इतरहि वाङ्‌मयीन लेख व प्रचलित विषयांवरील चर्चा येई. याचे कांहीं महत्वाचे विशेषांकहि निघाले आहेत. 'विसावा' मासिक १९४७ च्या ऑक्टोबर महिन्यापासून पुढें ५ वर्षें चाललें आणि मग बंद पडलें तें कायमचेंच.

★ ★ ★

उदय

सन १९५५ च्या डिसेंबर महिन्यांत 'उदय' नियतकालिकाचा पणजी येथें जन्म झाला. ५ ऑगस्ट १९५३ रोजीं आरंभीं हें हस्तलिखित त्रैमासिक म्हणून सुरू झालें. त्यावेळीं त्याचे संपादक श्री. प्रेमानंद वळवईकर हे होते. मुद्रीत स्वरूपांत प्रसिद्ध करतांनांहि अंक त्रैमासिक प्रगट करावे असा संपादकांचा हेतु होता; पण त्यानंतर आलेल्या अडचणीं-मुळें कोणत्याहि स्वरूपांत याचा दुसरा अंक निघू शकला नाहीं. मुद्रित अंकाचे 'उदय'चे संपादक श्री. देवीदास प्र. तिरोडकर व श्री. पंढरीनाथ शे. नार्वेकर हे होते. उदयाचा आकार क्राऊन अष्टपत्री व पृ. ८२ होतीं. यांत लघुकथा, लघुनिबंध व कविताहि होत्या.

★ ★ ★

नवजीवन

बेळगांव येथें सन १९५८ सालापासून 'नवजीवन' पाक्षिक पत्र सुरू झालें. या वर्षीं १५ ऑगस्ट रोजीं त्याचा प्रथमांक थाटांत प्रसिद्ध झाला. या पत्राचा आकार 'भारत' पत्राएवढा होता. पृष्ठें ४ व कधीं कधीं ६ देखील असत. या पत्रांत मुख्यत्वें गोव्याच्या राजकारणावरील लेख येत असत. कांहीं वेळा सामाजिक व इतर प्रश्नांचीहि चर्चा येई. 'नवजीवन'ची वार्षिक वर्गणी ४ रुपये होती. या वृत्तपत्राचे चालक, मालक व प्रकाशक श्री. विश्वनाथ नारायण लंवदे, वकील हे होते. दि. १५ ऑगस्ट १९५८ पासून सन १९६१ अखेर पर्यंत नवजीवनचें प्रकाशन बेळगांव येथेंच होई. आणि त्या कालांत श्री. बी. व्ही. नाईक हे 'नवजीवन'चे भागीदार व सहकारी संपादक होते.

गोवा मुक्तीनंतर १९६२ सालीं ऑगस्ट-पासून 'नवजीवन'चा संसार गोव्यांत आण-ण्यांत आला. आणि बेतीं येथून तें पत्र प्रसिद्ध होऊं लागलें. यावेळीं त्याचे संपादक श्री. रघुनाथ देशपांडे व प्रकाशक लंवदे होते. पुढें १९६३ सालीं 'नवजीवन'चें कार्यालय पणजी येथें आणण्यांत आलें. त्यानंतर त्याच्या वर्गणींत वाढ होऊन ती ६ रु. करण्यांत आली. पुढें कांहीं कारणामुळें हें पत्र बंद

झालें. सन १९६२ ते १९६३ या कालांत गोव्यांत तें फक्त दीड वर्ष चाललें. आणि १९६३त बंद झालें. 'नवजीवन' पत्र अद्यावत् तयारीनें अर्धसाप्ताहिक स्वरूपांत पुन्हां सुरू करावें असा त्याचे चालक श्री. लंवदे यांचा विचार असून तो लवकरच मूर्त-स्वरूपांत येणार आहे.

★ ★ ★

दीपावली

दरसाल दिवाळीस थाटांत प्रसिद्ध होऊन वाचकांच्या दिवाळीच्या आनंदांत बेफाम भर घालणारें दीपावली वार्षिक १९४५ पासून मुंबई येथें सुरू झालें. याचे संपादक श्री. दीनानाथ दामोदर दलाल व श्री. रॉय किणीकर हे होते. याचा आकार 'किर्लोस्कर' मासिकाचा असून पृष्ठें १५० ते २०० असत. विषय एकापेक्षां एक वेधक असत. अंतरंगा-प्रमाणेंच बाह्यांगहि मोहक असे. मूल्य रु. २ ते २॥ असे. सन १९५४ पासून 'दीपा-वली'चे संपादक, प्रकाशक, मालक व मुद्रक श्री. दी. दा. दलाल हेच आहेत. सध्या 'दीपावली' मासिक स्वरूपांत निघत असून त्याची वा. व. १२॥ रु. आहे. दर अंकाचीं पृष्ठें ५० पासून ६० पर्यंत असतात.

★ ★ ★

अर्चना

पणजी येथें निघणारें 'कला' नियतकालिक बंद झाल्यानंतर श्री. फ. बा. आगशीकर यांनीं मुंबई येथें १९६२ पासून 'अर्चना' नावांचें एक वार्षिक सुरू केलें असून त्याचा दर दिवाळीस थाटांत एक अंक निघतो. अर्चनेचें प्रकाशन मासिक करण्याचाहि त्यांचा विचार आहे.

★ ★ ★

रत्नदीप

मुळगांवकर आर्ट स्टुडियोतर्फे हें मासिक मुंबई येथें प्रकाशनांत येत आहे. याचा आकार क्राऊन अष्टपत्री असून साहित्याप्रमाणेंच सजा-वटहि वेधक असते. रत्नदीपचा अलीकडील एकहि अंक अवलोकनांत न आल्यानें हल्लीचे त्याचे संपादक व प्रकाशक कोण, वा. व. काय आहे इ. बद्दल कांहीं लिहितां येणें शक्य नाहीं.

★ ★ ★

गोवानिज

भारताच्या फाळणीपूर्वीं अर्थात् पाकिस्तान-च्या जन्माआधीं कराची येथें 'गोवानिज' त्रैमासिक निघे. या त्रैमासिकांत इंग्रजी, कोंकणी (रोमन लिपी) व मराठी असे तीन विभाग होते. डिसौजा नांवाचे एक गोमंतकीय ख्रिस्ती याचे संपादक असून तेच पहिले दोन विभाग चालवीत. आणि तिसरा मराठी विभाग वेंगुर्लें येथील कुबल नांवाचा एक मराठा तरुण पाही. हें त्रैमासिक केव्हां सुरू झालें, किती वर्षें चाललें, आकार कोणता होता, वर्गणी किती होती, या बद्दलची कांहींच माहिती मिळत नाहीं. याचा एखादा अंकहि कधीं अवलोकनांत आला नाहीं. त्यामुळें विशेष कांहीं लिहितां येत नाहीं.

★ ★ ★

कथासागर

सन १९५९ सालीं जानेवारी महिन्यापासून 'कथासागर' मासिक पुस्तक मुंबई येथें सुरू झालें. या मासिकाचा आकार डेमी चतुष्पत्री असून दर अंकाचीं पृष्ठें ६० असत. वार्षिक वर्गणी १० रुपये होती. कथासागर मासिक मुख्यत्वें कथा साहित्याला वाहिलेलें होतें. तथापि यांत इतर लेखनहि येत असे. याचे कांहीं विशेषांकहि चांगले निघाले आहेत. 'कथासागर'चे संपादक, मालक व प्रकाशक श्री. बा. द. सातोस्कर हे होते.

हें मासिक सतत ५ वर्षें ठीक चाललें आणि १९६३ अखेर बंद झालें.

★ ★ ★

नवीं नियतकालिकें

तरुण गोवा

गोव्याच्या मुक्तीनंतर प्रजासत्ताक दिनीं २६ जानेवारी १९६२ रोजीं 'गोमंतक' दैनिकाचा नमुना अंक निघाला; पण तें दैनिक अजून सुरू व्हावयाचें होतें आणि त्याच जानेवारीच्या २८ दिनांकला 'तरुण गोमंतक' या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्यावेळीं एका 'भारतमित्र' मासिकाशिवाय गोव्यांत दुसरें कोणतेंहि मराठी नियतकालिक नव्हतें. अशा स्थितींत 'तरुण गोवा' नांवाचें एक नव्या दमाचें पत्र अस्तित्वांत आलेलें व त्याचा १ला अंक निघालेला पाहून तरुण वाचकांनां जरा कौतुक वाटलें.

'तरुण गोवा' पत्राचा आकार 'भारत' पत्राएवढा असून पृष्ठें ४ व कधीं ६ होतीं. दर अंकाची किंमत १५ नये पैसे असे. वा. व. काय हें अंकावरून कळत नव्हतें. त्यावरून चालकांचें लक्ष किरकोळ खपाकडेच अधिक होतें असें दिसून येई. या पत्राचे मुख्य संपादक व प्रकाशक श्री. वामन देसाई हे असून द्वितीय संपादक श्री. मल्हार कितीकर हे होते. प्रकाशनस्थळ पणजी असे.

'तरुण गोवा' पत्राच्या प्रथमांकांतील संपादकीय मजकूर असा होता —

संपादकीय

"गोमंतकाच्या स्वातंत्र्य लढ्याचें एक पर्व संपून आतां दुसरें सुरू झालें आहे. गोमांतक स्वतंत्र झाला. या स्वतंत्र गोमांतकाचें मुखपत्र म्हणून 'तरुण गोवा' या नावांचें आम्हीं साप्ताहिक सुरू करीत आहोंत. या साप्ताहिकाचा पहिला अंक दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनानिमित्यानें वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांला मोठा आनंद होत आहे.

आज आम्हीं आनंदानें बेहोष आहोंत. परंतु याचबरोबर आम्हांला कर्तव्य व कार्य विसरून चालणार नाहीं. यापुढें आम्हांला बहुजन समाजाचें भरपूर कार्य करायचं आहे.

गोमंतक मुक्त झाला खरा, पण आतां यापुढचें कार्य कठिण आहे. जबाबदारी फार आहे. गोमंतकीय जनतेपुढें असलेल्या आर्थिक

आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठीं संघटित प्रयत्नांची आज जरूरी आहे. आमचें साप्ताहिक जनताजनार्दनाच्या हितासाठींच झटणार आहे.

गोमंतकीय जनतेला लोकशाही आणि समाजवाद यासाठीं संघटित करणें हें प्रथम साधलें पाहिजे. जातिभेदाचें निर्मूलन करणें आणि वर्गरहित समाजरचना उभारणें, सहकारी शेतीला उत्तेजन देणें, औद्योगिकरण, मच्छी-मारी धंद्याची सुधारणा करणें, तसेंच सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रगति या मार्गांनीं गोमंतकीय जनतेला सुखसमृद्धीकडे नेण्याचा निर्धार केला पाहिजे, व त्यासाठींच या साप्ताहिकाचा जन्म झाला आहे.

आम्हांला वाचकांचा सदैव पाठिंबा मिळेल अशी आशा बाळगतों. "

श्री. वामन देसाई यांनीं संपादकाच्या नात्यानें वाचकांनां जें वचन दिलें तें त्यांनीं पुढील कालांत कितपत पाळलें हें नंतरच्या अंकांवरून सहज कळून येतें.

आरंभींचें कांहीं दिवस हें पत्र बिन तक्रार चाललें; पण पुढें पुढें त्याच्यावर अनेक तक्रारींची गर्दी झाली. राष्ट्रीय किंवा सामाजिक प्रश्नांपेक्षां खासगी प्रश्नांनां विशेष महत्व देण्यांत येऊं लागलें; टीकेची पातळी उतरली आणि त्यामुळें वाचकांची सहानुभूति कमी होत जाऊन प्रकाशनांतहि अडथळे येऊं लागले. त्याच सालच्या जून महिन्याच्या सुमारास सहकारी संपादक श्री. किर्तीकर हे 'तरुण गोवा'पासून सुटले. सप्टेंबरांत आर्थिक पेंचामुळें श्री. वामन देसाई देखील 'तरुण गोवा' सोडून चालते झाले आणि ज्या छापखान्यांत हें साप्ताहिक छापण्यांत येई त्या वास्कोच्या नॅशनल प्रेसचे मालक श्री. स. वि. कामत यांनां इच्छेविरूद्ध या पत्राच्या संसाराची सारी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी लागली.

त्यांनीं अंकाचीं पृ. ४ करून मूल्य ६ पैसे केले. आणि 'तरुण गोवा' पत्र ऑक्टोबर पर्यंत कसें तरी चालविलें. पुढें ३८ व्या अंकानंतर त्यांनांहि तें कायमचें बंद करणें भाग झालें. श्री. कामत यानांच 'तरुण गोवा' साप्ताहिकापायीं विशेष नुकसान झालें असें दिसून येतें !

★ ★ ★

गोअन

इंग्रजी आणि कोंकणी (देवनागरी लिपी) भाषेंत हें वार्षिक मुंबई येथें भायखळा भागांत सुरू झालें. १९६२ सालच्या जानेवारी महि-न्यांत याचा पहिला अंक निघाला आणि तोच शेवटचा ठरला. याचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठें ४०, मूल्य आठ आणे होते. संपादक एम्. फर्नांडेस व व्ही. शिरोडकर हे होते. हें फक्त ललित साहित्यास वाहिलेलें होतें.

★ ★ ★

गोमंतक (दैनिक)

" गेलीं दीड दोन वर्षें गोव्यांत एखादें अद्यावत् मराठी दैनिक सुरू करण्याचा संकल्प मी सोडला होता. त्यासाठीं जरूर ते प्रयत्न चालूहि होते. जुळवाजुळव होत होती. आतां ते प्रयत्न व ती जुळवाजुळव निश्चित पूर्ण होत असून गोमंतकाच्या सेवेसाठीं महिन्याभराच्या आंत 'गोमंतक' हें दैनिक प्रकाशित होऊं लागणार हें या भारतीय गणराज्य दिनीं जाहीर करण्यांस मला आनंद होत आहे.

गोव्यांतील सर्वधर्मीय जनतेच्या सर्व प्रकारच्या गरजा, आशा आणि आकांक्षा 'गोमंतक' दैनिक व्यक्त करील. सर्वसामान्य माणसाला गोव्यांतील ताज्या घडामोडी व त्यांचें महत्व या दैनिकांतून समजेल. आपल्या राष्ट्रांतील व परराष्ट्रांतील सर्व प्रकारच्या महत्वाच्या बातम्या 'गोमंतक' प्रत्येक खेड्यापाड्यांत पोहोंचवील. जनतेच्या सर्वांगीण उत्कर्षास 'गोमंतक' आपल्यापरीनें हातभार लावील.

या दैनिकाचे संपादक म्हणून सुप्रसिद्ध गोमंतकीय साहित्यिक श्री. बा. द. सातोस्कर यांची निवड केली आहे. संपादक मंडळांत अनुभवी, कार्यकुशल आणि सेवातत्पर अशा व्यक्तींचा समावेश असेल. अद्यावत् मराठी दैनिकाचें कोणतेंहि अंग उणें राहूं नये म्हणून शक्य ते सर्व प्रयत्न करण्यांत येतील.

शेवटीं गोमंतकांतील व गोमंतकाबाहेर राहणाऱ्या गोमंतकीयांनीं व इतरांनीं 'गोमंतक' दैनिक आपलें मानावें, तें सर्वांगसुंदर व्हावें म्हणून हरतऱ्हेनें व हरप्रकारानें साह्य करावें अशी माझी सविनय विनंति आहे. — विश्वास दत्ताजी चौगुले, संचालक."

दि. २६ जानेवारी १९६२ रोजीं मुक्त गोमंतकांतील पहिल्या गणराज्यदिनीं निघालेल्या 'गोमंतक'च्या गणराज्यदिन–स्मरणिकेंतील तथा नमुनांकांतील सदरील मजकूर वाचून गोमंतकांतील मराठीच्या वाचकांनां फार आनंद वाटला. कारण सन १८६० सालापासून १९६१ पर्यंतच्या तब्बल एका शतकाच्या गोमंतकांतील मराठी नियतकालिक क्षेत्रांतील कामगिरींत 'गोमंतक' हें पहिलें वहिलें मराठी दैनिक असून तें अद्यावत् व्यवस्थेंत निघणार होतें. त्याशिवाय श्री. विश्वासराव चौगुले यांच्यासारख्या बहुश्रुत, वृत्तपत्रांचें महत्व जाणणाऱ्या, दीर्घोद्योगी आणि यशस्वी उद्योगपतींनीं 'गोमंतकाला' स्वयंस्फूर्तीनें जन्म देण्याचें निश्चित केलें असल्यानें 'गोमंतका'च्या दीर्घजीवनाबद्दल आणि यशस्वितेबद्दलहि शंका नव्हती. एकदां त्यांच्या व माझ्या प्रत्यक्ष भेटींत वृत्तपत्र व्यवसायाबद्दल आमचीं जीं बोलणीं झालीं त्यांतून त्या व्यवसायाबद्दलचा त्यांचा जिव्हाळा स्पष्ट कळून आला. त्याचप्रमाणें माझा या क्षेत्रांतील अनुभव आणि गोमंतकीय मराठी दैनिकांसंबंधींचा दृष्टिकोन समजून घेतांनां त्यांनीं हळुवारपणें केलेले प्रेमळ पण अत्यंत विचारार्ह प्रश्न यांतून त्यांच्या व्यावसायिक चातुर्याबरोबरच गोव्यांतील मराठी दैनिकाबद्दलची जी तळमळ प्रगट झाली ती और होय. 'गोमंतक' दैनिकाच्या संचालकांच्या या उत्कट इच्छेमुळेंच तें पत्र दीर्घजीवि होईल अशी आशा करणें अनाठायीं नाहीं.

नमुनांकांतील अभिवचनाप्रमाणें संचालकांनीं पुढें लवकरच 'गोमंतक' दैनिक वाचकांच्या सेवेस सादर केलें, आणि आज तें पणजी येथें व्यवस्थित चालू आहे. या वृत्तपत्राचे संचालक, प्रकाशक व मालक श्री. विश्वासराव द. चौगुले हे असून संपादक श्री. बा. द. सातोस्कर हे आहेत.

या दैनिकाचा आकार मोठा असून वा. व. २४ रु. व नेहमींच्या किरकोळ अंकाची किंमत सहा पैसे आहे.

'गोमंतक' दैनिकाच्या प्रकाशनानें गोमंतकांतील मराठी वाचकांची सोय तर ठीक झालीच; पण या नव्या दैनिकामुळें जुन्यांचा दिमाखहि बराच उतरला.

ध्येयधोरणाच्या बाबतींत काटेकोरपणें पाळण्यांत येणारा 'गोमंतका'चा संयम हल्ली एखादे वेळेस जरा सुटला जातो असें तज्ज्ञ वाचकांचें मत आहे.

प्रदीप

'गोमंतक' दैनिकाच्या मागोमाग गोमंतकांत दुसरें दैनिक प्रकाशनांत आलें तें 'प्रदीप'. गोमंतकाच्या मुक्तीपूर्वी मुंबईत चालू असलेलें आपलें 'दीपगृह' वृत्तपत्र बंद करून श्री. जनार्दन जगन्नाथ शिंक्रे यांनीं ६ सप्टेंबर १९६२ पासून गोमंतकांत पणजी येथें 'प्रदीप' दैनिक सुरू केलें.

श्री. शिंक्रे यांनीं द्वैमासिक, पाक्षिक, साप्ताहिक अशीं जरी नियतकालिकें यापूर्वी चालविलेलीं असलीं तरी दैनिक चालविणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे! एखादें लहानसें मासिक देखील नियमीत चालविण्याच्या बाबतींत जिथें नाकीं नव येतात, तिथें दैनिकाच्या बाबतींतील गोष्ट तर विचारूंच नये! तथापि महान जबाबदारी व त्रास स्पष्ट दिसत असतांहि दैनिक वृत्तपत्रक्षेत्रांत उडी घेण्याचें श्री. शिंक्रे यांनीं जें साहस केलें तें और आहे. आणि त्यांत विशेष हें कीं, सगळी जबाबदारी स्वतः एकाच व्यक्तीची!

'प्रदीप' पत्राचा आकार 'भारत' साप्ताहिकाएवढा असून दर अंकाचीं पृष्ठें ४ असतात, रविवारखेरीज हें पणजी येथें दररोज प्रसिद्ध होत असतें. किरकोळ अंकाची किंमत ५ पैसे आहे.

'प्रदीप' दैनिकाचें ध्येय स्पष्ट असून प्रत्येक अंकांत अग्रलेखाच्या वरती त्याचें ध्येयवाक्य लिलेलें असतें. तें ध्येयवाक्य असें आहे—

"गोमंतकाची भाषा मराठी आणि कोंकणी ही तिची बोली म्हणूनच गोमंतक हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे आणि तो कोणत्याहि परिस्थितींत, जवळच्या भविष्यकालांत अखंड महाराष्ट्रांत विलीन होणारच."

'प्रदीप'च्या या ध्येयाविरुद्ध इतर नियतकालिकांतून जें लेखन प्रसिद्ध होतें त्याच्यावर तो सारखा ताशेरा झाडीत असतो. लांचलुचपत व काळोखी कृत्यें यांवरहि प्रदीपकारांच्या लेखणीचा फटकारा तीव्रतेनें बसतो. अंतःकरणांत एक आणि लिहिणें निराळेंच अशी त्यांची कृत्रिम वृत्ति नसून जसें वाटतें तसेंच मनमोकळेपणें स्पष्ट लिहिण्याची त्यांची पद्धत दिसून येते. "प्रदीप'कारांची टीका मात्र एखादेवेळीं

इतकी प्रखर असते कीं, तीमध्यें सहानुभूतीचा ओलावा अगदींच नसतो," असें कित्येक वाचकांचें मत आहे.

कोंकणी

सन १९६२ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या २५ दिनांक रोजीं कोंकणी भाषेंतील 'कोंकणी' पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या पत्राचा अंक दरमहा दि. १० व २५ रोजीं प्रसिद्ध होत असे. याची वा. व. ४ रुपये असून किरकोळ अंकाचें मूल्य १५ पैसे असे.

मुंबई येथील कोंकणी केंद्रातर्फे 'कोंकणी' पाक्षिक प्रसिद्ध होई. याचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. अ. ना. महांबरे हे असून प्रकाशन स्थल स्लेटर रोड, मुंबई ७ हें होतें.

सप्टेंबर १९६२ पासून जानेवारी १९६३ पर्यंत या पाक्षिकाचे ८ अंक निघाले व त्यानंतर चालकांनीं हें पाक्षिक बंद केलें असावें असें वाटतें. या पत्राचें मुद्रण व कागद ठीक होता. मजकुराच्या बाबतींत, कोंकणी भाषा विषयालाच यांत प्राधान्य असे. कांहीं राजकीय व सामाजिक मजकूर यांत येत असला, तरी कोंकणी भाषेची जरूरी प्रतिपादन करून तिची तरफदारी करण्यांतच या पत्राचें वैशिष्ट्य असे. इतर विषयांवरील यांतील लेखन समतोल असलें, तरी कोंकणी भाषेच्या विरोधकांवर तुटून पडतांनां यांतील टीकेचा तोल सुटत असे.

कोंकणी पाक्षिकाचा ३रा व ४था अंक समाविष्ट असलेला १९६२चा दिवाळी विशेषांक निघाला होता. तो साहित्य आणि सजावट या दोन्हीं दृष्टींनीं इतका सुरेख वठला होता कीं, इतर कोणत्याहि प्रसिद्ध नियतकालिकांच्या दिवाळी अंकांच्या पंगतींत तो सहज शोभण्यासारखा होता. त्या विशेषांकांत ६ निबंध, ६ ललित लेख, ४ कथा, १९ कविता, मुलाखत, खेळ व शिशुविभाग असा भरगच्च मजकूर असून अंकाचीं पृ. ८४ व मूल्य रु. १–५० होतें.

त्रिवेणी

त्रिवेणी पाक्षिकाचा नमुना अंक १९६२ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या दि १४ रोजीं प्रकाशनांत आला आणि १ डिसेंबरपासून 'त्रिवेणी' पत्र सुरू झालें. याचा आकार 'भारत' पत्राएवढा असून कोंकणी, हिंदी व मराठी अशा तीन भाषांतून यांत विविध मजकूर प्रकाशीत होई. या पाक्षिकाची वार्षिक वर्गणी रु. ४–५० होती.

'त्रिवेणी'चे संपादक व प्रकाशक श्री. चंद्रकांत केणी हे असून प्रकाशन स्थल मडगांव येथें होतें.

१९६३ सालीं अल्प कालांतच हें पाक्षिक बंद झालें. या पत्रांत राजकारणासोबतच इतरहि बरीच माहिती येई.

मांडवी

मांडवी मासिकाचा प्रथमांक दि. ३० डिसेंबर १९६२ रोजीं प्रकाशनांत आला, पण तो जानेवारी १९६३ चा असल्यानें मासिकाची सुरवात १९६३ सालापासूनच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'साहित्य, कला आणि राजकारण यांस वाहिलेलें मासिक' असें 'मांडवी' चें ध्येय वाक्य आहे. या मासिकाचा आकार 'किर्लोस्कर' मासिकाचा असून मुद्रण सुबक असतें. प्रथमांकांत १० कविता, तीन लघुकथा, एक प्रहसन आणि निबंध इ. इतर वाचनीय विषय आले होते.

सदर अंकांत या मासिकाच्या संपादकांच्या जागीं श्रीराम पांडुरंग कामत व प्रा. मनोहर हि. सरदेसाई यांचीं नांवें असून, कार्यकारी संपादक श्री. ज. पां. कामत व प्रकाशक श्री. पां. कामत हे होते. वा. व. १२ रुपये होती. याचें मुद्रण बेळगांवला आणि प्रकाशन अस्नोडें येथें झालें होतें. आजचे याचे संपादक व प्रकाशक श्री. श्री. पां. कामत हे असून कार्यकारी संपादक मूळचेच आहेत.

'मांडवी' चा दर्जा ठीक असून साहित्य नि सजावट यांच्या सुधारणेकडे संपादक श्री. कामत यांचें लक्ष बरेंच वेधलेलें आहे

या मासिकाचें हल्ली तिसरें वर्ष सुरु असून त्याला दीर्घजीवि करण्याचे चालकांचे प्रयत्न चालू आहेत. श्री. कामत हे दीर्घप्रयत्नी आहेत. त्यांच्यांत अंगावर घेतलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडण्याची तळमळ व चिकाटीहि आहे. तथापि नियतकालिकांचा व्यवसाय हा व्यावसायिक दृष्टिकोनांतून पहाणाराला व्यवसाय नसून एक उपद्व्याप आहे; आणि असले उपद्व्याप साध्यासुध्या प्रापंचिकाला बरेच कष्ट तर होत असतात. अशा उपद्व्यापांसाठीं केवळ कर्तव्य म्हणून सढळ हातानें खर्च करणारा चालक पाहिजे; किंवा त्याला भरपूर पैशांचें पाठबळ देणारा एखादा धनिक तरी लाभला पाहिजे. केवळ शाब्दिक सहानुभूतीनें किंवा कोरड्या आशीर्वादानें व्यवहाराचा गाडा सुरळीत चालणें शक्य नसतें. कागद, मुद्रणादि बिलांची संभावना पैशांशिवाय अशा सहानुभूतीनें किंवा आशीर्वादांच्या वर्षावानेंहि होणें सद्य:स्थितींत अशक्य !

यासाठीं, 'मांडवी' मासिक दीर्घजीवि करणें असेल तर चालकांनीं त्याच्या आर्थिक स्थैर्याचा आधीं विचार केला पाहिजे आणि मागाहून इतर गोष्टी.

'मांडवी' मासिकाचे आरंभापासून आजपर्यंत जे निरनिराळे विशेषांक निघाले त्यांत १९६४चा दिवाळी अंक विशेष उल्लेखनीय आहे. हा अंक अंतर्बाह्य सुंदर वठविण्यांत चालकांचे बरेच परिश्रम कारणीभूत झाले आहेत.

सदर अंकांत निरनिराळ्या लोकप्रिय लघुकथाकारांच्या दहा कथा, सहा विनोदी व ललितलेख, अठ्ठावीस कविता, प्रा. प्रियोळकर, डॉ. पिसुर्लेंकर, प्रा. बनहट्टी, श्री. प्रधान इत्यादींचे इतर लेख, विज्ञान, प्रवासवर्णन, नाटिका, मुलाखत, क्रीडा; कोंकणी भाषा आणि स्वतंत्र गोवा या संबंधींची सर्वश्री बोरकर, केळेकर, भेंब्रे व नाईक यांची कैफियत; अनंत अमुची ध्येयासक्ति यांतील सर्वश्री भेंब्रे, काकोडकर, मुळगांवकर, लवंदे, मयेकर, हेगडे, वीर यांचीं निवेदनें असा विविध भरगच्च मजकूर आला होता. मुखपृष्ठहि मोहक होतें. १९० पृष्ठांच्या या विशेषांकाचें मूल्य अडीच रुपये होतें.

'मांडवी' चें संपादनकार्य अस्नोडें येथें उरकून बेळगांवला मुद्रण करून घेणें आणि मुद्रीत अंक इथें आणून त्यांचें प्रकाशन करणें हें बरेंच कटकटीचें काम आहे; तथापि श्री. कामत तें उत्साहानें करतात.

नवें गोंय

'नवें गोंय' हें कोंकणी पाक्षिक मडगांव येथें १९६३ सालीं जानेवारींत सुरू झालें. कोंकणी साहित्याचा परिचय, परामर्श, प्रचार व त्या साहित्याला प्रोत्साहन देणें हें या पाक्षिकाचें ध्येय असलें तरी तें कार्य करतांनां 'नवें गोंय' इतर भाषांवर निरर्थक घसरत नाहीं हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

ध्येयानुरूप कथा, कविता, प्रचलित माहिती वगैरे विविध विषय या पाक्षिकांत येत असतात. आकार क्रॉऊन अष्टपत्री असून वार्षिक वर्गणी ६ रुपये व किरकोळ अंकाची किंमत २५ पैसे आहेत.

'नवें गोंय' पाक्षिकाचे संपादक श्री गुरुनाथ केळेकर हे एक निष्ठावंत कोंकणी लेखक असल्यानें आर्थिक बाजूकडेहि न पाहातां कोंकणीच्या प्रेमानें हें पाक्षिक ते आज तीन वर्षें नियमीत चालवीत आहेत.

या पाक्षिकाचे मुद्रक, प्रकाशक व मालकहि श्री. केळेकर हेच असून त्यांनीं मुद्दाम पाक्षिका-साठींच नवीन मुद्रणालय सुरू केलें आहे. 'संजीवनी छापघर' हेंच त्याचें नांव.

राष्ट्रमत

सन १९६३ सालीं ऑगस्टच्या दि. २५ रोजीं 'राष्ट्रमत' दैनिकाचा नमुना अंक निघाला आणि दि. १ सप्टेंबर पासून हें दैनिक मडगांव येथें सुरू झालें. पहिलें 'गोमंतक', दुसरें 'प्रदीप' आणि त्यांच्या मागून हें तिसरें मराठी दैनिक 'राष्ट्रमत' मुक्त गोमंतकांत जन्म पावलें. 'प्रदीप' पत्र महाराष्ट्रवादी, तर 'राष्ट्रमत' याच्या अगदीं उलट असून गोमंतकाचें राज्य भारतीय इतर राज्यांप्रमाणें वेगळें असावें या मताचें आहे. लोकशाही राष्ट्रांत राष्ट्रहिताच्या विविध मतांनां सारखाच वाव असल्यानें त्या त्या पत्रांतील मतप्रतिपादनांतील मुद्दे समजून घेऊन, त्यांच्यासंबंधीं स्वतंत्र रीतीनें शांतपणें विचार करून आपलें मत निश्चित करण्यास वाचकांनांहि सोयिस्कर होत असल्यानें त्या दृष्टीनें गोमंतकीय मराठी वाचकवर्गानें या तिन्हीं दैनिकांचें संतोषानें स्वागत केलें.

'राष्ट्रमत' दैनिकाचें ध्येय त्याच्या पहिल्या प्रथम निघालेल्या नमुना अंकांतील अग्रलेखांतून असें प्रगट झालेलें आहे. —

"भारतांतील इतर प्रदेशांपेक्षां जास्त काळ पारतंत्र्यामध्यें खितपतणाऱ्या गोमंतकाची भारतानें ज्या क्षणाला मुक्तता केली त्या क्षणालाच खऱ्या अर्थानें भारत पूर्ण स्वतंत्र झाला. भारतानें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्या-नंतर पंधरा वर्षांनीं गोमंतक मुक्त झाला आहे. राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें विचार केला तर भारतांतील इतर भूभागाच्या मानानें गोमंतक हा पंधरा वर्षांनीं मागें आहे. भारतांतील पूर्वीच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मानानें पोर्तु-गीज राजवट ही अनेक पटीनें मागासलेली असल्यामुळें स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या गोमंतकाला या परिस्थितींतून इतर भारतीय

भूभागाच्या जोडीस येण्यापर्यंतचा मार्ग प्रथम आक्रमावयाचा आहे याची जाणीव राजकीय पक्षांचे झेंडे नाचवणाऱ्या मंडळींनां जरी स्वार्था-पोटीं नसली तरी गोमंतकाचें भलें व्हावें असें चिंतिणाऱ्या गोमंतकांतील व गोमंतकाच्या बाहेरील विचारवंतांनां निश्चितपणें आहे. गोमंतकाच्या विकासाचा आजचा खरा यक्ष-प्रश्न हा असतांनां, तो महाराष्ट्रांत असावा, कीं, केंद्रशासित असावा, का त्याचें वेगळें राज्य असावें, या आणि कोंकणी मराठी वादादि वेगळ्याच प्रश्नांवर आज गोमंतकांत व गोमंतका-बाहेरहि शाब्दिक रणें माजत आहे ही कींव करण्यासारखी गोष्ट आहे.

गोमंतकाचें भवितव्य गोमंतकीयांनींच ठर-वावें; ते जें ठरवतील तसें भारत सरकार मान्य करील, अशी स्पष्ट शब्दांत भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं ग्वाही देऊन या प्रश्नाचा खरा सोक्षमोक्ष लावला आहे. परंतु जनतेचा बुद्धिभेद करणारी मंडळी दुर्दैवानें आपल्या भूमींत बरीच असल्यानें जनतेच्या सुखदुःखाचे, अन्नपाण्याचे शिक्षणाचे, विकासाचे सारे प्रश्न धाब्यावर बसवून गोमंतक महाराष्ट्रांत विलीन झाला पाहिजे असा तिनें धोशा लावला आहे; त्याला प्रथम भारताबरोबर चालायला शिकायचें आहे आणि भारताच्या वेगानें प्रगतिपथावर धांवावयास लावण्याचें आहे. भारताचें राजकीय धोरण विस्तारवादी नाहीं. म्हणून भाषा, संस्कृति, भूगोल असले शब्द पुढें करून भारतांतल्या राज्यांनीं आपलें धोरण विस्तारवादी ठेवणें हें भारताच्या ध्येयधोरणा-मध्यें बसणारें नाहीं.

दैनिक 'राष्ट्रमत' गोमंतकीयांच्या वरील भावनांनां व्यक्त स्वरूप देण्यासाठीं गोमंतकांत जन्म घेत आहे. भारतांतल्या प्रत्येक माणसानें हिंदी भाषा आपलीच आहे असें म्हणावें, आपली संस्कृति भारतीय आहे असें म्हणावें आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या साऱ्या भारतभूमीचा राजा आहे असें मानावें असें आम्हांला वाटतें. तथापि प्रांतवादी, भाषावादी संकुचिततेंतून महाराष्ट्राची वेगळी संस्कृति, गरबी गुजरातची निराळी, पंजाबची वेगळी असलीं बांडगुळें निर्माण झालीं आहेत, आणि या बांडगुळांचा आधार घेऊन राष्ट्रहित-विरोधी वृत्तीच्या राजकीय पक्षांचें बस्तान त्या त्या भागांत स्थिर होत आहे हें स्पष्ट दिसत असतांनां, डोळ्यांवर कातडी ओढून निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या हातांतलें बाहुलें गोमंतकी-यांनीं बनतां कामा नये असें आमचें स्पष्ट म्हणणें आहे.

गोमंतक हा भारताचा आहे आणि भारत गोमंतकाचा आहे. गोमंतकाचा आपली भाषा, आपली परंपरा या सर्वांचा विकास भारताचा एक घटक बनून साधावयाचा आहे. म्हणूनच गोमंतकाच्या संपूर्ण सर्वांगीण विकासाच्या ध्येयधोरणासाठीं आमचें हें दैनिक वाहिलेलें आहे असें आम्हीं अभिमानानें म्हणतों. गोमंतक लहान आहे, त्याचें राज्य अशक्य आहे असें कोणी म्हणतात. पण गोमंतकापेक्षां लहान

भूभागांतीहि राज्यें आहेत. तेव्हां भारताच्या सोळा राज्यांच्या संसारांत गोमंतकानें आपला सतरावा संसार मांडला, मांडावयाचा विचार केला तर त्याचें दुःख इतरांनां वाटूं नये. गोमंतक हा दक्षिण भारतांतला काश्मीर व्हावा, मुंबई शहर व ठाणें जिल्हा यांच्या खालोखाल एक उद्योगप्रधान भूभाग बनावा, गोमंतकाच्या विकासासाठीं भारतांतील सर्व राज्यांच्या वतीनें मध्यवर्ती सरकारनें आपला आर्थिक सहाय्याचा योग्य तो वांटा उचलावा आणि गोमंतक हें भारताचें देखणें नंदनवन व्हावें, हीच आमची इच्छा व आकांक्षा आहे. आणि आपल्या या राष्ट्रीय विचारसरणीशीं भारतांतील सर्व राष्ट्रप्रेमी जनता सहमतच असेल याची आम्हांला खात्री आहे.

हे केवळ आमचे विचार नाहींत; तर गोमंतकाच्या भूमींत राहाणाऱ्या गोमंतकीय बांधवांचे विचार आहेत. तथापि पक्षोपपक्षांच्या प्रचाराच्या रस्सीखेंचींत गोमंतकीय जनतेची स्थिति मात्र 'मुकीं बिचारीं कुणी हांका' अशी या मंडळींनीं करून ठेवली आहे. गोमंतकाला बेवारस समजून महाराष्ट्रवादी मंडळी त्याला महाराष्ट्रांत ओढूं पहात आहे. म्हैसूरवादी मंडळीनें आपल्याला समुद्रकिनारा हवा म्हणून गोमंतकावर आपला डोळा ठेवला आहे. तिसरी मंडळी गोमंतक केंद्रशासितच ठेवावा असें म्हणून गोमंतकावर तुळशीपत्र ठेवून मोकळी होते.

परशुरामाच्या या भूमींत वास्तव्य करणारी हिंदु, ख्रिश्चन, मुसलमान आदि जनता अगदीं दुबळी आहे अशी जणूं या मंडळींनीं समजूत करून घेतली आहे. जगांतल्या सर्वांत जास्त जुलमी सत्तेविरुद्ध स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या गोमंतकीय शूर जनतेच्या सामर्थ्याविषयीं कोणी शंका बाळगूं नये. गोमंतकीयांच्या मनगटांत पोर्तुगीजांनां पळवून लावून स्वातंत्र्य मिळविण्याची जशी दुर्दम्य महत्वाकांक्षा होती, त्याचप्रमाणें आपलें लहानसेंच जरी असलें तरी गोमंतकाचें राज्य सर्वांनां हेवा वाटावा अशा रीतीनें चालवून दाखविण्याचेंहि सामर्थ्य आहे. तथापि तो निर्णय गोमंतकाच्या जनतेनें घ्यावयाचा आहे आणि तो योग्य प्रकारें घेण्याला गोमंतकीय जनता समर्थ आहे."

राष्ट्रमत दैनिक 'नवगोमंत प्रकाशन' संस्थेच्या मालकीचें असून या संस्थेच्या चालक वर्गांत सर्वश्री तिमलेबंधु, साळगांवकरबंधु, शांतिलाल खुशालदासबंधु यांच्यासारखे उद्योगपति असल्यानें तें दीर्घकाल चालेल अशी आशा करण्यास जागा आहे. याच संस्थेच्या मालकीच्या 'नवगोमंत' छापखान्यांत याचें मुद्रण होत असून मुद्रक व प्रकाशक श्री. श्रीपाद गोपीनाथ घारसे हे आहेत. आरंभापासून १९६४ च्या फेब्रुवारीच्या पूर्वार्धापर्यंत या पत्राचे जबाबदार संपादक श्री. वसंत वैकुंठ कारे हे असून त्यानंतरच्या कालापासून ही

जबाबदारी श्री. चंद्रकांत केणी यांकडे आहे. या दैनिकाची वा. वर्गणी २४ रुपये असून नेहमींच्या अंकाची किंमत ६ पैसे आहे. आकार मोठा आहे.

विरोधी मतांविषयीं योग्य सहिष्णुता दाखवून आपलें मतप्रतिपादन करण्याऐवजीं मर्मभेदक टीका करण्यांत येते असें या दैनिकाविषयीं कांहींकांचें म्हणणें आहे.

बाळयुग

पणजी येथें स्थापन झालेल्या प्राथमिक शिक्षक संघातर्फे मुलांसाठीं एक मासिक सुरू करावें असा विचार संस्थेच्या चालकांच्या मनांत आला आणि त्याप्रमाणें त्यांनीं ठराव घेतला. त्या ठरावाप्रमाणें सन १९६३ सालीं नोव्हेंबर महिन्यांत ' बालयुग ' द्वैमासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.

' बालयुग 'चे संपादक श्री. सुरेश बोरकर हे असून कार्यालय पणजी येथेंच आहे.

या द्वैमासिकांत मराठी, हिंदी, इंग्रजी, पोर्तुगीज व कोंकणी अशा पांच भाषांतून मजकूर प्रसिद्ध होत असून बहुतेक सर्व लिखाण शिक्षण विषयक व मुलांच्या उपयोगी असें असतें. आकार पुस्तकाचा व आटोपशीर असाच असतो.

१९६४ पासून या द्वैमासिकाचें नांव बदलण्यांत आलेलें आहे.

अपुर्बाय

'सोबित साहित्य प्रकाशन' या पणजी येथें कांहीं होतकरू तरुणांनीं स्थापन केलेल्या संस्थेतर्फे हें छोटें कोंकणी मासिक १९६४ पासून सुरू झालें. याचे संपादक श्री. गुरुदास पै हे होत.

मुलांच्या स्वाभाविक, सांस्कृतिक व शैक्षणिक सुधारणेला हातभार लावण्याच्या हेतूनें ' सोबित साहित्य ' संस्था जन्म पावली असून तिच्यातर्फे मुलांसाठीं लहान लहान सुबोध पुस्तकें प्रकाशनांत आणण्याचा संस्थेचा हेतु आहे. आपल्या ध्येयास अनुसरून संस्थेनें पहिल्याप्रथम ' अपुर्बाय ' मासिक चालू केलें होतें.

प्रस्तुत मासिकाच्या नमुना अंकांत पुढील विषय आले होते—

चाचा नेहरू, लोकांकाणी, कर्ण ' जांगेर कुपां—रे तांगेर जय ' (कविता), वेताळ पंचविशी, भाव आनी भैण इ.

गोमंतवाणी

दि. २६ जानेवारी १९६४ रोजीं सकाळीं ११ वाजतां गोमंतकाचे शिक्षणमंत्री श्री. वि. सु. करमली यांच्या हस्तें 'गोमंतवाणी' दैनिकाचें मडगांव येथें प्रकाशन झालें, आणि तेव्हांपासून हें पत्र नियमीत सुरू आहे. याची मालकी 'गोमंतक प्रकाशन' संस्थेकडे असून प्रकाशक आरंभीं श्री. डॉ. राम कृ. हेगडे व आतां श्री. मा. उ. तळावलीकर हे आहेत. प्रथम सालीं या पत्राचे संपादक श्री. श्री. शं. नवरे हे होते आणि दुसऱ्या वर्षापासून आतां श्री. राम प्रधान हे आहेत.

'गोमंतवाणी'चें ध्येय त्याच्या प्रत्येक अंकांतून अग्रभागीं दिसून येतें तें असें, "मराठी भाषा व महाराष्ट्रांत विलिनीकरण यांचा स्पष्ट पुरस्कार करणारें दैनिक."

गोमंतवाणीचा आकार मोठा असून दर अंकाची किंमत ६ पैसे आहे. 'गोमंतवाणी प्रेस' या स्वतःच्या मुद्रणालयांत तें छापून निघत आहे.

गोमंतक प्रकाशन संस्थेच्या भागदारांत सधन लोकांचाहि समावेश असल्यानें त्यांची दृष्टि तत्त्वाकडे अधिक स्थिरावल्यास या दैनिकाच्या दीर्घजीवित्वाबद्दल शंका नाहीं.

या दैनिकाचा 'मराठी साहित्य संमेलन विशेषांक' साहित्यिक दृष्टीनें ठीक निघाला होता. त्यांतील संपादकीय मजकूर असा होता—

"गोमंतकांतील मराठी सारस्वताचा मेळावा"

"गोमंतकांतील मराठी सारस्वताच्या अपूर्व आणि प्रचंड मेळाव्याला अभिवादन करतांनां 'गोमंतवाणी'ला आज अत्यानंद होत आहे. दि. १९ डिसेंबर १९६१ रोजीं गोमंतकाची पवित्र भूमि दास्यविमुक्त झाली म्हणून हा मेळावा भरविणें शक्य झालें. गोमंतवाणीचा जन्म होऊं शकला आणि अभिवादनाचा हा शुभ प्रसंग प्राप्त झाला, हें सर्वांनां आतां कळून चुकलें आहे.

पारतंत्र्याच्या यातना काय असतात आणि त्यामुळें सर्व बाजूंनीं बौद्धिक आणि मानसिक कोंडमारा कसा होतो याविषयीं येथें जमलेल्या भाषासेवकांच्या आठवणी विसरून जाण्याइतक्या अद्यापि जुन्या झालेल्या नसल्यामुळें त्याबद्दल विस्तार करण्याचें कारण नाहीं. तथापि इतकें सांगणें अवश्य आहे कीं, प्रजेची संस्कृति आणि भाषा मारण्याचा पोर्तुगीज राजवटींत येथें तीन चार शतकें जो पद्धतशीर प्रयत्न झाला त्याला जगाच्या इतिहासांत तोड सांपडणें कठीण! ब्रिटिश अमदानीचीं दुखें भोगले-ल्यांनां देखील त्याची बरोबर कल्पना येईल कीं नाहीं याची शंका आहे. सुमारें साडे-बाराशें चौरस मैलांच्या आणि सहा लाख लोकवस्तीच्या या प्रदेशांतून आपण नुसता उडता फेरफटका केलात तरी या छोट्या प्रदेशाला कोणत्या दिव्यांतून जावें लागलें याची आज जिकडे तिकडे दिसणाऱ्या खाणा-खुणांवरून आपणाला स्पष्ट कल्पना येण्यास अडचण पडणार नाहीं.

गोमंतक हा भारतांतील सर्वांत शेवटीं मुक्त झालेला प्रदेश ! या छोट्या प्रदेशाची शक्ति इतकी लहान कीं, आज जगांत उपेक्षणीय समजण्यांत येणाऱ्या आणि दूर अंतरावर राहाणाऱ्या परक्या राज्यकर्त्यांशीं एकाकी लढून मुक्त होणें त्याला अशक्य झालें. तरीहि येथें स्वातंत्र्यासाठीं वेळोवेळीं झालेले प्रयत्न पाहिले म्हणजे येथील लोकांचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. शेवटीं, अत्यंत उशीरां कां होईना, भारताच्या मिळालेल्या सहाय्यामुळें त्यांनां आजचे सोन्याचे दिवस दिसले.

प्रेस ॲक्टचीं दुःखें भारतानें पुष्कळच भोगलेलीं आहेत. वाणीची आणि लेखणीची मुस्कटदाबी त्यानें अनेकदां सोसलेली आहे. पण वृत्तपत्रस्वातंत्र्य आणि सभास्वातंत्र्य त्याला गोमंतकाप्रमाणें कायमचें गमावून कधींच बसावें लागलें नाहीं ! साध्या लग्नपत्रिकाहि अधिकाऱ्यांकडून अगाऊ तपासून घेण्याची हास्यास्पद परिस्थिति आमच्या कल्पनेंतहि बसूं शकत नाहीं. प्राथमिक शिक्षण देखील परक्या (पोर्तुगीज) भाषेंतूनच घेतलें पाहिजे, अशा अनैसर्गिक आणि कष्टप्रद अवस्थेंतून त्याला जावें लागलें.

याच अंकांत गोमंतक साहित्य संमेलनाचा इतिहास-विशेषत: गोमंतकीय स्वागताध्यक्षांचीं भाषणें — सारांशरूपानें दिलीं आहेत. तीं वाचलीं तरी एकंदर परिस्थितीची चांगली कल्पना येईल. येथें स्वतंत्र विचारांचीं वृत्तपत्रें काढूं द्यावयाचीं नाहींत आणि बाहेरचीं वृत्तपत्रें आंत येऊं द्यावयाचीं नाहींत. हाताला लागेल तें जुनें वाङ्मय जाळून टाकलें आणि नवें वाङ्मय पूर्व तपासणीवांचून छापूं द्यावयाचें नाहीं. अशा दुहेरी माऱ्यापुढें येथील जनतेला वर्षेंच्या वर्षें काढावीं लागलीं !

तरीहि गोमंतकांतील किती तरी साहित्यिकांनीं महाराष्ट्रांत जाऊन व राहून साहित्याच्या प्रत्येक महत्वाच्या क्षेत्रांत चिरस्थायी नांव कमावलें आणि मराठी साहित्य पुष्ट केलें. येथील लोकांनीं खासगी रीत्या जागोजागीं मराठीचे जुने नवे ग्रंथसंग्रह प्राणापलीकडे जतन करून ठेवले व वाढविले. आपल्या खर्चानें खासगी शाळा चालवून आपल्या मुलांमुलींनां मातृभाषेंत शिक्षण देण्याची व्यवस्था चालू ठेवली. सारांश देशोधडीस लागलेल्या पारशी लोकांनीं भारतांत येऊन अग्यारींतून आपला पवित्र अग्नि फुलत ठेवला किंवा शतकानुशतकें स्वदेशास व स्वभाषेस मुकलेल्या ज्यू लोकांनीं आपला भाषाभिमान आणि देशाभिमान हृदयसंपुष्टांत सांठवून ठेवून संधि मिळतांच आपल्या भूमींत परत येऊन स्वराज्याची उभारणी केली, वाळवंटांतून नंदनवन उभें केलें, त्याप्रमाणें येथील लोकांनीं आपल्या मातृभाषेचा अभिमान सदैव जागृत ठेऊन स्वेच्छेनें वागण्याची संधि मिळतांच मराठीच्या अभिमानी लोकांनां सिंहासनावर बसविलें. मराठीच्या शाळा भराभर उघडून तेथें आपल्या मुलांमुलींनां पाठविण्यास, सुरवात केली. पुनः महाराष्ट्राशीं एकरूप होण्याचा मार्ग मोकळा करून घेतला आणि त्याची पूर्वतयारी म्हणून अखिल मराठी भाषिकांनां आग्रहपूर्वक प्रेमानें

निमंत्रण देऊन स्वगृहीं आजचा हा प्रचंड मेळावा घडवून आणला.

याच ठिकाणीं १९३० सालीं करड्या पोर्तुगीज अमलांत आणि पोर्तुगीज शिपायांच्या गराड्यामध्यें 'शिवाजी आमुचा राणा, भवानी आमुची माता, मराठी आमुची भाषा' असा उद्घोष ठासून करण्याची धिटाई ज्यांनीं दाखविली, त्यांनां आतां आपल्याच राज्यांत मातृभाषेचें विशेष स्फुरण चढावें व त्यांचा दीर्घ काळ दबलेला आणि गुदमरलेला महाराष्ट्राविषयींचा अभिमान शतपटींनी — सहस्रपटींनी उसळून यावा यांत आश्चर्य कसलें?..."

सदर विशेषांकांत पं. महादेवशास्त्री जोशी हे आपल्या 'एक हीणकस वाङ्मय-प्रवृत्ति' या लेखांत लिहितात कीं —

"आजचा काळ धर्मदृष्टीनं अगदीं विपरीत आहे. आज धर्माची आणि साहित्याची जोडी फुटली आहे. कृतयुगांत धर्म चतुष्पाद होता, असं म्हणतात. म्हणजे तो आपल्या चारी पायांवर उभा होता. कलियुगांत त्याचा एकच पांय शिल्लक उरला आहे असं भागवत म्हणतं. खरं आहे तें. आजच्या विज्ञानयुगांत धर्म एकाच पांयांवर लंगडा चालतो. या लंगडत्या धर्माशीं काडीमोड घेऊन आजचं साहित्य चौखूर उधळलं आहे. आजच्या साहित्यावर धर्माची सत्ता नाहीं. नीतीचा अंकुश नाहीं आणि संस्कृतीचा प्रभावहि नाहीं........."

"लेखणी हें लेखकाचें शस्त्र आहे. हें शस्त्र त्यानें अन्याय, अनीति, आणि पाप यांच्यावर उपसलं पाहिजे. प्रसंगीं शासनसंस्थेलाहि त्यानं चार हिताचे शब्द सुनावले पाहिजेत. कुठल्याहि कलावंताचा तो ईश्वरदत्त अधिकार आहे. थोड्याच दिवसांपूर्वीं 'लो' या पाश्चात्य व्यंग चित्रकारावर लिहिलेले मृत्युलेख बहुतेकांनीं वाचले असतील. त्याचीं कांहीं गाजलेलीं व्यंगचित्रेंहि पाहिलीं असतील. फार मोठा कलावंत होता तो. त्याच्या हातच्या कलमानं युरोपांतल्या बड्या बड्या राजकारणी धेंडांचं वस्त्रहरण केलेलं आहे. मोठमोठे मुत्सद्दी आणि हुकुमशहा त्याला घाबरत असं सांगतात. लेखकाच्या लेखणीनंहि हें सामर्थ्य दाखवलं पाहिजे. आपल्या देशांतल्या कवींची, महाकवींची आणि ग्रंथकारांची परंपरा सत्तेपुढं नांगी टाकण्याची नाहीं, तर सत्तेवर आणि जनतेवर अंकुश ठेवण्याची व तिला मार्गदर्शन करण्याची आहे. अगदीं वेदापासून तुम्हांला ही गोष्ट दिसून येईल. विश्वामित्र हा वेदांतला एक सूक्तकार. तो स्वतःला 'बिचारा लेखक' समजत नाहीं. त्याला स्वतःच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव आहे. तो म्हणतो—'विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम्।' माझं सुक्त म्हणजेच माझं हें वाङ्मय भरतजनांचं रक्षण करीत आहे.

त्याच कालांतील सूक्तदृष्टि सुनीता वागंभृणी म्हणते — 'अहं रुद्राय धनुरातनोमि। ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ॥' जे कोणी ज्ञानाचे द्वेष्टे असतील, त्यांच्यावर शरसंधान करण्यासाठीं मी रुद्राच्या हातीं धनुष्य देईन.

भारतीय इतिहासांत गुप्तकाल सुवर्णयुग मानलें जातें. याच कालांत कालिदास अवतरला.

त्यानं रघुवंश हें महाकाव्य समस्त रसिकांसाठीं लिहिलेलं असलं तरी त्याचा मुख्य उद्देश गुप्तसम्राटांच्या पुढें पुण्यश्लोक नृपावळीचे आदर्श उभे करण्याचा होता. तत्कालीन राजसत्ता धर्माच्या आणि कर्तव्याच्या मार्गावरून भ्रष्ट होऊं नये म्हणून त्यानं रघुवंशांत जागजागीं वाक्प्रपंच केला आहे.

जी गोष्ट कालिदासाची तीच त्यानंतर झालेल्या भारवीची. किरातार्जुनीय हें त्याचं महाकाव्य. त्यानं त्याचे सर्गच्या सर्ग असे जळजळीत भाषेंत लिहिले आहेत कीं, पद-दलितांचा, पराभूतांचा स्वाभिमान चेतून उठावा. अशीं अनेक उदाहरणें सांगतां येतील.

ललित लेखकानं आणि कवीनं आपला हा अधिकार जाणला पाहिजे. मागच्या पिढींतील कित्येक कवींनीं व कथा-कादंबरीकारांनीं तो जाणला होता. या सगळ्या साहित्यिकांचं प्रति-निधित्व घेऊन त्या काळीं केशवसूत गर्जून म्हणाले—'आम्हीं कोण ? आम्हांला वगळा, हतप्रभ जणुं होतील तारांगणें । आम्हांला वगळा, विकेल कवडीमोलावरी हें जिणें ।'

बऱ्याच अंशांनीं ही गोष्ट सत्य आहे.

साहित्याचा मान हा सर्वांत मोठा आहे. साहित्य घसरलं कीं, सारा समाजच घसरतो. सारं राष्ट्रहि घसरतं ! मध्ययुगांत शंकरा-चार्यांच्या नंतर प्रभावी साहित्याचे निर्मळ आणि जीवनदायक झरे आटले. केवळ भाष्यें, टीका, टिपण्या, अनुवाद, शब्दांचे आकृतिबंध, श्लेषांच्या कसरती याच गोष्टींत साहित्यिक रममाण झाले आणि याचा परिणाम म्हणजे त्या मध्ययुगाचा सारा पुरुषार्थच खुंटला, अन् महत्वकांक्षाहि मावळली ! ...."

सदर विशेषांकांत मराठी शायरी, अश्लील वाङ्मय निरोधन, खिस्तीलोकांत देवनागरी लिपीचा प्रसार, हीणकस वाङ्मय प्रवृत्ति, पोलीस—वकील—धर्मगुरु, चित्रकलेचें बदलतें स्वरूप, गोमंतकीय संतकवि बांदकर, गजा-आडच्या आठवणी, म्हणींतून घडणारें जगाचें दर्शन, गो. म. सा. संमेलनें, गोमंतक दर्शन, गोमंतकाच्या इतिहासावर धांवता दृष्टिक्षेप इ. पंचवीसएक विषय होते.

गोमंतवाणी दैनिकाचें मुद्रण, नियमीत प्रकाशन इ. बाबी ठीक आहेत. तथापि एखादे वेळीं नजरचुकीनें का असेना जें क्वचित् आक्षेपार्ह लिखाण त्यांतून प्रगट होतें त्याला थारा मिळूं नये अशी कित्येकांची अपेक्षा आहे.

वनिता

'वनिता' वार्षिक वास्को येथील वनिता मंडळातर्फे सन १९६४ सालच्या जानेवारी महिन्यांत सुरू झालें. याचा आकार क्राउन अष्टपत्री असून प्रथमांकाचीं पृष्ठें ४८ होतीं. हा अंक नॅशनल प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून वास्को येथें प्रकाशनांत आला होता. कागद सफेत व मुद्रण स्वच्छ होतें. वनिता वार्षिकाच्या संपादिका कु. कमल मुकुंद कामत या असून प्रकाशिकाहि त्याच होत्या. प्रथमांकाच्या संपादकीय मजकुरांत लिहिलें होतें कीं —

"वनिता मंडळाच्या भगिनींनी लिहिलेल्या साहित्यानें नटलेला हा पहिला वहिला अंक आपल्या हातांत देतांना फार आनंद होत आहे.

या वर्षी जानेवारींत मंडळाला तीन वर्षे पुरीं होऊन तें चौथ्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या निमित्त ही 'वनिता' सादर करण्यांत येत आहे. वाढदिवशीं पुढील आयुष्यासाठीं नवे संकल्प करण्याचा प्रघात आहे. त्याला अनुसरून स्त्रिया व मुलें यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासासाठीं आम्हीं झटूं अशी इच्छा करतों.

तीन वर्षात मंडळाकडून अल्प सेवा घडलेली आहे व ती आपण गोड मानून घेतलेली आहे. पुढें पुष्कळ करायचं आहे. आपल्या सहकार्यानें तें पार पडेल यांत शंका नाहीं. तीन वर्षांचा काल म्हणजे उर्जित काळ नसून त्याला मुहूर्तमेढीचाच काल म्हणतां येईल. काल लावलेलें बीं आज रोपट्याच्या रूपानें सृष्टीकडे पहावयास लागतें. योग्य खतपाणी व जोपासना केली तर वृक्षांत रूपांतर व्हायला वेळ लागत नाहीं. आज रोपट्याच्या रूपांत असलेलें मंडळ हळुहळू विस्तार पावेल व त्याच्याच छायेंत आम्हीं भगिनी अधिकाधिक प्रगति करण्याची धडपड करूं. जेणेंकरून आमच्या कार्याला अधिक संधि मिळेल.

'वनितां'त भगिनीनीं व मुलींनीं लिहिलेलें आहे. आम्हीं साहित्यिक नाहीं हें आवर्जून सांगण्याची गरज नाहीं. आमच्या अल्प बुद्धीला जें पटलें, जें प्रगट करावेंसें वाटलें तें आम्हीं इथें प्रगट केलें आहे. लिखाण कितपत लायकीचें आहे तें आपण ठरवावें. कांहीं चुकलें सवरलें तर माफी करण्यास आपण उदार असाल अशी आशा करतें......—कु. कमल मुकुंद कामत"

वनिता वार्षिकाच्या प्रथमाकांत संपादकीय, तीन वर्षांची वाटचाल, स्त्री, तारतम्य, पदयात्रा, पुण्यभूमि गोमंतक, स्त्रिया व उच्च शिक्षण, त्याग, पोलियो, गोमंतक दर्शन, श्रद्धांजली, सुगृहिणीचें कौशल्य, आम्हीं स्त्रिया आणि आमचीं मंडळें, गोवा स्वातंत्र्याचा पोवाडा वगैरे निरनिराळे २४ विषय आले होते.

'वनिता'चा द्वितियांक गेल्या जानेवारींत निघावयाचा; पण तो प्रसिद्ध झालाच नाहीं. त्यावरून हें वार्षिक पहिला एकच अंक प्रसिद्ध होऊन पुढें बंद झाल्यासारखें वाटत आहे.

प्रेरणा

माजी 'ब्राह्मण' मासिकाचे संपादक श्री. रामकृष्ण नारायण केळकर यांनीं १९६४ च्या

जानेवारींत 'प्रेरणा' साप्ताहिक सुरू केलें. श्री. केळकर यांची जन्मभूमि मांद्रें; तथापि व्यवसायानिमित्त त्यांचें वास्तव्य आहे आसगांवला आणि तेथेंच 'प्रेरणा' पत्राचें कार्यालय आहे. या पत्राचे संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक केळकर हे एकटेच होत. सावंतवाडी येथील गजानन मुद्रणालयांत छापून सावंतवाडी येथेंच प्रेरणेचे अंक प्रसिद्ध केले जात असत. आसगांवला मजकूर तयार करून तो सावंतवाडीस पाठविणें आणि मुद्रणानंतर ते अंक तेथूनच पोस्ट करणें हें जिकीरीचें काम वृत्तपत्रीय आवडीमुळें केळकर मोठ्या संतोषानें करीत.

प्रेरणा पत्राचा आकार लहानसाच असून वार्षिक वर्गणी ५ रुपये व किरकोळ अंकाची किंमत १० पैसे असे. 'देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मणे' (सवितादेव तुम्हांला उत्तम कर्म करण्यासाठीं प्रेरणा देवो) असें या पत्राचें ध्येयवाक्य असे.

हें पत्र जवळ जवळ दीडेक वर्ष चाललें आणि पुढें बंद झालें असें वाटतें; कारण याच्या दुसऱ्या वर्षाच्या २० व्या अंकानंतरचा एकहि अंक कुठें दिसला नाहीं.

गोमंतसूर्य

दि. १ जानेवारी १९६५ रोजीं या साप्ताहिकाचा १ला अंक प्रसिद्ध झाला. मराठी आणि रोमन लिपींतून कोंकणी अशा दोन भाषांतून त्यांत मजकूर आला होता. अग्रलेखाच्या वर, 'जनतेचें साप्ताहिक गोमंतसूर्य' असें ठळक अक्षरांत दिसत होतें. वा. वर्गणीचा निर्देश नव्हता; फक्त किरकोळ अंकाची किंमत दिली होती व ती ८ पैसे होती.

या पत्राचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्रभाकर मसुरेकर हे असून कार्यकारी संपादक श्री. जे. ए. फुर्टाडो हे आहेत. कार्यालय चिंचोणें आणि मुद्रण पणजी येथें होत असतें.

लोकसंग्राम

मडगांव येथें दि. २६ सप्टेंबर १९६५ रोजीं 'लोकसंग्राम' साप्ताहिकाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला. या पत्राचा आकार 'भारत' साप्ताहिकाएवढा असून पृ. ८ व किरकोळ अंकाचें मूल्य १० पैसे आहेत. वार्षिक वर्गणी ५ रु. 'लोकसंग्राम'चे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. नारायण देसाई हे असून या पत्राचें मुद्रण व प्रकाशन मडगांव येथील नाटेकर प्रिंटिंग प्रेसमध्यें होत असतें.

लोकसंग्रामच्या प्रथमांकांत आलेले विषय:– पण दिग्विजयी भारता सावध रहा, गोमंतकाचें विलिनीकरण, स्वातंत्र्याचा उदय व नंतर..., भारत पाक संघर्ष आणि त्याचे मूळ सूत्रधार, नवा कामगार, भारताचें चालू अर्थशास्त्र, लु. विद्यापीठ वगैरे.

यंग गोवा (तरुण गोवा)

सप्टेंबर १९६५ मध्यें जीं कांहीं नियतकालिकें गोव्यांत सुरू झालीं त्यांत 'यंग गोवा' तथा तरुण गोवा साप्ताहिकाचाहि समावेश होतो. हें पत्र तूर्त इंग्रजींत सुरू असलें; तरी लवकरच

त्यांत मराठी विभाग येणार असल्याचें कळतें. यंग गोवा पत्राचे संपादक श्री. सदाशिव आर. देसाई व श्री. बोनिफासियु डायस हे असून त्याचे प्रकाशन म्हापशें येथें होत असतें.

उजो

'उजो' हें पुस्तकरूपी कोंकणी साप्ताहिक श्री. जगदीशराव हे बेळगांव येथें स्वस्तिक प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून घेऊन तेथेंच प्रसिद्ध करीत आहेत. किरकोळ अंकाची किंमत १५ पैसे आहे.

जनगर्जना

'जनगर्जना' हें लहानसें साप्ताहिक पत्र गतसालीं जन्म पावलें व यंदा त्याचें दुसरें वर्ष सुरू आहे. या पत्राचे मालक, संपादक, प्रकाशक व मुद्रक श्री. ना. भि. ना. गांवकर हे असून त्याचें मुद्रण व प्रकाशनस्थळ सावंतवाडी येथें असलें तरी कार्यालय करंजळें येथें आहे. याची वा. व. १० रु. व किरकोळ अंकाची किंमत १२ पैसे आहे.

जयगोवा

'लोकसंग्राम'च्या आकाराचें 'जय गोवा' पत्र यंदाच्या ऑगस्ट पासून पणजी येथें सुरु झालें. या पत्राची वा. व. रु. ४-५० व किरकोळ अंकाचें मूल्य १० पैसे आहे. जयगोवा साप्ताहिकाचे संपादक, प्रकाशक, व मुद्रक श्री. मल्हार कीर्तीकर हे असून पत्राचें कार्यालय पणजी येथें आहे.

उजो, जनगर्जना, जयगोवा यांचीं मतें निर-निराळीं असलीं, तरी हीं तिन्हीं नियतकालिकें कमी अधिक प्रमाणानें एकाच सांच्याचीं दिसतात ! जशी हल्ली मुक्तछंद काव्याची वावटळ उठली आहे तशी या पत्रांनीं 'मुक्त-बंध' प्रथा स्वीकारल्याचें दिसतें. लेखनांतील कोणतेंहि बंधन पाळण्याची यांची इच्छा दिसत नाहीं !

नियतकालिकें किंवा वृत्तपत्रें ही एक अत्यंत पवित्र व सर्वश्रेष्ठ संस्था आहे. तिचे नियमहि फार कडक आहेत. हे नियम पूर्णपणें पाळण्याची जाच्यांत ताकद आहे तोच मनुष्य या संस्थेंत यशस्वी होऊं शकतो. इतरांनां तिच्यांत या लोकशाहींत मज्जाव नसला तरी यशश्री त्यांच्याकडे ढुंकूनहि पहात नसते. प्रेमळ व गोड शब्दप्रयोगानें आधीं जनतेंत आपुलकी आणि विश्वास उत्पन्न करून मग लोकांत सामाजिक व राष्ट्रीय एकता निर्माण करणें आणि लोककल्याण साधणें हें नियतकालिकांचें आद्यकर्तव्य आहे. या कर्तव्याकडे पाठ फिरवून समाजांत फूट पाडण्याचा प्रयत्न एखाद्यानें केला तर त्या-बद्दलचे दुष्परिणाम कमी अधिक कालानें त्याला नि इतर सगळ्यांनांच भोगावे लागतात यांत संशय नको.

न्यायसंस्थेचें यश जसें नीतींत आहे त्याच-प्रमाणें वृत्तसंस्थेचें यशहि नीतींतच आहे. नीतीमान नियतकालिकांतच समाजांत योग्य विचारक्रांति घडवून आणून राष्ट्राचा अभ्युदय किंवा कल्याण साधण्याचें सामर्थ्य असतें हें कोणीच विसरून चालणार नाहीं.

★ ★ ★

१९२७ सालीं गोमंतकांत जारी झालेला फिरंग्यांचा

वृत्तपत्र – कायदा

संपादक—कोणत्याहि नियतकालिकाच्या संपादकास ' लिसेव 'च्या शिक्षणाचा पांचव्या वर्गाचा दाखला आणि उच्च किंवा स्वतंत्र शिक्षणकोर्स उत्तीर्ण झाल्याचा दाखला यांची जरूरी असून तो इसम राजकीय व दिवाणी हक्क न गमावलेला असा पोर्तुगीज नागरिक असावा लागे. नियतकालिकाची प्रसिद्धी ज्या तालुक्यांत होई त्याच तालुक्यांत संपादकाचें वास्तव्य असावें लागे.

एका इसमाला एकापेक्षां अधिक नियतकालिकांचा संपादक होतां येत नसे. सरकारी नोकराला कोणत्याहि सबबीवर संपादक म्हणून काम करतां येत नसे.

पोर्तुगीज खेरीज इतर भाषांतून नियतकालिक सुरू करणें झाल्यास वरील अटींशिवाय त्याला गव्हर्नरचा परवाना लागे व तो हवा तेव्हां कारण न दाखवतां रद्द करून नियतकालिक बंद पाडण्याचाहि त्याला अधिकार होता.

मुद्रक— छापखान्याचा मालक किंवा मुद्रक याला शिक्षणाची अट नव्हती; पण त्याचें नांव मात्र छापखान्यांतील कोणत्याहि मुद्रीत पत्रावर किंवा पुस्तकावर ठळक जागीं घालावें लागे. निवडणुकीच्या चिठ्ठ्या, आमंत्रणपत्रकें अशीं कांहीं वगळून इतर पत्रांपुस्तकांवर मुद्रकाचें नांव व मुद्रणस्थल घालावें लागे. न घातलें गेल्यास छापखान्याच्या मालकास किंवा मुद्रकास पहिल्या खेपेस एक ते सहा महिन्यांची व दुसऱ्या खेपेस अधिक काल दंडाची शिक्षा होई. नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर ठळक जागीं संपादकाचें नांव व. शैक्षणिक पदवी, प्रकाशकाचें नांव व शैक्षणिक दर्जा, प्रकाशन स्थळ व मुद्रण स्थळ, पत्राच्या मालकाचें नांव, मुद्रकाचें व मुद्रणालयाचें नांव इ. घालावीं लागत. हा नियम न पाळल्यास मुद्रकाला ३ ते ६० दिवस कैदेची सजा आणि पत्राचा मालक व संपादक यांना २८५० रु. पर्यंत दंड होई. प्रसंगीं पत्रहि बंद होई.

प्रकाशक— वाङ्मय, कला, शास्त्र व धर्म हे चार विषय खेरीज करून कोणत्याहि पत्राचा किंवा पुस्तकाचा प्रकाशक राजकीय व दिवाणी हक्क न गमावलेला, पोर्तुगीज नागरिक असून त्याला ' लिसेव 'च्या निदान पांचव्या वर्गाचा दाखला असावा लागे. निवडणुकीच्या चिठ्ठ्या, निमंत्रण-पत्रकें, व्हिजिटिंग कार्ड हीं खेरीज करून इतर सर्व पत्रकांवर किंवा पुस्तकांवर ठळक जागीं प्रकाशकाचें नांव व शैक्षणिक दर्जा; तसेंच प्रकाशन स्थल वगैरे घालावीं लागे. यांत कसूर झाल्यास खटला भरण्यांत येई व शिक्षाहि होई.

हा कायदा गोव्यांत जारी झाल्यानें लोकांना बराच त्रास होऊं लागला. त्याबद्दल सरकारांत तक्रारीहि कित्येक गेल्या; पण त्यांचा उपयोग न होतां तो चालूच राहिला.

★ ★ ★

सेंसॉर

सन १९२७ पासून गोव्यांत चालू असलेल्या वृत्तपत्रीय कायद्यांत १९३५ सालीं कांहीं बदल झाला आणि पुन्हां १९३७ त जो त्यांत विशेष फरक करण्यांत आला तो पोर्तुगिजांच्या अखेरच्या कालापर्यंत कायम राहिला.

गोमंतकीय वृत्तपत्र-कायद्याला १९३४ पासून 'सेंसॉर'ची जोड देण्यांत आली. आरंभीं सेंसॉरची फारशी तीव्रता नव्हती; पण १९३७ पासून ती विशेष वाढली आणि त्यामुळें वृत्तपत्रें नकोत नि पुस्तकेंहि नकोत अशी स्थिति झाली.

सदर वृत्तपत्र-कायद्याच्या ७ व्या विभागांत खालील प्रमाणें सेंसॉरबद्दलचीं कलमें होतीं:—

कलम ६४ — कोणतींहि वृत्तपत्रें, मासिकें, पुस्तकें किंवा पत्रकें यांची सेंसरकडून तपासणी करून घेण्याची जरूरी आहे.

क. ६५ — सत्य, न्याय, नीति, चांगला कारभार, समाज व राष्ट्रहित वगैरेविरूद्ध एखाद्या मजकुराची प्रसिद्धी होऊं नये हाच सेंसॉरचा मुख्य उद्देश आहे.

क. ६६ — सेंसॉरचें काम वसाहत सरकारनें नेमणूक केलेल्या कमिटीतर्फे व्हावें. गव्हर्नरला वाटल्यास या कमिटींतील सभासदांना वेतन देतां येईल.

पो. क. १ — कमिटींतील सभासद लायक, सरकारचा अत्यंत विश्वासू आणि फौजदारी, दिवाणी किंवा इतर कोणताहि दोष नसलेला असावा.

पो. क. २ — नेमणूक केलेल्या सभासदांना जरूर वाटल्यास गव्हर्नर केव्हांहि काढून टाकूं शकेल.

क. ६७ — सेंसर कमिटी नेहमीं गव्हर्नरच्या हाताखालीं राहील.

क. ६८ — रद्द केलेल्या मजकुराच्या जागीं दुसऱ्या मजकुराचा सेंसरला उपयोग करतां येणार नाहीं.

क. ६९ — सेंसरनें रद्द केलेल्या मजकुराबद्दल गव्हर्नरकडे अपिल करतां येईल; पण त्याच्या निकालावर पुढें अपिल करतां येणार नाहीं.

क. ७० — सेंसरसंबंधींच्या व इतर कायदेशीर कारणामुळें नियतकालिकाची प्रसिद्धी बंद करण्याचा गव्हर्नरला अधिकार देण्यांत येत आहे.

क. ७१ — सेंसरसंबंधींच्या कोणत्याहि गुन्ह्याबद्दल गुन्हेगारास कायद्याप्रमाणें दंड करण्यांत यावा. गुन्ह्याचें स्वरूप वाढविल्यास तो दंड चौपट करतां येईल आणि नियतकालिक १८० दिवस बंद पाडतां येईल. गुन्हा दुसऱ्यानदां केल्यास शिक्षा दसपट, नियतकालिक बंद आणि व्यावसायिक परवानाहि रद्द होईल.

पो. क. १ — दंडाची रक्कम प्रकाशनाच्या किंमतीच्या दसपटीपेक्षां केव्हांहि कमी नसावी. प्रकाशनाच्या अभावीं ही रक्कम ५०० इस्कूदांपेक्षां कमी असावी. इ. इ.

गोमंतक मुक्त होतांच ही सेंसरची कटकट गेली आणि ऑगस्ट १९६२ पासून भारतीय मुद्रण कायदा येथें जारी झाला.

रोमन लिपींतील नियतकालिकें

गाझेत द गोअ
कॉनिक कोंस्तितुसियोनाल
यॅकु द लुझितानीअ
बोलेर्ती दु गोव्हेर्नु
व्हिजिलांति
बिब्लियॉतॅक द गोअ
ऑव्सेर्व्हादोर
एन्सिक्लॉपॅदिकु
कोंपिलादोर
कुन्हैयु द नॉव्ह गोअ
आपेंसु आउ बोलेर्ती
व्हॉज दुश् पोव्हुश्
इर्यॉ. द सांत इग्रेझ्य
गाबिनेति लितेरारियु
मॉझाइकु
देफेंसोर द ऑर्दे
दे. दु रेआल पाद्रोआदु
रेव्हिस्त इलुस्त्रातीव्ह
उल्त्रामार
इंदीअ पुर्तुगेज
फॅनिक्स द गोअ
आर्मोनीअ
आउरॉर द गोअ
सेंतिनॅल द लिबॅर्दादि
झॉ. द. नोतीसिअ
इम्प्रेंस
गाझेत द गोअ
मेंसाइ्यैरु
पाईझ
प्रॉग्रेसु
ओपिनियांव पूब्लिक
ओरियेंति
गाझेत द बार्देझ

नॉव्ह गोअ
क्रूझ
पात्रिअ
सिव्हिलिझासांव
इम्पार्सेयाल
उनियांव
सॅमान
अ व्हॅर्दादि
यॅकु पोपुलार
कुन्हैयु द ईंदिअ
कुन्हैयु द गोअ
क्रैंति
पेरियॉदिकु दु पोव्हु
प्रॉग्रेसु द गोअ
टाइम्स ऑफ गोवा
दिश्कुसांव
कोंव्हिक्सांव
फार्स
रेपोर्तेर द ईंदिय
दॅमॉक्रासीअ
ओर्तीगश्
मांदोवी
व्हिति इ उं द सॅतेंब्रु
व्हॉज दु पोव्हु
कॉन्हॅस्पाँदॅसिय द गोअ
गाझेत द ईंदिअ
इंव्हेस्तिगादोर
नोतीसिअस्
ब्रादु इंदियानु
लिबॅराल
पाईझ
येव्होलुसांव
बि. द. नोतीसिअस्

यॅर नॉव्ह
पुर्तुगेज
आथलेत
ऊ येराल्दु
नासियॉनालिस्त
बार्देझानु
इंदियु
ओरियेंति
दिआरियु द गोअ
यॅकु द ईंदिअ
रॅफॉर्म
इम्पार्सियाल
पिग्मेउ
ॲराल्दु
आरियानु
फुतूरु
कॉमर्सियु
दॅबाति
पोपुलार
पोव्हु
झॉ. द. ईंदिअ
बो. दु कॉमॉर्सियु
पात्रिअ
रॅबाति
व्हीद नॉव्ह
झॉ. दु पोव्हु
लांतॅर्न
लिबॅराल
तॅन्ह
प्रॉग्रेसु
ओपिनियांव
पुर्तुगेज
नासियॉनाल

दिआरियु द नोइति
त्रिबून
प्रोव्हींसिअ
कुन्हैयु द बार्देझ
ईंदिअ पुर्तुगेज
लुज दु ओरियेंति
प्रकाश
प्रदीप
व्हिद
झ्यॉ. दश् कोमुनिदादिश्
वावराड्यांचो इष्ट
पोर्जेचो आधार
व्हॉज द ईंदिअ
वांग्वार्द
दिआरियु द गोअ
झ्यॉ. द ईंदिअ
कुन्हैयु द बिशोर्ली
गोवा मेल
गोवा टाइम्स
आव्हॅमारीअ
गोअन वर्ल्ड्
आंग्लु लुझितानु
इस्तादु द ईंदिअ
द. म. रोटी
नवहिंद टाइम्स
सत्
न्यू इरा
यंग गोवा
इंडिया
नकेतर
ज्यॉ. द. नॉ. कोंकीस्तस्
पात्रिअ
गोवानिज

देवनागरी लिपींतील नियतकालिकें

सर्वसंग्रह
आनंदलहरी
देशसुधारणेच्छु
ज्यॉ. द. नॉ. कोंकीस्तश्
गोवामित्र
गोवात्मा
आर्यबंधु
गोवा-पंच
ज्ञानादर्श
गोमांतक
न्यायचक्षु
गाझेत द पेरनें
कालिकादर्शन
ज्ञानांजन
श्रीखंड
ज्ञानमित्र
हितचिंतक
सुदर्शन
सत्संग
पथ्यबोध
चित्ताकर्षण
प्राचीप्रभा
हिंदुमत
हळदकुंकू
प्रभात
भारत
विद्याप्रसार
स्वयंसेवक
स्वदेश
गायकमित्र
नवजीवन
प्रगति
गडगडाट

भारतोदय
भारतमित्र
नापितोदय
ईंदिअ
हिंदु
आर्यविज्ञान
सुबोध
गोमंतक
मनमोहन
वैश्य
पतितपावन
युगांतर
गोमंतक
नवें गोंय
गोवा कामगार
कला
ब्राह्मण
ज्वाला
आमचें गोंय
दीपगृह
साद
विकास
दूधसागर
विसावा
उदय
नवजीवन
दीपावली
अर्चना
रत्नदीप
गोवानीज
कथासागर
तरुण गोवा
गोअन

गोमंतक
प्रदीप
कोंकणी
त्रिवेणी
मांडवी
नवें गोंय
राष्ट्रमत
बालयुग
अपुर्बाय
गोमंतवाणी
वनिता
प्रेरणा
गोमंतसूर्य
लोकसंग्राम
उजो
जनगर्जना
जयगोंया
जैत
परमळ

हस्तलिखित नियतकालिकें

विद्यानंद,	शिरोडें	नन्दादीप,	मडगांव
ऋषिवन,	रिवण	अरुणोदय,	,,
स्वदेश,	मडगांव	वैश्य उत्कर्ष,	,,
बालमित्र,	,,	मीलन,	,,
विद्यार्थी,	पणजी	चंद्रवाडी,	केपें
जागृति,	म्हापशें	सिनेमा संगीत,	पणजी
किरण,	बांदिवडें	मकरंद,	,,
सुप्रभात,	सांखळी	ज्योती,	वास्को
कर्णधार,	कुमारजुवें	उद्धार,	म्हापशें
मार्गण,	मडकै	नीलिमा,	,,
सागर,	सांगें	अरुण,	वागाळी
उत्तेजन,	मडगांव	संगम,	सांगें
जीवनकला,	,,	उत्कर्ष,	रिवण
कौमुदी,	,,	जागृति,	शिरोडें
उदय,	,,	निनाद,	,,
वसन्त,	,,	प्रातःकाल,	कुंडई
तेज,	पणजी	उदय,	कालापूर
सेवा,	सांखळी	विजयानंद,	डिचोली
हिंदु,	रिवण	अभ्युदय,	पणजी
विकास,	मडगांव	आझाद,	सांखळी

बऱ्याच कालापासून गोमंतकांत हस्तलिखित नियतकालिकांची सुरवात झाली होती. तथापि त्यांपैकीं कित्येकांची व्यवस्थित माहिती मिळत नाहीं. जुन्यांपैकीं 'विद्यानंद' पाक्षिकाचे कांहीं अंक शिरोडें येथें, जुन्या पिढींतील एक विचारवंत साहित्यिक कै. गोपाळ कृष्ण गुडे यांकडे आम्हांला आढळले.

हस्तलिखित नियतकालिकांचा पूर्वकालीन उत्साह पुढें टिकला नाहीं आणि आज तर तो मुळींच दिसत नाही !

१९३० सालीं मराठी सा. समेलनाच्या १५ व्या अधिवेशनाच्या वेळीं मडगांव येथें हस्तलिखित नियतकालिकांचें पहिलें प्रदर्शन भरलें. दुसरें १९४२ सालीं मडगांव येथेंच श्रीदामोदर विद्याभुवनांत भरविण्यांत आलें आणि तिसरें प्रदर्शन श्रीरामनाथ देवस्थानातर्फे रामनाथीं येथें भरलें होतें. त्यानंतर प्रदर्शन नाहीं आणि हल्ली हस्तलिखित नियतकालिकेंहि दिसत नाहींत ! लेखनाच्या अभ्यासासाठीं अजूनहि प्रत्येक विद्यालयांत हस्तलिखिन नियतकालिकांची फार गरज आहे.

स मा प्त